CMYK

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, १८ जुलै २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक २३० । पाने १२ । किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



आपले चारित्र्य सुधारण्यासाठी रोज प्रयत्न करणे म्हणजे आध्यात्मिकता. अहंकाराचा त्याग करणे म्हणजे आध्यात्मिकता. दुसऱ्या यक्तीशी एकजीव होता येणे म्हणजे आध्यात्मिकता. स्वतःमधील अहंकार पूर्णपणे नष्ट करणे म्हणजे आध्यात्मिकता. तोच तर खरा मोक्ष होय.

**- पद्मविभूषण स्व. पी. परमेश्वरन्**
संस्थापक, भारतीय विचार केंद्र, पूर्व अध्यक्ष विवेकानंद केंद्र

## विनम्र अभिवादन



**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा आज स्मृतिदिन**

# मतदार यादीत नाव नसल्यास नागरिकत्व रद्द होत नाही

## सर्वोच्च न्यायालयाने 'एसआयआर'वर मांडली स्पष्ट भूमिका

**नवी दिल्ली, १७ जुलै**

विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेत मतदार यादीतून एखाद्या व्यक्तीचे नाव वगळल्यास त्याचे नागरिकत्व आपोआप रद्द होणार नाही, असा तोंडी पुनरुच्चार सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी केला. यासंदर्भात बिहार विशेष सखोल पुनरीक्षणावरील आपल्या निर्णयात हे आधीच स्पष्ट केले होते, असेही न्यायालयाने सांगितले.

मतदार यादीच्या विशेष पुनर्विलोकना (एसआयआर)दरम्यान मतदार यादीतून नावे वगळल्यानंतर लोकांमध्ये नागरिकत्वाबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. मतदार यादीत नाव नसल्याने नागरिकत्व आपोआप रद्द होत नाही. यासाठी एक वेगळी प्रक्रिया असते, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. प्रसेनजीत बोस यांनी दाखल केलेल्या याचिकेच्या सुनावणीदरम्यान भारताचे सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांनी हे विधान केले.

याचिकाकर्त्यांचे प्रतिनिधित्व करणारे ज्येष्ठ वकील गोपाल शंकरनारायणन यांनी न्यायालयाला सांगितले की, बंगालमधील 'एसआयआर'मधून ज्यांची नावे वगळण्यात आली आहेत. दाखल अपीलांवरील सुनावणीची प्रक्रिया अत्यंत संथ गतीने सुरू आहे. तरीही, पश्चिम बंगाल सरकार अशा लोकांना कल्याणकारी योजनांमधून वगळत असून त्यांना लाभ नाकारत आहे. तसेच जातीचे प्रमाणपत्रही नाकारले जात आहे. 'एसआयआर'नंतर सरकार मतदार यादीतून नावे वगळलेल्या लोकांना इतर लाभांपासून वंचित ठेवण्यास सुरुवात करेल, अशी कोणी कल्पनाही केली नव्हती, असा युक्तिवादही त्यांनी केला.

(वृत्तसंस्था)

### नागरिकत्व निश्चित करणे आयोगाचा घटनात्मक अधिकार नाही



या युक्तिवादांवर प्रतिक्रिया देताना, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांनी सांगितले की, बिहार एसआयआर निकालातच न्यायालयाने म्हटले आहे की, नागरिकत्व निश्चित करणे हा निवडणूक आयोगाचा घटनात्मक अधिकार नाही. निवडणूक आयोगाचा अधिकार केवळ मतदार यादीवर नियंत्रण ठेवण्यापुरता आणि तिचे पर्यवेक्षण करण्यापुरता मर्यादित आहे. निवडणूक आयोगाने निर्णय घेतल्याबरोबर तो नागरिकत्व कायद्यांतर्गत निर्णयासाठी मंत्रालयाकडे पाठवणे ही निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे. जोपर्यंत तसे होत नाही, तोपर्यंत यथास्थिती कायम रहायला हवी, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.



आमचा निकाल स्पष्ट आहे. निवडणूक आयोग अनुच्छेद ९, १०, ११ आणि १२ अंतर्गत घटनात्मक प्राधिकरण नाही. मतदार यादीवर निवडणूक आयोगाचे नियंत्रण आहे. एखाद्या व्यक्तीचा समावेश न करण्याचा निर्णय ते घेऊ शकतात. मात्र, यामुळे नागरिकत्वाचा दर्जा आपोआप रद्द होत नाही.

**- न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची**

# रुळावरून धावली देशातील पहिली 'हायड्रोजन ट्रेन'

**। पंतप्रधान मोदींनी दाखविला हिरवा झेंडा**
**। भारत बनला जगातील पाचवा देश**

**जींद, १७ जुलै**

हरयाणातील जींद रेल्वेस्थानकावरून देशातील पहिल्या हायड्रोजन इंधन सेलवर (फ्यूल सेल) चालणाऱ्या प्रवासी ट्रेनला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी हिरवा झेंडा दाखवला. ही ट्रेन उत्तर रेल्वेच्या जींद-सोनिपत रेल्वे मार्गावर धावली. यामुळे देशात स्वच्छ ऊर्जेवर आधारित रेल्वे वाहतुकीची सुरुवात झाली आहे. हायड्रोजन इंधनावर चालणारी ट्रेन सुरू करणारा भारत जगातील पाचवा देश बनला असून, यापूर्वी जर्मनी, फ्रान्स, स्वीडन आणि चीनमध्येच हायड्रोजन ट्रेन धावत आहेत.

हायड्रोजन ट्रेनला हिरवा झेंडा दाखवण्यापूर्वी उपस्थितांना संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, ट्रेनची रचना भारतातील अभियंत्यांनी केली आणि भारतातीलच कंपनीने तिची निर्मिती केली आहे. ही ट्रेन आत्मनिर्भर भारताचे प्रतीक आहे. पारंपरिक इलेक्ट्रिक ट्रेनप्रमाणे ओव्हरहेड वीजवाहिनीवर ही ट्रेन अवलंबून नाही. जींद येथे देशातील सर्वात मोठा रेल्वे हायड्रोजन रिफ्यूलिंग प्लांटही उभारण्यात आला आहे. तिथे हायड्रोजनची साठवणूक, संपीडन (कॉम्प्रेशन) आणि इंधन भरण्याची आधुनिक यंत्रणा सज्ज करण्यात आली . यातून भारताची पहिली एकात्मिक हायड्रोजन रेल्वे परिसंस्था (हायड्रोजन रेल्वे इको-सिस्टीम) तयार झाली आहे. १९२५ ते २०१४ पर्यंत सुमारे ९० वर्षांत देशाच्या रेल्वे नेटवर्कचे केवळ ३० टक्के विद्युतीकरण झाले होते, तर ७० टक्के भाग डिझेलवर अवलंबून होता. गेल्या १२ वर्षांत सुमारे ९९ टक्के रेल्वेचे विद्युतीकरण झाले आहे. पहिल्या हायड्रोजन रेल्वे गाडीनंतर देशात आणखी कमी पल्ल्यांच्या मार्गावर ही रेल्वे चालविण्याचा प्रस्ताव आहे. यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते १४,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या प्रकल्पांचे लोकार्पण केले.

(वृत्तसंस्था)

### अशी आहे रेल्वेची वैशिष्ट्ये

- १० डबे
- २,६०० प्रवासी क्षमता
- ७५ कि.मी. ताशी परिचालन वेग
- ११० कि. मी. ताशी डिझाईन वेग
- ५ ते २५ रुपये भाडे
- ८९ किलोमीटरपर्यंत धावणार

### सुरक्षेची विशेष व्यवस्था

- हायड्रोजन गळती, अतिउष्णता, आग आणि धूर यांचा त्वरित शोध घेणारी बहुस्तरीय सुरक्षा प्रणाली बसवण्यात आली
- आपात्कालीन परिस्थिती उद्भवल्यास हायड्रोजनचा पुरवठा आपोआप बंद होतो.
- डिजिटल स्क्रीन आणि आपत्कालीन परिस्थितीत ट्रेन सुरक्षित ठिकाणी नेण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध आहे

## घटनादुरुस्ती विधेयक सादर होणार नाही ?

**नवी दिल्ली :** संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू होण्यापूर्वी १३० वे घटनादुरुस्ती विधेयक मांडण्यासाठी केंद्र सरकारने गठीत केलेल्या संयुक्त संसदीय समितीचा (जेपीसी) अंतिम अहवाल शुक्रवारी (१७ जुलै) होणाऱ्या बैठकीत स्वीकारला जाणार होता. तथापि, जेपीसी सदस्यांमध्ये एकमत न झाल्यामुळे अंतिम अहवाल स्वीकारण्याचा निर्णय पुढे ढकलण्यात आला आहे. त्यामुळे या पावसाळी सत्रात घटनादुरुस्ती विधेयक येण्याची शक्यता धूसर झाली आहे.

# एसटीच्या तिकिट दरात १३.५६ टक्के वाढ



**मुंबई :** वाढत्या खर्चाचा बोजा आणि डिझेलच्या दरातील वाढीमुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) प्रवाशांच्या तिकिट दरात १३.५६ टक्के वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राज्य परिवहन प्राधिकरणाने एसटीच्या या भाडेवाढीच्या प्रस्तावाला नुकतीच मंजुरी दिली. मात्र, या नव्या दरवाढीसोबतच प्रवाशांना थोडासा दिलासा देत, यापूर्वी साध्या बसेससाठी लागू करण्यात आलेली १० टक्के हंगामी भाडेवाढ महामंडळाने मागे घेतली आहे. नवे दर आज मध्यरात्रीपासूनच लागू होणार आहेत.

आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात आणि पर्यायाने देशात डिझेलच्या दरात मोठी वाढ झाली आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध भत्त्यांमध्ये नुकतीच वाढ करण्यात आली आहे. देखभाल आणि दुरुस्ती: वाहनांचे सुटे भाग (स्पेअर पार्ट्स), टायर आणि गाड्यांच्या दैनंदिन देखभाल खर्चात लक्षणीय वाढ झाली आहे, असे सांगण्यात आले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



महत्वाचे...



## एसआयआर संदर्भात कोणीही वंचित राहू नये याची खबरदारी कार्यकर्त्यांनी घ्यावी : शटगार

**सोलापूर, दि. १७ जुलै-**

सध्या महाराष्ट्रात SIR मतदार पूर्व निरिक्षण मोहीम सुरू आहे. BLO मतदारांच्या घरो -घरी जात आहेत. त्यांच्यासोबत काँग्रेस पक्षाचे BLA-२ बुथ एजंट यानी ही घरोघरी जाऊन सर्वांचे अचूकतेने फार्म भरून घेणे अपेक्षित असून पूर्ण फॉर्म भरल्यानंतर त्याची पोच मतदारांना द्यावी. पात्र मतदारांचे फॉर्म भरून घेणे अपेक्षित असून कोणीही म तदान पासून वंचित राहू नये याची खबरदारी BLO व BLA-२ यांनी घ्यावी असे आवहान अक्कलकोट तालुका काँग्रेस पक्षाच्या BLA-२ च्या मेळाव्यात बोलताना काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी केले. यावेळी व्यासपीठावर अक्कलकोट तालुका काँग्रेसचे अध्यक्ष म ल्लिकार्जुन पाटील, अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष जाहागीर शेख, खासदार प्रणिती शिंदे यांचे स्वीय सहाय्यक पद्मिनी शेट्टीआर, अक्कलकोट शहराध्यक्ष मुस्तफा बळोरगी उपस्थित होते. सूत्रसंचालन गजानंद जकीकोरे केले.

## नेट-सेट-गेट यशानंतर प्रा. डॉ. राहुल पालके यांची एम.ए. हिंदीतही ए+ श्रेणी

**सोलापूर, दि. १७ जुलै-**

ज्ञानाच्या विविध शाखांचा सातत्याने अभ्यास करत आंतरशाखीय दृष्टिकोन जोपासणारे श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी येथील इंग्रजी विभागाचे प्रा. डॉ. राहुल भगवान पालके यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या एम.ए. हिंदी पदव्युत्तर परीक्षेत ए+ श्रेणी प्राप्त करून आणखी एक शैक्षणिक यश संपादन केले आहे. प्रा. डॉ. पालके यांनी यापूर्वी विविध विषयांतील नेट, सेट आणि गेट परीक्षा मिळून २१ वेळा उत्तीर्ण होण्याची उल्लेखनीय काम गिरी केली आहे. त्यानंतर हिंदी विषयातील पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून त्यांनी साहित्याविषयीची आपली आवड आणि बहुविषयक अध्ययनाची बांधिलकी पुन्हा अधोरेखित केली आहे.जून २०२६ मध्ये झालेल्या या परीक्षेत त्यांनी ७७.१४ टक्के गुणांसह ए+ श्रेणी प्राप्त केली. अध्यापन, संशोधन, लेखन आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन यांसोबतच विविध भारतीय भाषा आणि साहित्याचा सातत्याने अभ्यास करणे, हा त्यांच्या शैक्षणिक प्रवासाचा महत्त्वाचा भाग राहिला आहे.



## संस्कृत व्याकरणाच्या ई-इंक उपकरणाच्या डिझाइनला भारत सरकारचे पेटंट

**अणदूर, दि. १६ जुलै-**

येथील जवाहर महाविद्यालयातील संस्कृत विभागाचे अभ्यासक व संशोधक डॉ. गुरबसप्पा नीलकंठ करपे, त्यांची ज्येष्ठ भगिनी कल्पना शिवराज माशाळकर आणि सहकाऱ्यांनी विकसित केलेल्या 'व्याकरण शिकण्यासाठीचे ई-इंक उपकरण' या अभिनव शैक्षणिक साधनाच्या डिझाइनला भारत सरकारचे अधिकृत पेटंट मंजूर झाले आहे. या संशोधनात ज्येष्ठ विधिज्ञ अ‍ॅड. मल्लिनाथ शहाबादे तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. मंगेश वेदपाठक यांचाही सहभाग आहे. ई-इंक व एनएफसी तंत्रज्ञानावर आधारित या उपकरणाद्वारे पाणिनींची सूत्रे, शब्दरचना, धातुरूपे आणि व्याकरण संकल्पना अनुभवाधारित पद्धतीने शिकता येतात. अध्ययन-कार्डच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना त्यांच्या स्तरानुसार धडे, सूत्रे व शब्दसंग्रह तत्काळ उपलब्ध होतात. शाळा, महाविद्यालये, गुरुकुल तसेच स्वयंअध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे उपकरण उपयुक्त ठरणार असून, संस्कृत अध्यापनाला आधुनिक, डिजिटल आणि परस्परसंवादी स्वरूप देणारी ही महत्त्वपूर्ण उपलब्धी मानली जात आहे.











## ए. डी. जोशी ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे नीट परीक्षेत यश

**सोलापूर, दि. १७ जुलै-**

ए. डी. जोशी ज्युनिअर कॉलेज सोलापूरच्या विद्यार्थ्यांनी नीट २०२६ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे. सार्थकराजे सोमनाथ चव्हाण यांनी ५९० गुण मिळवत महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. मृण्मयी कुलकर्णी (५८१), पुष्कराज विनायक पाटील (५५७), नचिकेत बाबनगरे (५४३), ऋतुजा निमगिरे (५३७), जय मुळगे (४९८), हर्षाली मोरे (४९३), राजवर्धन वळसंगकर (४५८), अनुष्का रेड्डी (४५२) आणि पूजा शेगार (४३५) यांनीही उल्लेखनीय यश मिळवले. यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे संस्थापक ए. डी. जोशी, संस्थेचे सचिव अमोल जोशी, सचिवा सायली जोशी, प्राचार्य प्रवीण देशपांडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. विद्यार्थ्यांची जिद्द, सातत्यपूर्ण परिश्रम, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यामुळे हे यश मिळाल्याचे महाविद्यालयाने सांगितले. या निकालामुळे महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा पुन्हा अधोरेखित झाली आहे.

# जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग अडकला गैरप्रकारांच्या गर्तेत

### फार्मासिस्ट नियुक्ती प्रकरण प्रलंबित देयकांसह विविध तक्रारींची होणार चौकशी; आषाढी वारीनंतर निर्णय प्रक्रिया गतीमान होणार : सभापती चेतनसिंह केदार-सावंत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील विविध गैरप्रकारांमुळे निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर मुख्य औषध भांडारातील फार्मासिस्ट लीना पुजारी यांच्या नियुक्ती प्रक्रियेची चौकशी करण्याचे संकेत शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार यांनी दिले आहेत.

मुख्य औषध भांडारात पूर्वी काम केल्याचे कथित बोगस अनुभव प्रमाणपत्र सादर करून नियुक्ती मिळाल्याची तक्रार गंभीर स्वरूपाची असून, चौकशीत आरोपांची सत्यता आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. गेल्या महिनाभरात जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात एकामागून एक गैरव्यवहार, निष्काळजीपणा आणि प्रशासकीय त्रुटी समोर आल्याने विभागाची प्रतिमा धुळीस मिळाली आहे. पानगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात अपघातग्रस्त रुग्ण उपचारासाठी दाखल झाल्यानंतर डॉक्टर व कर्मचारी अनुपस्थित असल्याचे उघड झाल्याने दोन डॉक्टरांविरोधात कारवाईचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे. संबंधित दोन कर्मचाऱ्यांविरुद्धही प्रस्ताव जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे प्रलंबित आहे. याच दरम्यान, मुख्य औषध भांडारातील फार्मासिस्ट लीना पुजारी यांच्या नियुक्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. निवृत्त फार्मासिस्टच्या जागी अनुभवी उमेदवाराची नियुक्ती अपेक्षित असताना, मुख्य औषध भांडारात पूर्वी सेवा बजावल्याचे कथित अनुभव प्रमाणपत्र प्रशासनामार्फत विभागीय आयुक्त कार्यालयात सादर करण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकरणी छावा संघटनेसह विविध संघटनांनी विभागीय आयुक्तांकडे तक्रार केली असून चौकशीचे आदेशही देण्यात आले आहेत.

दरम्यान, कंत्राटी कर्मचाऱ्याने लेखाधिकारी आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या उपस्थितीत केलेल्या गैरवर्तनाची चौकशी सुरू असून, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी तत्काळ कारवाईचे आदेश दिले आहेत

**रुग्णवाहिका चालकांचे मानधन थकीत**

राष्ट्रीय आरोग्य अभियानातील जिल्हा लेखा व्यवस्थापक वैशाली थोरात यांनी कामकाजाचीही स्वतंत्र चौकशी सुरू आहे. १०८/११२ रुग्णवाहिका सेवेत कार्यरत चालकांचे मानधन थकीत ठेवल्याची तक्रार आहे. ठेकेदाराला शासनाकडून निधी मिळाल्यानंतरही अनेक चालकांना मानधन मिळाले नसल्याचा आरोप करण्यात आला असून, काही चालकांना थेट देयके दिली जात असल्याचीही तक्रार प्रशासनापुढे आली आहे.

**आषाढी वारी नंतर कारवाई करणार**

सध्या आषाढी वारीच्या नियोजनात आरोग्य यंत्रणा व्यस्त असून जिल्हा आरोग्य अधिकारी रजेवर असल्याने काही प्रकरणांवरील कार्यवाही प्रलंबित आहे. मात्र वारीनंतर मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्याशी चर्चा करून सर्व प्रकरणांचा आढावा घेत आवश्यक निर्णय घेतला जाईल. सभापती केदार-सावंत यांनी सांगितले.

**मित्रपक्षाच्या तक्रारीचीही दखल**

शिरवळ प्राथमिक आरोग्य केंद्रातील एका आरोग्य सेवकाची अल्पावधीत चार वेळा बदली करण्यात आल्याच्या तक्रारीचीही जिल्हा परिषद प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. शिवसेनेचे नेते सिद्धाराम म्हेत्रे आणि माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांची भेट घेऊन याबाबत निवेदन दिले. या प्रकरणाचीही चौकशी करून दोषींवर नियमानुसार कारवाई केली जाईल, असे सभापती केदार यांनी स्पष्ट केले.

## शिष्यवृत्ती परीक्षेत साक्षी भैरामडगी जिल्हा गुणवत्ता यादीत

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. १७ जुलै-**

वळसंग (ता.द.सोलापूर) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा ग्रामीण गुणवत्ता यादीत श्री शंकरलिंग प्रशालेतील कुमारी साक्षी मल्लिकार्जुन भैरामडगी ही विद्यार्थिनी चमकली असून ती जिल्हास्तरीय शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरली आहे.

गुणवत्ताधारक विद्यार्थिनीस संजयकुमार धनशेट्टी, सिध्दाराम भैरामडगी,बाळकृष्ण गुंड, श्रीमंत भोसले,बसवराज दुधगी, गंगाधर बिराजदार,विजय प्याटी, मल्लिनाथ गौडगाव, शिवराज अष्टगी यांच्यासह कनिष्ठ लिपिक गौरीशंकर



चनशैट्टी यांचे मार्गदर्शन लाभले आहे.या यशस्वी विद्यार्थिनीचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थाध्यक्ष श्रीशैल दुधगी, चेअरमन शिवशरण थळंगे, उपाध्यक्ष विश्वनाथ थळंगे, संचालक शिवशरण प्याटी,प्रकाश दुधगी, रमेश दुधगी,मल्लिनाथ थळंगे, संजय दुधगी, प्राचार्य वीरेश थळंगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांनी अभिनंदन केले.

## शेलगाव येथे हभप अण्णा महाराज वीर यांचे कीर्तन

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि. १७ जुलै-**



शेलगाव (क) ता. करमाळा येथील वारकरी संप्रदायातील निष्ठावंत व्यक्तिमत्त्व कै. रामचंद्र भगवान पायघन यांच्या वर्षश्राद्धानिमित्त प्रसिद्ध कीर्तनकार हभप अण्णा महाराज वीर यांच्या सुश्राव्य कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. या कीर्तनाचा लाभ परिसरातील असंख्य भाविकांनी घेतला. कीर्तनादरम्यान अण्णा महाराज वीर यांनी उपस्थितांना अध्यात्म आणि समाजप्रबोधनाचा मोलाचा संदेश दिला. वैष्णवांच्या संगतीनेच मानवी जीवनाचा खरा आनंद साकार करता येतो, असे सांगत त्यांनी सत्संगाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच, पंढरीच्या पांडुरंगाची मनोभावे भक्ती केल्यास मानवी जीवनात मोक्ष मिळतो, हा वारकरी संप्रदायाचा मुख्य विचार त्यांनी आपल्या रसाळ वाणीतून मांडला.केवळ धार्मिक विचारच नव्हे, तर अण्णा महाराजांनी कीर्तनाच्या माध्यमातून लोकांना विविध सामाजिक उपक्रमांचे धडे दिले. समाजात वावरताना प्रत्येकाने सामाजिक बांधिलकी कशी जपली पाहिजे, यावर त्यांनी विशेष प्रकाश टाकला.कै. रामचंद्र पायघन हे आयुष्यभर वारकरी संप्रदायाशी जोडलेले होते. कार्यक्रमाचे आयोजन त्यांचे सुपुत्र मधुकर पायघन व नानासाहेब पायघन यांनी केले.

## दुचाकी घसरुन जखमी झालेल्या तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १७ जुलै-**

दुचाकी घसरून जखमी झालेल्या वडगाव जहागीर गावच्या तरुणाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज शुक्रवारी सकाळी साडेनऊ वाजता मृत्यू झाला. बबन मुकुंद खंडागळे (वय ३० वर्षे, रा. वडगाव जहागीर, ता. कळंब, जिल्हा धाराशिव) असे त्या मयत दुचाकी स्वाराचे नाव आहे. तो १५ जुलै रोजी सकाळी गावाकडून येरमाळाकडे दुचाकीवरून निघाला असताना वाटेत चोराखळी गावा जवळ दुचाकी स्लिप झाली. यात तो गंभीर जखमी झाला होता. त्याला धाराशिव येथील सरकारी दवाखान्यात उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्याचा उपचारादरम्यान आज सकाळी मृत्यू झाला.

## स्वागत नगरात महिलेची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर** - अज्ञात कारणावरून एका ५५ वर्षीय महिलेने घरातील छताच्या लोखंडी अँगल ला ओढणीच्या साह्याने गळफास घेऊन आत्म हत्या केल्याची घटना स्वागत नगर येथे आज शुक्रवारी सकाळी ११ वाजता उघडकीस आली . सखुबाई जगन्नाथ बंडे ( वय ५५ वर्ष , रा. प्लॉट नंबर १४,स्वागत नगर रोड सोलापूर ) असे त्या गळफास घेतलेल्या महिलेचे नाव आहे. आज शुक्रवारी सकाळी घरामध्ये सखुबाई यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत घरच्यांना आढळून आला . ही खबर एमआयडीसी पोलिसांना समजली असता हवालदार अविनाश शिंदे यांनी घटनास्थळी पोहचून सदरचा मृतदेह शवविच्छेदनासाठी येथील शासकीय रुग्णालयात दुपारी एक वाजता दाखल केला .



## शेळगाव ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा वृक्षसंवर्धनाचा संकल्प

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १७ जुलै-**

बार्शी तालुक्यातील शेळगाव ज्युनिअर कॉलेजच्या इयत्ता बारावी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसरात उत्स्फूर्तपणे वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. विशेष म्हणजे, केवळ झाडे लावण्यापुरते न थांबता त्यांचे संगोपन व संवर्धन करण्याची सामूहिक जबाबदारीही विद्यार्थ्यांनी स्वीकारली आहे.

या उपक्रमाचे शेळगाव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शीचे उपसभापती बाबा गायकवाड यांनी कौतुक करत, वृक्षलागवड ही काळाची गरज असून तरुणांनी पुढाकार घेणे प्रेरणादायी असल्याचे सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य खोत यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. प्राध्यापिका तथा 'एकता महिला मंच'च्या सक्रिय सदस्या प्रा. अनिता मोहिते यांच्या संकल्पनेतून व म ार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. हिंदवी गायकवाड, शिवानी खेंदाड, वैष्णवी गिरी, मयुरी खेंदाड, समृद्धी आवटे, तन्वी देशमुख यांच्यासह अनेक विद्यार्थिनींनी उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या या पर्यावरणपूरक उपक्रमाचे परिसरातून सर्वत्र कौतुक होत आहे.



## करकंबमध्ये नवीन वीज डीपी बसविण्याचा मार्ग मोकळा; उपोषण मागे

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १७ जुलै-**

करकंब गावातील वाढती लोकसंख्या व वाढलेल्या वीज वापरामुळे नवीन विद्युत डीपी बसविण्याच्या मागणीला अखेर यश आले आहे. महावितरणचे उपअभियंता सदानंद निमळे, लाईनमन लोखंडे व सामाजिक कार्यकर्ते सचिन शिंदे यांच्यात झालेल्या बैठकीत प्रशासनाने लेखी आश्वासन दिल्यानंतर सचिन शिंदे यांनी अमरण उपोषण मागे घेतले.

रोजा गल्ली परिसरातील डीपी जळाल्याने वारंवार वीजपुरवठा खंडित होत होता. तसेच वाढलेल्या वीज जोडण्यांमुळे कमी-जास्त दाबाचा त्रास नागरिक व व्यापाऱ्यांना सहन करावा लागत होता. यावर तोडगा म्हणून थोरली वेस, रोजा गल्ली, जिल्हा परिषद उर्दू शाळा, सोमनाथ मंदिर परिसर तसेच गावठाणाबाहेरील शेतकरी भागात नवीन डीपी बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय पीव्हीसी संरक्षण, नवीन वीज खांब उभारणी आणि माळी गल्ली व शुक्रवार पेठ परिसरात नवीन विद्युत पोल बसविण्याची कामेही हाती घेतली जाणार आहेत. या निर्णयाचे नागरिकांनी स्वागत केले आहे.

## शिष्यवृत्तीसाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

आदिवासी विकास विभागाच्या सुवर्णमहोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अनुसूचित जमातीच्या इयत्ता १ ली ते १० वीतील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्रस्ताव संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडे सादर करावेत, असे आवाहन प्रकल्प अधिकाऱ्यांनी केले आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून ही योजना ग्रामविकास व नगरविकास विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली आहे. पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव शासनाच्या नमुन्यानुसार तयार करून गट शिक्षण अधिकारी किंवा महानगरपालिका प्रशासनाकडे तातडीने पाठवावेत. एकही पात्र विद्यार्थी योजनेपासून वंचित राहू नये, याची दक्षता मुख्याध्यापकांनी घ्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## बार्शीच्या विकासाला निधी कमी पडू देणार नाही; मुख्यमंत्र्यांची राजाभाऊंना ग्वाही

### वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री फडणवीस यांची घेतली भेट

**तसा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ जुलै-**

बार्शी तालुक्याच्या विकासकामांना नव्याने गती मिळण्याची चिन्हे निर्माण झाली असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बार्शी तालुक्याच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नसल्याची स्पष्ट ग्वाही दिली आहे. आमदार राजाभाऊ राऊत यांनी मुंबई येथील वर्षा शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन तालुक्यातील विविध प्रलंबित, मंजूर तसेच प्रगतीपथावरील विकासकामांसाठी आवश्यक निधीची मागणी केली.

या भेटीदरम्यान आमदार राजाभाऊ राऊत यांनी बार्शी तालुक्यातील विविध विकासकाम ांचा आढावा मुख्यमंत्र्यांसमोर मांडला. गेल्या दीड वर्षांपासून निधीअभावी रखडलेल्या विकासकामांना गती देण्यासाठी तसेच मंजूर योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती त्यांनी केली. यावेळी मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, राजाभाऊ, काळजी करु नका, बार्शी तालुक्याला निधीची कमतरता पडणार नाही, असे आश्वासन दिले. मुख्यमंत्र्यांच्या या शब्दांमुळे बार्शी तालुक्यातील रखडलेल्या विकासकामांचा बॅकलॉग भरुन निघण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. तालुक्यातील रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य, सिंचन, उद्योग तसेच इतर पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध झाल्यास अनेक महत्त्वाचे प्रकल्प मार्गी लागणार आहेत. त्यामुळे नागरिकांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांनाही न्याय मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# गावातच उद्योजक व रोजगार निर्माण व्हावा : आ. देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१७ जुलै-**

सांगोला तालुक्यातील प्रत्येक गावातून उद्योजक घडावा व गावातील तरूणांना गावातच रोजगार निर्माण व्हावा. त्यासाठी शासनाच्या प्रकिया उद्योग, पर्यटन मंडळ, अण्णासाहेब पाटील म हामंडळ, ओबीसी मंडळ, वसंतराव नाईक महामंडळाचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन लोकमंगल समुहाचे संस्थापक आ.सुभाषबापू देशमुख यांनी केले.

ते लोकमंगल परिवाराच्यावतीने सांगोला येथे आयोजित उद्योजक सुसंवाद मेळाव्यात बोलत होते. प्रास्ताविकात लोकमंगल पतसंस्थेचे संचालक अ‍ॅड. गजानन भाकरे यांनी लोकमंगल परिवाराच्या वतीने राबविण्यात येणा-या सामुदायीक विवाह सोहळा, निराधारांना मोफत घरपोच डबे, अन्नपूर्णा योजना, समृद्ध गाव योजना, वृक्ष लागवड या उपक्रमांची माहिती दिली. तसेच सीए.मिहीर सोलापूरकर यांनी विश्वमंगल या संस्थेबाबत माहिती दिली. याप्रसंगी चर्चासत्र होऊन

'लोकमंगल'चा सांगोल्यात उद्योजक सुसंवाद मेळावा



उपस्थित उद्योजकांच्या विविध प्रश्नांना उत्तरे देण्यात आली. सूत्रसंचालन अ‍ॅड. शिवाजी दरेकर, आभार वैभव लांबोरे यांनी मानले.

**सांगोल्याची जनता प्रामाणिक व कष्टाळू**

भविष्यात सांगोला हे रोजगाराचे मॉडेल बनावे यासाठी लोकमंगल बँक, पतसंस्था व मल्टीस्टेट सोसायटी उद्योजकांना आर्थिक पाठबळ देण्यास सदैव तयार आहेत. सांगोल्याची जनता ही प्रामाणिक असून त्यांच्या कष्टामुळे सांगोल्याचे दुष्काळी पटटा हे नाव पुसले गेले. विश्वमंगल या संस्थेच्या माध्यमातून आपल्या उत्पादनाला जागतिक बाजारपेठ मिळेल.

**-आ. सुभाष देशमुख,** संस्थापक, लोकमंगल समूह

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बँकेचे सुहास वालिकर, विजय स्वामी, ज्योती गुळमिरे, अजय महामुनी, पतसंस्थेचे शाखा अधिकारी दत्तात्रय दिवसे, प्रसाद बुरांडे, ऐश्वर्या दौंडे, साहिल काळे, विद्या राऊत, पृथ्वीराज व्हनमाने यांनी परिश्रम घेतले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# बलुच बंडखोरांच्या हल्ल्यात ४५ पाकिस्तानी सैनिक ठार

**मस्तंग जिल्ह्यात स्फोट**

**नागरिकांवरील अत्याचाराचा घेतला सूड**


स्फोटाच्या ठिकाणी बचाव कार्यासाठी दाखल झालेले पाकिस्तानी लष्कर

**क्वेटा, १७ जुलै**

बलुचिस्तानच्या मस्तंग जिल्ह्यात लष्करी कुमक घेऊन जाणाऱ्या बसच्या ताफ्यावर बलुच लिबरेशन आर्मीने (बीएलए) केलेल्या हल्ल्यात पाकिस्तानचे ४५ सैनिक ठार झाले, तर २५ गंभीर जखमी आहे. स्फोटाने भरलेल्या एका कारने बसला धडक दिली. यानंतर लागलेल्या आगीत पाकिस्तानी लष्कराचे सैनिक होरपळले. घटनेच्या काही तासातच बीएलएने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली.

बीएलएचे प्रवक्ते जियांद बलुच यांनी सांगितले की, गुरुवारी रात्री मस्तंगच्या खडकुचा भागात सशस्त्र गटाच्या 'फताह स्क्वॉड' युनिटने पाकिस्तानी लष्करी कुमक घेऊन जाणाऱ्या बसच्या ताफ्यावर हल्ला केला. अतिशय अचूक आणि सुनियोजित केलेल्या हल्ल्यात ४५ सैनिक ठार झाले, तर २५ गंभीर जखमी आहे. बलुचिस्तानी नागरिकांवर अत्याचार करणाऱ्या पाकिस्तानी लष्कराचा आम्ही सूड घेतला. या हल्ल्यात आमचा एक सदस्य हुतात्मा झाला. स्फोटाने भरलेल्या कारने बसला धडक दिली आणि पाकिस्तानी सैन्याचे चिथडे उडाले. स्फोटानंतर बसला आग लागली. यात अनेक सैनिक जिवंत जळाले. पाकिस्तानी लष्कराला सुरक्षितता हवी असल्यास त्यांनी बलुचिस्तान तत्काळ खाली करावा, अन्यथा मृत्यूशिवाय त्यांना पर्याय राहणार नाही. (वृत्तसंस्था)

### शोधमोहीम, बचावकार्य सुरू

पाकिस्तानी लष्कराच्या एका अधिकाऱ्याने हल्ल्याची पुष्टी करताना सांगितले की, एका बसमधून सैनिक मस्तंग जिल्ह्यात एका मोहीमेवर जात असताना बलुच बंडखोराने आत्मघाती स्फोट घडवून हल्ला केला. घटनेची माहिती मिळताच सुरक्षा दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी बचावकार्य सुरू केले. हल्लेखोरांच्या शोधासाठी व्यापक मोहीम सुरू केली आहे. मृतकांचा आकडा आणि त्यांची ओळख अद्याप पटलेली नाही.

### गोळीबाराच्या काही तासातच प्रत्युत्तर

बलुचिस्तानातील मस्तुंगच्या खडकुचा भागात पाकिस्तानी सैन्याने गुरुवारी सकाळी लष्कराची गोपनीय माहिती बीलएला दिल्याच्या आरोपात नागरिकांवर गोळीबार केला होता. यात दोन ठार आणि चार मुलांसह ११ जण जखमी झाले. या घटनेच्या काही तासातच बीएलएने पाकिस्तानी लष्कराचा सूड घेतला.

### दोन दिवसांपूर्वी तटरक्षक दलावर हल्ला

बलुचिस्तानच्या ग्वादर जिल्ह्यातील जिवानी भागातील पाकिस्तान तटरक्षक दलाच्या छावणीवर बीएलएने हल्ला चढवला होता. यात ३० हून अधिक सुरक्षा कर्मचारी ठार आणि अनेक जण जखमी झाले. मजीद ब्रिगेडच्या एका सदस्याने स्फोटकांनी भरलेली गाडी तटरक्षक दलाच्या छावणीत घुसवून स्फोट घडवला होता. या शक्तिशाली स्फोटामुळे, तटरक्षक दलाची तटबंदी असलेली वसाहतकालीन छावणी पूर्णपणे उद्ध्वस्त झाली.

### न्यूझीलंडमध्ये ५.९ तीव्रतेचा भूकंप

**वेलिंग्टन, १७ जुलै**

न्यूझीलंडच्या दक्षिण बेटाच्या पश्चिम किनाऱ्यावर गुरुवारी ५.९ तीव्रतेचा भूकंप झाला. यूएस जिओलॉजिकल सर्व्हेनुसार, भूकंपाचा केंद्रबिंदू ते-अनाऊ शहराच्या उत्तर-वायव्य दिशेला सुमारे ४२ किलोमीटर अंतरावर होता. त्याची खोली अंदाजे ७६.४ किलोमीटर होती. भूकंपाच्या पृष्ठभूमीवर अधिकाऱ्यांनी त्सुनामीचा इशारा जारी करत लोकांना तात्काळ उंच ठिकाणी स्थलांतरित व्हावे, असे आवाहन केले आहे. यात सध्या कोणतीही मोठी हानी किंवा जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. न्यूझीलंडच्या नागरी संरक्षण विभागाने फेसबुक पोस्टमध्ये म्हटले आहे की, रात्री ९:१४ वाजता फिओर्डलँडमध्ये झालेल्या ५.९ तीव्रतेच्या भूकंपानंतर न्यूझीलंडच्या किनारी भागांमध्ये समुद्राच्या जोरदार आणि असामान्य लाटा तसेच अचानक पाण्याची पातळी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे समुद्रात पोहणारे, सर्फिंग करणारे, मासेमार आणि किनाऱ्याजवळील पाण्यात असलेले इतर लोक धोक्यात येऊ शकतात. (वृत्तसंस्था)

# परदेशी विद्यार्थ्यांना चार वर्षेच राहण्याची परवानगी

**। ट्रम्प यांचा शैक्षणिक व्हिसाधारकांना दणका । भारतीयांची चिंता वाढली**




**वॉशिंग्टन, १७ जुलै**

परदेशी विद्यार्थी, सांस्कृतिक आदान-प्रदान करणारे अभ्यागत आणि पत्रकारांसाठी व्हिसाच्या कालावधीची मर्यादा कडक करण्याचा निर्णय राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतला. नवीन नियमांनुसार, विद्यार्थी आणि एक्सचेंज व्हिसा चार वर्षांपेक्षा जास्त असणार नाहीत आणि अशा व्हिसाधारकांना केवळ चार वर्षेच अमेरिकेत राहण्याची परवानगी राहणार आहे. निश्चित केलेल्या कालावधीनंतर देशात राहणाऱ्या परदेशी नागरिकांना हद्दपार केले जाणार आहे.

सध्या, एफ, जे आणि आय व्हिसाधारक त्यांच्या अभ्यासक्रम, एक्सचेंज प्रोग्राम किंवा माध्यमामधील नोकरीच्या संपूर्ण कालावधीसाठी अमेरिकेत राहू शकतात. नवीन नियमानुसार, या व्हिसाधारकांना आता केवळ चार वर्षेच राहण्याची परवानगी असेल. ट्रम्प यांच्या निर्णयाने भारतीय विद्यार्थी आमि नोकरदारांची चिंता वाढली आहे. या निर्णयाने अमेरिकेत राहणाऱ्या ३ लाखांहून अधिक भारतीयांवर मोठा परिणाम होणार आहे. ट्रम्प यांच्या आदेशाने अमेरिकेच्या 'डिपार्टमेंट ऑफ होमलँड सिक्युरिटी' विभागाने नवे नियम जारी केले. त्यानुसार आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी एफ व्हिसा, सांस्कृतिक आदान-प्रदान कार्यक्रमांतर्गत अमेरिकेत काम करण्याची परवानगी देणारे व्हिसा आणि माध्यमांच्या सदस्यांसाठी आय व्हिसा यांची मुदत चार वर्षे राहणार आहे. (वृत्तसंस्था)

### दहशतवाद्यांना करणाऱ्यांना प्रवेश नाही

दहशतवादी कारवाया, हिंसक गुन्हे किंवा प्रशासनाने दहशतवादी म्हणून घोषित केलेल्या डाव्या विचारसरणीच्या संघटनांना पाठिंबा देणाऱ्या, निधी पुरवणाऱ्या, भरती करणाऱ्या किंवा रसद पुरवणाऱ्या परदेशी नागरिकांना अमेरिकेत प्रवेशबंदी राहणार आहे. दहशतवादी संघटनांना पाठिंबा असलेल्या परदेशी नागरिकांविरुद्ध नवीन व्हिसा निर्बंध धोरण जाहीर करणार असल्याचे ट्रम्प यांनी सांगितले.

# सिंधू करार: पाकिस्तानातील पंजाब 'हाय-अलर्ट'वर

**भारताकडून माहिती न मिळाल्याने मरियम सरकारची वाढली चिंता**

**इस्लामाबाद, १७ जुलै**

मान्सूनचा पाऊस कोसळत असल्याने पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील मरियम नवाज सरकारची चिंता वाढली आहे. भारताने गतवर्षीपासून सिंधू पाणी करार स्थगित केल्यामुळे सरकारने सिंचन विभागाला 'हाय-अलर्ट' मोडवर संभाव्य पुराच्या संकटाचा सामना करण्यासाठी तयार राहण्याचे आदेश दिले आहेत. भारताच्या निर्णयामुळे नदीच्या



प्रवाहाबाबत अनिश्चितता निर्माण झाली असून पंजाबमध्ये पुराची भीती वाढली आहे.

लाहोरचे आयुक्त नौमान युसूफ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीशी संबंधित सूत्रानुसार सिंचन विभाग सोशल मीडिया आणि इतर स्रोतांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे व्यवस्था करत आहे. अचूक मूल्यांकनासाठी ही माहिती अपुरी आहे. त्यामुळे सरकारला व्यापक तयारी करायची आहे. पूर परिस्थिती आणि व्यवस्थेसंदर्भात या बैठकीत पाटबंधारे विभागाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, भारत माहिती देण्याचे टाळत आहे. (वृत्तसंस्था)

### गतवर्षी ८२,९५२ लोकांना बसला फटका

गतवर्षी ऑगस्टमध्ये रावी नदी लाहोरच्या अनेक निवासी भागांमध्ये शिरली होती. त्यामुळे रस्ते पाण्याखाली गेले होते. घरे व इतर पायाभूत सुविधांचे नुकसान झाले होते. या पुराचा परिणाम ३१ गावांवर झाला होता. नदीकिनारी. एकट्या लाहोरमध्येच एकूण ८२,९५२ लोकांना याचा फटका बसला होता. यामुळे पंजाब सरकार पेचात सापडले आहे.

# द्रमुक 'डिलिमिटेशन'बाबत करणार अभ्यास

**गुणवत्तेच्या आधारावर घेणार निर्णय**

**चेन्नई, १७ जुलै**

प्रस्तावित मतदारसंघ पुनर्रचनेबाबतचे विधेयक संसदेत मांडले जाईल तेव्हा त्याचा अभ्यास केला जाईल आणि तामिळनाडूच्या हिताचे रक्षण करण्यासाठी गुणवत्तेच्या आधारावर निर्णय घेतला जाईल, असे डीएमकेने शुक्रवारी सांगितले.

या विधेयकाची व्याप्ती आणि उद्दिष्टे स्पष्ट झाल्यावर त्याचे विश्लेषण केले जाईल आणि निर्णय घेतला जाईल, असे पक्षाच्या सूत्रांनी सांगितले. राज्याच्या हिताचे रक्षण करण्यासाठी डीएमकेचा निर्णय स्वतंत्र आणि गुणवत्तेवर आधारित असेल. प्रस्तावित पुनर्रचना विधेयक हे एक स्वतंत्र कायदेविषयक पाऊल असेल आणि संबंधित कायद्यांच्या एकत्रित संचाचा भाग नसेल, असे बोलले जाते. जागांमध्ये ५० टक्के वाढ आणि राज्यांमधील जागांच्या वाटपाचे सध्याचे प्रमाण कायम ठेवणे या मुद्द्यांवर चर्चा होत आहे. १६ जुलै रोजी झालेल्या पक्षाच्या खासदारांच्या बैठकीत चर्चेसाठी घेतलेल्या विषयांमध्ये मतदारसंघ पुनर्रचनेचाही समावेश होता. लंडनमध्ये असलेले डीएमकेचे अध्यक्ष एम. के. स्टॅलिन यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे या बैठकीला संबोधित केले.

डीएमकेने यापूर्वीच्या स्वरूपातील मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रियेला तीव्र विरोध केला होता आणि यासंदर्भातील घटनादुरुस्ती विधेयक एप्रिलमध्ये संसदेत फेटाळले गेले होते. निवडणुकीनंतर काँग्रेसने टीव्हीके गटाशी हातमिळवणी केली. (वृत्तसंस्था)


# मुसळधार पावसाने रस्ते जलमय; कुंभारवेस नाला ओव्हरफ्लो

**झाडे पडणे, पाणी साचणे, नाला ओव्हरफ्लोच्या घटनांवर आपत्कालीन पथकाची धाव**

## २९ तक्रारींवर पालिकेची तातडीने कार्यवाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

शहरात शुक्रवारी दिवसभर झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक सखल भाग जलमय झाले. कुंभारवेस येथील नाला ओव्हरफ्लो झाल्याने परिसरात काही काळ पाणी साचले, तर जांबमुनी प्रशाला (कुमठा नाका), मोदी स्मशानभूमी, घोंगडे वस्ती येथील कपाळे ब्रिज परिसरातही पावसाचे पाणी साचल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागला. होम मैदानलगतच्या फूड झोन आणि कुच्चीकोरवी नगर येथे झाडे कोसळल्याच्या घटनाही घडल्या.



महानगरपालिकेच्या आपत्कालीन नियंत्रण कक्षाकडे दिवसभरात एकूण २९ तक्रारी व वर्दी प्राप्त झाल्या. पाणी साचणे, नाला ओव्हरफ्लो, झाडे पडणे आदी घटनांची माहिती मिळताच नियंत्रण कक्षाने तातडीने पथके घटनास्थळी रवाना केली. कुंभारवेस येथील नाल्याजवळ संभाव्य धोका लक्षात घेऊन महापालिकेने यापूर्वीच बॅरिकेट्स उभारले होते.

मात्र, पाण्याच्या तीव्र प्रवाहामुळे ही बॅरिकेट्स वाहून गेली. त्यानंतर आपत्कालीन पथकाने त्वरित घटनास्थळी पोहोचून आवश्यक उपाययोजना केल्या आणि परिसर सुरक्षित केला. घोंगडे वस्ती येथील कपाळे ब्रिज परिसरात साचलेला मोठ्या प्रमाणातील चिखल , गाळ पालिका कर्मचाऱ्यांनी तातडीने हटविला. या वेळी स्थानिक नगरसेविकेचे पती बडगु यांनी घटनास्थळी उपस्थित राहून आवश्यक सूचना केल्या.

आपत्कालीन नियंत्रण कक्षाचे उपअभियंता संगमनाथ उप्पीन हे नागरिकांकडून तक्रारी प्राप्त होताच संबंधित पथके घटनास्थळी पाठवत असून अनेक ठिकाणी स्वतःही भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेत आवश्यक कार्यवाही केली. त्यामुळे तक्रारींचे जलद निवारण होत असल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

दरम्यान, दरवर्षी पावसाळ्यात पाणी साचणारा गणेश शॉपिंग सेंटर परिसर यंदा दिलासादायक ठरला. येथील नाला सुरळीत वाहत असल्याने पेट्रोल पंपाला पाण्याचा वेढा पडण्याची परिस्थिती यावेळी निर्माण झाली नाही. नाल्याच्या पूर्वतयारीच्या कामांचा याचा सकारात्मक परिणाम झाल्याचे बोलले जात आहे.

नगरसेवक, आपत्कालीन नियंत्रण कक्ष आणि महापालिकेची यंत्रणा यांच्या समन्वयातून तक्रारींवर तातडीने कार्यवाही होत असल्याचे चित्र शुक्रवारी शहरभर पाहायला मिळाले. प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि आपत्कालीन परिस्थितीत नियंत्रण कक्षाशी त्वरित संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख

# भारतीय रेल्वेत आता हायड्रोजन युग

देशातील पहिल्या हायड्रोजन रेल्वेचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुक्रवारी लोकार्पण झाले आणि भारतीय रेल्वेच्या इतिहासात एका नव्या युगाचा प्रारंभ झाला. इंधनाच्या क्षेत्रात एक नवे क्रांतीही झाली, असे म्हणावे लागेल. हरयाणातील जिंद रेल्वे स्थानकातून सोनिपतला रवाना झालेल्या या गाडीने भारतीय रेल्वेच्या गौरवशाली इतिहासात एका नवे सोनेरी पान जोडले गेले. सुवर्णाक्षरांनी नोंद करावी, अशी ही घटना. हायड्रोजनवर धावणारी देशातील पहिली गाडी पर्यावरणानुकूल आणि स्वच्छ भारताचे प्रतीकही आहे.

हायड्रोजन गाडीमुळे चीन, फ्रान्स आणि जर्मनी या जगातील तीन विकसित देशांच्या यादीत भारताचा समावेश झाला आहे. सध्या या तीनच देशांत हायड्रोजनवरील गाड्या धावत आहेत. जे तंत्रज्ञान अजूनपर्यंत ब्रिटन आणि अमेरिका या देशांमध्ये वापरले गेलेले नाही, ते भारतात आले, ही तमाम भारतीयांच्या दृष्टीने आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. देशात एकेकाळी कोळशावर रेल्वेगाड्या धावत होत्या. काळा-काळा धूर हवेत सोडणाऱ्या या गाड्या प्रवाशांची गरज भागवत असल्या, तरी त्यांचा चेहरा आणि कपडे काळे करायलाही मागेपुढे पाहत नव्हत्या. पर्यावरणाचे जे नुकसान व्हायचे ते वेगळेच. लहान मुलांना मामाच्या गावाला जाण्यासाठी रेल्वे ही वाहतुकीचा स्वस्त आणि मस्त पर्याय होता. त्यातूनच 'झुकझुक झुकझुक अगीन गाडी, धुरांच्या रेषा हवेत सोडी, पळती झाडे पाहू या, मामाच्या गावाला जाऊ या' या त्या काळी गाजलेल्या लोकप्रिय गीताने अनेकांचे बालपण समृद्ध आणि आनंदी केले होते. त्यानंतर भारतीय रेल्वेत डिझेल इंजिनचे युग सुरू झाले. कालांतराने रेल्वे विद्युत इंजिनावर धावू लागली आणि आता हायड्रोजनवर भारतीय रेल्वे धावू लागली आहे. रेल्वेची ही प्रगती सर्वांनाच थक्क करणारी म्हणावी लागेल.

रेल्वे हे देशातील प्रवासाचे सर्वात स्वस्त, मस्त आणि आनंददायी साधन आहे. रेल्वेचा प्रवास हा नेहमीच सानथोरांसाठी आनंददायी राहिला आहे. भारतीयांची प्रवासासाठीची पहिली पसंती ही आजही रेल्वेच आहे. त्यामुळे वर्षभर सर्व रेल्वेगाड्या भरभरून धावत असतात. अनेक गाड्यांची प्रतीक्षा यादी तीन-चारशेपर्यंत जात असते. रेल्वेने प्रवास केला नसेल, असा माणूस शोधूनही सापडणार नाही. इंग्रजांनी रेल्वे भारतात आणली असली तरी नंतर भारतीयांनी या रेल्वेचे जे अत्याधुनिकीकरण केले, ते सर्वांची मान आनंदाने आणि अभिमानाने उंचावी असे आहे. २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील रालोआ सरकारने देशवासीयांना बुलेट ट्रेनचे नुसते स्वप्नच दाखवले नाही तर ते प्रत्यक्षात येण्याच्या जवळ पोहोचले आहे. १५ ऑगस्ट २०२७ ला बुलेट ट्रेनचा पहिला टप्पा सुरू होणार असल्याची घोषणा रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नुकतीच केली आहे.

आखाती युद्धामुळे जगात इंधनाचे कधी नव्हे ते गंभीर असे संकट उद्भवले आहे. जगभरात पेट्रोल आणि डिझेलची टंचाई निर्माण झाली, त्यांच्या किमती वाढल्या. भारताला पेट्रोल आणि इंधन आयात करावे लागते. त्यासाठी मोठ्या प्रमाणात परकीय चलन खर्ची पडते. पेट्रोलची आयात कमी व्हावी आणि परकीय चलनाची बचत व्हावी म्हणून पेट्रोलमध्ये टप्प्याटप्प्याने इथेनॉल मिसळण्याचा प्रयोग सुरू झाला; तो यशस्वीही झाला. इंधनाच्या क्षेत्रात देशाला आत्मनिर्भर करण्याचा विडा विकसित भारताचे स्वप्न पाहणाऱ्या पंतप्रधान मोदी यांनी उचलला आहे. त्यातून पर्यायी इंधनाचा शोध घेण्याची प्रक्रिया सुरू झाली. या शोधाची परिणती म्हणजेच सीएनजी आणि विजेवर चालणाऱ्या गाड्यांचे युग भारतात सुरू झाले. त्यात आता हायड्रोजन या इंधनाची भर पडली आहे. विजेवर धावणाऱ्या गाड्यांना ओव्हरहेड वायरमधून विजेचा पुरवठा केला जातो. हायड्रोजनवर धावणाऱ्या गाड्यांमध्ये हायड्रोजन आणि ऑक्सिजनची रासायनिक अभिक्रिया होऊन विद्युत निर्मिती होते. कोळशावर आणि डिझेलवर चालणारी इंजिने ज्याप्रमाणे स्वतःच ऊर्जा निर्मिती करीत असतात, त्याप्रमाणे हायड्रोजनवर चालणारी इंजिनेही ऊर्जा निर्मिती करणार आहे.

देशाला आज स्वच्छ आणि पर्यावरणानुकूल इंधनाची गरज आहे, जी हायड्रोजनमुळे पूर्ण होणार आहे. हायड्रोजनवर चालणाऱ्या चारचाकी गाड्या आधीच बाजारात आल्या आहेत. पर्यायी इंधनाचा आग्रही आणि सातत्याने पुरस्कार करणारे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी स्वतः या गाड्या वापरतात, हे साऱ्यांनाच ठाऊक आहे. पर्यायी इंधनाचा शोध घेणे ही काळाची गरज असली, तरी तशा गाड्या सर्वसामान्य माणसाच्या खिशाला परवडतील, अशा दरात उपलब्ध झाल्या पाहिजेत.

रेल्वेमंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यापासून भारतीय रेल्वेचा कायाकल्प करण्याचा संकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मार्गदर्शनात रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सोडला आहे. वैष्णव हे मूळचे सनदी अधिकारी असल्यामुळे त्यांना प्रशासन कसे चालते, याची पूर्ण जाणीव आहे. त्यामुळे भारतीय रेल्वेला फक्त गतिमानच नाही तर अत्याधुनिक करण्याचा विडा वैष्णव यांनी उचलला आहे. रेल्वेची गतिमानता, कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढविण्यासाठी आणि तिला अत्याधुनिक बनवण्यासाठी वर्षभरात ५२ महत्त्वाकांक्षी सुधारणा करण्याची घोषणा वैष्णव यांनी केली आहे. दोन टप्प्यांत मिळून आतापर्यंत १७ सुधारणा कार्यान्वितही झाल्या आहेत. 'वंदे भारत' आणि 'अमृत भारत' गाड्या धावू लागल्या आहेत. २०१४ च्या आधीचा रेल्वे प्रवास आणि सध्याचा रेल्वे प्रवास यातील फरक सगळ्यांनाच जाणवू लागला आहे. गाड्या वेळेवर धावू लागल्या. स्वच्छता प्रवाशांना भावू लागली. रेल्वेस्थानकातील सुविधांत वाढ झाली. अनेक रेल्वेस्थानके तर विमानतळांनाही लाजवू लागली. सरकार दूरदृष्टीचा आणि विकासाचे महत्त्व समजणारे असले तर काय होऊ शकते, हे मोदींनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दाखवून दिले आहे. सरकारने देशातील रेल्वेचा चेहरामोहरा बदलून टाकला. जिंद ते सोनिपत हे ९० किमीचे अंतर कापणाऱ्या या हायड्रोजन गाडीला १० डबे राहणार असून यातील ८ प्रवासी डबे तर २ पॉवर कार आहेत. या गाडीत तयार करण्यात आलेल्या विशेष प्रकारच्या टाक्यांत हायड्रोजन वायू (गॅस) भरला जाईल. जिंद येथे हायड्रोजन गॅस तयार करण्याचा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. याठिकाणी विजेचे पाण्यासोबत इलेक्ट्रोलिसिस करून हायड्रोजन गॅस तयार केला जाईल. नंतर हायड्रोजनला फ्युल सेल नामक उपकरणाच्या माध्यमातून ऑक्सिजनसोबत मिळवून वीज निर्मिती केली जाईल. वीज इंजिनाच्या मोटारपर्यंत पोहोचून ही गाडी धावणार आहे. यातून धूर म्हणजे कार्बन डायऑक्साईड निघणार नाही. फक्त वाफ आणि उष्णता बाहेर पडेल, त्यामुळे सभोवतालच्या वातावरणात कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होणार नाही. डिझेलवर धावणाऱ्या गाड्यांच्या तुलनेत या गाडीतून शून्य उत्सर्जन होणार आहे. त्यामुळे तापमानात वाढ होणार नाही. हायड्रोजनवर धावणारी ही गाडी म्हणजे मानवी बुद्धी आणि विज्ञानाचा एकत्रित चमत्कारच म्हणावा लागेल. 'मोदी है तो मुमकिन है' असे उगीच म्हटले जात नाही. 'जे न देखे रवी ते देखे कवी' असे म्हटले जात होते; त्याच धर्तीवर 'जे न करे कोई, वो करे मोदी' असे म्हणायला हरकत नाही. येत्या काळात देशातील अनेक मार्गांवर हायड्रोजन गाड्या धावायला सुरुवात झाली तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. वंदे भारत गाड्यांनी देशातील लोकांचे मन जिंकले आहे. परिणामी वंदे भारत गाड्यांची मागणी आणि लोकप्रियता वाढली आहे. उद्या अशीच लोकप्रियता हायड्रोजनवर धावणाऱ्या गाड्यांनाही लाभणार आहे. तो दिवसही फार दूर नाही. रेल्वे क्षेत्रात देशाला हायड्रोजन युगात नेल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या समस्त सहकाऱ्यांचे अभिनंदन केले पाहिजे. ■

## स्मरण


### सुधीर पाचपोर

# प्रेमळ मनाचा संघ समर्पित स्वयंसेवक

**आज १८ जुलै रोजी ज्येष्ठ स्वयंसेवक आणि मुस्लिम राष्ट्रीय मंचाचे राष्ट्रीय संयोजक कै. विराग पाचपोर यांचा प्रथम मासिक स्मृतिदिन. त्यानिमित्त त्यांच्या बंधूंनी दिलेली श्रद्धांजली...**

विराग श्रीकृष्ण पाचपोर हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक, नामवंत पत्रकार, लेखक आणि मुस्लिम राष्ट्रीय मंचाचे राष्ट्रीय संयोजक होते. ते माझे मोठे बंधू. वडिलांचे निधन झाल्यानंतर आम्हा भावंडांना त्यांची उणीव जाणवू न देणारा सर्वांचा आधार. तो अचानक आम्हाला परके करून निघून गेला. बाबांच्या तालमीत तयार झालेल्या विरागजींच्या आयुष्याची सुरुवात संस्कार आणि शिस्तीने परिपूर्ण अशी झाली. शाखेत जात असल्याने संघ संस्कारांनी युक्त असे विरागजी आयुष्यभर देशसेवेसाठी कार्यरत राहिले. त्यांनी राष्ट्रहित, सामाजिक समरसता आणि वैचारिक प्रबोधनासाठी मोठे योगदान दिले. वयाच्या ७४ व्या वर्षी, १८ जून २०२६ रोजी त्यांचे निधन झाले.

त्यांचा जन्म ६ एप्रिल १९५२ रोजी नागपूर येथे झाला होता. वडील सरकारी नोकरीत असल्याने सातत्याने बदली व्हायची. अनेक गावांमध्ये निवास करावा लागत असल्याने समाजातील वेगवेगळ्या लोकांशी संपर्क असायचा. त्यामुळे माणसे जोडण्याची कला लहानपणापासूनच त्यांच्यात होती. द्वितीय सरसंघचालक प. पू. गोळवलकर गुरुजींच्या सांगण्यावरून आमचे वडील यवतमाळला स्थायिक झाले. विरागजींचे शालेय शिक्षण यवतमाळच्या विवेकानंद शाळेत झाले. त्यानंतर त्यांनी वाणिज्य महाविद्यालयातून पदवी प्राप्त केली. यवतमाळला असताना अभाविपचे मंत्री म्हणून सामाजिक जीवनाची सुरुवात त्यांनी केली. काही वर्षे शिक्षकाची नोकरी केल्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते नागपूरला गेले आणि भूगोलात एम. ए. केले. पुढे संघाच्या सांगण्यावरून १९७५ साली पूर्वांचलात कामाला सुरुवात केली. विवेकानंद केंद्रातर्फे सेवाव्रती म्हणून अरुणाचल प्रदेशातील बोमडीला या चीनच्या सीमेला लागून असलेल्या गावात शिक्षकाची नोकरी करतानाच तेथे सामाजिक कार्याला सुरुवात केली. ते अरुणाचलला गेल्यानंतर लगेच आणिबाणी घोषित झाली. संघाच्या अनेक पदाधिकाऱ्यांना अटक झाली. माझे वडीलही तुरुंगात होते. मोठा भाऊ अरुणाचलात. जवळजवळ सहा महिन्यांनंतर विराग सुखरूप असल्याचा निरोप आला. अरुणाचलात अनेक समस्यांना तोंड देत, ख्रिश्चन मिशनरीजच्या कामाने व्यापलेल्या या भागात हिंदुत्वाचा भाव जागृत करणे हे अतिशय कठीण काम संघाने सुरू केले होते. कुठल्याही परिस्थितीत हा भाग भारतभूमीच्या मुख्य प्रवाहात आणायचा असा दृढ निश्चय करीत अनेक स्वयंसेवक संघकार्यासाठी पुढे आले. त्यात विराग होता याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. पुढे विद्याभारती या संघाच्याच स्वयंसेवकांनी सुरू केलेल्या संस्थेत आसाम प्रांताचा ऑर्गनायझिंग सेक्रेटरी म्हणून कामाची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे पार पाडली. प. पू. सुदर्शनजी त्यावेळी आसाम प्रांताचे प्रचारक होते. त्यावेळचे सरकार्यवाह शेषाद्रींच्या सांगण्यावरून विरागजींना मा. सुदर्शनजींनी आसाम येथील दि सेन्टिनलया इंग्रजी दैनिकात सहसंपादक म्हणून काम करण्यास सांगितले. पुढच्या काळात मराठीवरही विशेष मेहनत घेतली. इंग्रजी लेखांच्या मराठी भाषांतराचे काम ते मागून घ्यायचे. मराठी पत्रकारितेत आपला दबदबा निर्माण करून ते पुन्हा इंग्रजी वृत्तपत्रांकडे वळले. 'हितवाद' या दैनिकात जवळजवळ २० वर्षे काम केले. २०१० मध्ये त्यांनी 'हितवाद'चा निरोप घेतला आणि पुढच्या १० वर्षांच्या काळात ते 'न्यूज भारती डॉट कॉम' या न्यूज पोर्टलचे संपादक म्हणून कार्य करू लागले. त्यांचे इंग्रजीसह मराठी, हिंदी, आसामी, बंगाली अशा अनेक भाषांवरही प्रभुत्व होते. चौकस बुद्धी, मान्यवरांशी असलेले सौहार्दपूर्ण संबंध आणि प्रत्येक विषयाच्या खोलाशी जाऊन त्याचे योग्य विवेचन करण्याची हातोटी यामुळे ते या क्षेत्रातही नावलौकिक करू शकले. अभ्यासाची व वाचनाची आवड विलक्षणच होती. त्या काळात आसाममध्ये बोडो आंदोलनाने अतिशय तीव्र स्वरूप धारण केले होते. विद्यार्थी नेते प्रफुल्ल मोहंती, अन्य विद्यार्थी नेते तसेच राजकीय नेते या आंदोलनात सक्रिय सहभागी होते. या आंदोलनाचा विरागजींचा विशेष अभ्यास होता. त्यावरील त्यांचे अनेक लेख तरुण भारतमध्ये छापून यायचे. आसामच्या वास्तव्यात अनेक ज्येष्ठ संघ प्रचारकांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. इस्लाम आणि ख्रिश्चन धर्म यांच्यावर त्यांचे सखोल चिंतन होते. विरागजींचे या विषयावरील 'दि इंडियन चर्च' हे अतिशय अभ्यासपूर्ण पुस्तक प्रसिद्ध आहे. 'राष्ट्रीय परिप्रेक्ष्य में भारतीय मुस्लिम' हे मुस्लिम राष्ट्रीय मंचाचे महम्मद अफजल यांच्याबरोबर लिहिलेले पुस्तक विषयाला कलाटणी देणारे ठरले. विशेष अभ्यासामुळे मुस्लिम तसेच ख्रिश्चन समाजाबरोबर काम करण्यासाठी विरागजींचे बरेच योगदान होते. संघाचे काम या समाजांतील मान्यवरांना समजून सांगणे आणि संघाबद्दलचे त्यांचे गैरसमज दूर करणे असे दायित्व त्यांनी यशस्वीपणे निभावले. मुस्लिम राष्ट्रीय मंचाच्या राष्ट्रीय संयोजकपदाची जबाबदारी त्यांच्याकडे होती. अनेक वेळा जे मुस्लिम कार्यकर्ते मा.



इंद्रेशजींच्या समोर म्हणणे मांडण्यास कचरत, ते विरागजींशी सहज बोलत. या कामात त्यांच्या पत्नी सुषमा वहिनींचा मोठा वाटा होता. त्याही मुस्लिम महिलांना या प्रवाहात जोडण्यासाठी काम करत. पुण्यात राष्ट्रीय विचाराचे 'एकता' हे मासिक निघते. प. पू. बाळासाहेब देवरस यांच्या जन्मशताब्दीनिमित्त विरागजींनी त्यात वर्षभर लेखमाला लिहिली. पुढे त्या लेखांचेही पुस्तक झाले. मा. इंद्रेशकुमारजींच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले. स्नेहल प्रकाशनने 'देवरस पर्व' हे पुस्तक प्रकाशित केले. या पुस्तकाला विदर्भ साहित्य संघाचा पुरस्कारही प्राप्त झाला. विवेकानंद सार्ध शतीनिमित्त 'विवेकानंद आणि क्रिश्चियानिटी' या विषयावर विरागजींनी इंग्रजी पुस्तक लिहिले. असे वेगवेगळ्या विषयांवर त्यांचे सतत लेखन सुरू होते.

ख्रिश्चन धर्मीयांशी चर्चा करून त्यांच्यातही राष्ट्रीय वृत्ती जागविण्याचा त्यांचा प्रयत्न असे. मा. सुदर्शनजी यांनी 'भारतीय ख्रिश्चन' ही संकल्पना मांडली होती आणि भारतीय चर्च असावेत, असा आग्रह धरला होता. ती कल्पना रुजवण्यासाठी विरागजी कार्यरत होते. ख्रिश्चन धर्मग्रंथांचा त्यांचा भरपूर अभ्यास असल्यामुळे त्या धर्मातील लोकांशी केलेल्या त्यांच्या चर्चा गाजत असत. नागपूरच्या 'इंटरनॅशनल सेंटर फॉर कल्चरल स्टडीज' या संस्थेचे विरागजी तीन वर्षे अध्यक्ष होते आणि २००९ साली त्यांच्या नेतृत्वात नागपूरला एक आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजनही या सेंटरने केले होते. विरागजींनी विपुल प्रमाणात लेखन केले. त्यांच्या या मूलभूत अध्ययनाला मानाचा मुजरा देण्यासाठीच सा. विवेकच्या वतीने त्यांना कै. राजाभाऊ नेने पुरस्कार नुकताच देण्यात आला.

१८ जूनला रात्री आपल्या कुटुंबाबरोबर त्यांनी भोजन केले आणि झोपायला गेले. सकाळी साडेपाचला उठणारे विरागजी का उठले नाहीत, हे बघायला सुषमा वहिनी गेल्या असताना त्यांना विरागजींचा मृतदेहच पाहावा लागला. त्यांचा मृत्यू धक्कादायक आणि चटका लावणाराही होता. शांत स्वभाव, अभ्यासू वृत्ती आणि दूरदर्शी विचार यामुळे ते संघ परिवार, पत्रकारिता आणि मुस्लिम राष्ट्रीय मंचाच्या कार्यकर्त्यांमध्ये लोकप्रिय होते. संघ परिवारातील मान्यवरांखेरीज मुस्लिम, ख्रिश्चन व बौद्ध बांधवही मोठ्या संख्येने त्यांच्या अंत्ययात्रेत उपस्थित होते. श्रद्धांजली सभेत इंद्रेशजी यांचे भाषण झाले. त्यांनी विरागजींचे शांतपणे ऐकून घेणे, अभ्यासून प्रकटणे या गुणांचा आवर्जून उल्लेख केला. सर्व जाती-धर्मांचा 'डीएनए' हा हिंदूंचाच आणि भारतीय आहे, ही बाब इंद्रेशजींनी अधोरेखित केली. त्या 'डीएनए'मुळेच छत्तीसगढ, गुजरात येथूनही मोठ्या संख्येत मुस्लिम बांधव विरागजींना अखेरचा निरोप द्यायला आले होते. माझा मोठा भाऊ असला, तरी तो अनेकांचा मार्गदर्शक व विचारवंत होता. त्यांचे विचार पुढील काळात अनेकांना मार्ग दाखवतील, यात शंकाच नाही. माझ्या भावाला आदरांजली. ■

पुणे। ९३७१००११७०

## वेध

### सोनाली पवन ठेंगडी

# लग्न नको, मूल तर नकोच नको...!

पदवीधर असणारी निकिता म्हणते, मला लग्न करायचे नाही. आई-बाबा तुम्ही लग्न करून काय मिळवले? आईची वणवण, तुमचा संघर्ष हे सगळं काही मी पाहिलं आहे. मला असे आयुष्य जगायचे नाही. त्यामुळे मला लग्नाचा आग्रह करू नका. मला माझे स्वातंत्र्य गमवायचे नाही. अभियांत्रिकीचे शिक्षण घेतलेला तुषार म्हणतो, लग्न करून एकाच जोडीदारासोबत आयुष्य घालवणे, या आदर्शवादाच्या भानगडीत पडणे फारसे प्रॅक्टिकल नाही. लग्नामुळे कुठेतरी घर घ्या, नोकरीत कॉम्प्रमाईज करा, कुटुंबासाठी वेळ काढा इतक्या झंझटीत कोण पडणार? मी लग्न करणार नाही. एकटा राहील, जगभर भ्रमंती करेन. कोणाचे पाश नको.

निकिता आणि तुषार हे 'जेन झी' प्रतिनिधी आहेत. त्यांचे विचार ऐकून त्यांच्या आई-वडिलांची चिंता वाढली आहे की, ही मुलं आयुष्य एकट्याने कसे काढणार? पण, ही दोन केवळ उदाहरणे आहेत. प्रत्यक्षात आजच्या पिढीत लग्नाची, मुलांची जबाबदारी नको, ही मानसिकता मूळ धरताना दिसते आहे. त्यातही काही तरुण-तरुणी म्हणतात, लग्न नको...तर जे लग्नासाठी तयार होतात ते नंतर म्हणतात, मूल नको. ही मानसिकता कुठेतरी सामाजिक स्वास्थ्यासाठी फारशी पोषक नाही. जवळपास २० वर्षांपूर्वी जेव्हा कॉर्पोरेट क्षेत्रातील नोकऱ्यांचे चलन सुरू झाले तेव्हा 'डबल इन्कम नो किड्स' अर्थात 'डिंक' फॉर्म्यूला चर्चेत आला होता. दोघेही कमावतात, पण त्यांना अपत्य नको, या विचाराने अनेक जोडप्यांना अक्षरशः झपाटले होते. आताची तरुण पिढी तर त्याही पलीकडे जाऊन लग्न नको आणि मूल तर नकोच, अशा विचारांच्या वाटेवर चालण्याच्या तयारीत दिसते आहे.



मुळात, पालकांनी हे मुलांना समजावण्याची गरज आहे की, लग्न ही त्यांना वाटते तशी वैयक्तिक बाब नाही. हा सामाजिक विषय आहे. मानवाच्या नैसर्गिक गरजेला राजमार्गाने भागविण्याचा हा समाजमान्य शिरस्ता आहे. पण, म्हणून याचा उद्देश केवळ शारीरिक गरज भागवणे हा नाही तर याद्वारे नवीन प्रजा निर्माण करण्याचे म्हणजे एक नवीन पिढी जन्माला घालण्याचे कार्य होत असते. काही वर्षापूर्वीपासूनच लग्न नको, मूल नको या विचारांनी गारूड घातल्याने आता अनेक देशांमध्ये लोकसंख्येची कमतरता जाणवते आहे. अनेक समाजांमध्ये नवीन पिढी निर्माण कशी होणार, ही चिंता भेडसावते आहे.

दक्षिण कोरियाचे एक ताजे उदाहरण वाचण्यात आले. तेथे नोकरीची व्यस्तता, कमी सामाजिक संवाद, एकटेपणा आणि डिजिटल जीवनशैलीने नातेसंबंध निर्माण करण्याच्या संधी कमी केल्या आहेत. विवाह कमी होत आहेत. अशा परिस्थितीत बौद्ध भिक्खू तरुणांना जोडीदार शोधण्यात मदत करीत आहेत. बौद्ध मंदिरे केवळ आध्यात्मिक केंद्र नाहीत, तर आता देशाचा घटता जन्मदर आणि तुटलेले सामाजिक संबंध जोडण्याचे नवीन माध्यम बनत आहेत. दक्षिण कोरियातील पालगोंगसान पर्वतावर वसलेल्या आठव्या शतकातील डोंगह्वासा मंदिरात नुकतेच ३० तासांचे डेटिंग रिट्रीट झाले. येथे बौद्ध भिक्खूंनी तरुणांना लग्न करून कुटुंब वसवण्याचे आणि संतती जन्माला घालण्याचे महत्त्व सांगितले. डेटिंग रिट्रीटचे आयोजक भिक्खू यू चोल-जू यांनी तरुणांना सांगितले, 'तुम्ही देशाला वाचवण्याच्या मोहिमेवर आहात. जोडीदार शोधा. लग्न करा आणि कुटुंब वाढवा.' पूर्वी भिक्खू देशाला बाह्य आक्रमणांपासून वाचवण्यासाठी पुढे येत असत. आज सर्वात मोठे संकट घटता जन्मदर आहे, त्यामुळे समाजाला मदत करणे हे आपले कर्तव्य आहे, या भावनेतून ते कार्य करत आहेत. ही कोरियाची बाब झाली, पण आपल्या देशात आंध्रप्रदेश सरकारने तिसरे अपत्य जन्माला घाला, असे सांगण्याची वेळ आली आहे. सुजाण, सुशिक्षित युवावर्ग जेव्हा एखाद्या सामाजिक शृंखलेला तोडू पाहतात तेव्हा तो विषय चिंतेचा ठरतो. कारण चांगल्या समाजाच्या निर्मितीसाठी लग्न, अपत्य ही सर्व सामाजिक कर्तव्ये नितांत गरजेची आहेत. त्यावर नवीन पिढी म्हणते की, आजच्या महागाईच्या काळात अपत्यांचे शिक्षण, संगोपन कठीण झाले आहे. तेही मान्य केले तरीसुद्धा समाजनिर्मितीचा विषय कमी महत्त्वाचा ठरत नाही. मूल कसे वाढवायचे, हा विषय शेवटी प्रत्येक जण आपल्या कुवतीनुसार ठरवत असतो. आपण चांगले संगोपन आणि शिक्षण याची जी व्याख्या केली आहे त्यात बदल करण्याची गरज आहे. खूप महागड्या शाळेत घातल्याने मुलांचा विकास चांगला होतो, त्यांना महागडे कपडे, खेळणे दिले तर आपण चांगले पालक होतो, असे मुळीच नाही. चांगले संगोपन म्हणजे चांगले संस्कार. अर्थात, नव्या काळातील हा विषय फार मोठा आणि व्यापक आहे. प्रत्यक्षात बदलत्या काळात परंपरा आणि आधुनिक विचार यांच्यात समतोल साधणे, हीच काळाची खरी गरज आहे. ■

९४०३२११६७३

## मुंबई वार्तापत्र

### नागेश दाचेवार

# मुंबईचे मालेगाव होणार?

महाराष्ट्राच्या राजकारणात आणि समाजकारणात 'मालेगाव मॉडेल' हे एका विशिष्ट जनसांख्यिकीय बदलासाठी आणि तिथल्या बदललेल्या राजकीय समीकरणांसाठी ओळखले जाते. मुंबईत सध्या सुरू असलेला संशयास्पद जन्म दाखल्यांचा खेळ, अनधिकृत शाळांचा सुळसुळाट आणि एकाच पत्त्यावर शेकडो-हजारो मतदारांची झालेली नोंदणी पाहता, आता मुंबईचे मालेगाव होणार का? असा अत्यंत रास्त आणि तितकाच भीतिदायक प्रश्न उपस्थित केला जात आहे. जर कागदपत्रांची ही बोगसगिरी अशीच सुरू राहिली आणि मुंबईसारख्या देशाच्या आर्थिक राजधानीत परदेशी घुसखोरांनी किंवा अपात्र घटकांनी मतदार यादीत पद्धतशीरपणे ताबा मिळवला, तर भविष्यात मुंबईची राजकीय आणि सामाजिक परिस्थिती मालेगावसारखी व्हायला वेळ लागणार नाही. हा केवळ एका शहरापुरता मर्यादित असलेला प्रश्न नसून मुंबईच्या मूळ भौगोलिक आणि सांस्कृतिक रचनेलाच सुरुंग लावणारे हे एक भयानक कारस्थान आहे, ज्याचा वेळीच बीमोड करणे गरजेचे आहे.

गेल्या काही महिन्यांपासून भारतीय जनता पक्षाचे धडाडीचे नेते किरीट सोमय्या यांनी 'व्होट जिहाद', 'स्कूल जिहाद', 'बनावट जन्म प्रमाणपत्र रॅकेट' आणि 'परदेशी घुसखोरांचे मतदार यादीतील पद्धतशीर घुसपेठ' यांसारख्या अत्यंत संवेदनशील आणि स्फोटक मुद्यांवर रणशिंग फुंकले होते. जेव्हा सोमय्या यांनी हे आरोप केले, तेव्हा विरोधकांनी नेहमीप्रमाणे 'निवडणुकीपुरता स्टंट', 'ध्रुवीकरणाचा प्रयत्न' किंवा 'राजकीय रंग' देऊन हे मुद्दे फेटाळण्याचा आटोकाट प्रयत्न केला गेला. मात्र, आता केंद्रीय निवडणूक आयोगाच्या 'विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेमुळे' (एसआयआर) सोमय्यांनी उपस्थित केलेले हे अत्यंत गंभीर प्रश्न थेट प्रत्यक्ष प्रशासकीय पडताळणीच्या टप्प्यावर आले आहेत. ही केवळ मतदार यादी सुधारण्याची मोहीम राहिलेली नसून ती मुंबई आणि महाराष्ट्राच्या भविष्यातील राजकीय भूकंपाची नांदी ठरणार आहे, हे आता स्पष्ट झाले आहे. किरीट सोमय्या यांनी नुकताच मुंबई महानगर पालिकेच्या कारभारावर आणि त्या माध्यमातून झालेल्या कथित मतदार नोंदणीवर जो धक्कादायक दावा केला आहे, त्याने प्रशासकीय वर्तुळात भूकंप घडवला आहे. सोमय्या यांच्या पुराव्यानुसार, मुंबई महापालिकेच्या हद्दीत तब्बल ८७ हजार ३४७ संशयास्पद जन्म प्रमाणपत्रांच्या आधारे मुंबईच्या विविध विधानसभा मतदारसंघांमध्ये हजारो मतदारांची बोगस नोंदणी झाली असण्याची दाट शक्यता आहे.

हा आकडा थक्क करणारा आणि लोकशाहीची थट्टा उडवणारा आहे. कोणतीही वैध कागदपत्रे नसताना केवळ विशिष्ट भागातील लोकसंख्या वाढवण्यासाठी आणि एका विशिष्ट विचारसरणीच्या पक्षांना विजयी करण्यासाठी ही बोगस जन्म प्रमाणपत्रे रात्रीतून छापली गेली का? हा सर्वात मोठा संशय आहे. या प्रकरणाचे गांभीर्य इतके प्रचंड आहे की, यामध्ये केवळ प्रशासकीय चौकशी पुरेशी ठरलेली नाही. या रॅकेटच्या मुळाशी जाण्यासाठी आता पोलिस तपास आणि विशेष चौकशी पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. प्राथमिक तपासाअंती काही बोगस अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात आली असून संशयास्पद ठरलेल्या शेकडो जन्मनोंदी तातडीने रद्द करण्याची कायदेशीर प्रक्रिया आता वेगाने सुरू झाली आहे. बोगस कागदपत्रांच्या आधारे जर परदेशी घुसखोरांना किंवा बोगस नागरिकांना मतदानाचा अधिकार मिळत असेल, तर ती देशाच्या सुरक्षिततेशी अक्षम्य तडजोड म्हणावी लागेल.

आता हा विषय जन्म प्रमाणपत्रांपुरता मर्यादित राहिला नसून मुंबई महापालिकेच्या हद्दीत सुरू असलेल्या शाळांपर्यंत येऊन ठेपला आहे. त्याला काय ते 'स्कूल जिहाद' वगैरे म्हणतात. सोमय्या यांनी मुंबई मनपाने स्वतः अधिकृतपणे जाहीर केलेल्या १६४ अनधिकृत शाळांचा दाखला देत त्यांनी यामागील एक मोठे आंतरराष्ट्रीय आणि सामाजिक षडयंत्र उघड केले. या शाळा कोणत्याही शासकीय नियमांचे पालन करत नाहीत, त्यांना कोणतीही अधिकृत मान्यता नाही. मग या शाळा सुरू कशा राहतात? या शाळांमधून नेमकं कोणतं शिक्षण दिलं जातं आणि त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे, या शाळांमधून मिळणारे बोगस शाळा सोडल्याचे दाखले आणि त्यांच्या आधारे तयार होणारे रहिवासी पुरावे... या सर्वांचा वापर करून मतदार यादीत बोगस नाव घुसवण्याची एक सुनियोजित 'साखळी' मुंबईत कार्यरत असल्याचे उघड झाले आहे. या बोगस शाळांच्या आडून नेमके कोणते हितसंबंध जपले जात आहेत, हे आता निवडणूक आयोगाच्या रडारवर आले आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार आता बूथ लेव्हल अधिकारी थेट नागरिकांच्या घराघरांमध्ये जाऊन मतदार यादीतील नावांची प्रत्यक्ष पडताळणी करीत आहेत. आयोगाची भूमिका अत्यंत स्पष्ट, पारदर्शक आणि लोकशाहीला बळकट करणारी आहे. आयोगाने जाहीर केले आहे की, कोणत्याही वैध आणि पात्र भारतीय नागरिकाचे नाव मतदार यादीतून कमी करणे हा या मोहिमेचा हेतू नाही. तर मृत व्यक्ती, स्थलांतरित झालेले नागरिक, एकापेक्षा अधिक ठिकाणी नावे असलेले किंवा पूर्णपणे अपात्र असणाऱ्या बोगस मतदारांची नावे शोधून मतदार यादी शुद्ध करणे हाच एकमेव उद्देश आहे. परंतु, या अत्यंत कायदेशीर आणि लोकशाही मार्ग बळकट करणाऱ्या प्रक्रियेला विरोधकांकडून ज्या प्रकारे कडाडून विरोध केला जात आहे, तो अत्यंत संशयास्पद आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आरडाओरड सुरू केली आहे की, ही मोहीम अत्यंत घाईघाईने आणि सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली राबविली जात आहे. नागरिकांना कागदपत्रे सादर करण्यासाठी पुरेसा वेळ दिला जात नसून यामुळे गरीब, स्थलांतरित मजूर आणि अल्पसंख्यक समाजातील नागरिक मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहतील, असा पद्धतशीर कांगावा विरोधक करीत आहेत.

मतदार यादी पूर्णपणे पारदर्शक आणि शुद्ध असावी, यात कोणतीही बोगस नावे नसावीत यावर सर्वांचे एकमत आहे, तर मग निवडणूक आयोगाचे कर्मचारी थेट घरापर्यंत येऊन पडताळणी करत असताना त्याला विरोध करण्याचे किंवा त्यात खोडा घालण्याचे कारण काय? बोगस मतदारांची नावे कट होणार आणि आपले बांगलादेशी बोगस मतदार कमी होणार, म्हणूनच तर हा पोटशूळ नाही ना? ■

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### माटे चौक ते प्रतापनगर चौक अतिक्रमणाने फूटपाथ गायब

गेल्या एक महिन्यांपासून फूटपाथवरचे अतिक्रमण काढणे मनपाने गाजावाजा करीत सुरू केले आहे. त्याचा त्या भागातील फूटपाथवर चालणाऱ्या लोकांना काय फायदा झाला हे त्यांनाच माहीत. याबाबतीत धरमपेठ झोन व लकडगंज झोन अग्रेसर आहेत असे वाटते. पण लक्ष्मीनगर झोन अतिक्रमण विरुद्ध काहीच कारवाई करताना दिसत नाही आहेत. कारण माटे चौक ते प्रतापनगर चौकापर्यंत फूटपाथच दिसत नाही. राम भंडार, उत्तर दक्षिण रेस्टॉरंट, वऱ्हाडी व्यंजन या रेस्टॉरंटसमोरील फूटपाथच दिसत नाहीत. त्यात फळवाले व फूड व्हॅनने फूटपाथ व्यापून टाकला आहे.

**राजेंद्र वाडी**/नागपूर

### एसटी भाडेवाढीपेक्षा सेवेत वाढ करा

वेगवेगळी कारणे देऊन राज्य एसटी महामंडळाने प्रवासी तिकिटामध्ये वाढ केल्याने प्रवाशांच्या खिशाला भुर्दंड बसणार आहे. १० टक्के हंगामी भाडेवाढ आता ३१ जुलैपर्यंत वाढविली आहे. प्रवाशांना सुखकर प्रवास देणे, आरामशीर,



वक्तशीरपणे प्रवास घडवणे हे एसटी महामंडळाचे कर्तव्य आहे. मात्र त्यालाच प्रवासी पारखा होतानाचे चित्र अनेक प्रवासादरम्यान दिसून येत आहे. प्रवाशांशी सौजन्याने, नम्रतेने वागणे, सुरक्षितता, शिस्त पाळणे, ठरलेल्या मार्गावर आणि वेळेवर बस चालवणे आदी कर्तव्य असताना एसटीतील अधिकारी, चालक, वाहक या कर्तव्यापासून दूर जाताना आढळून येत आहेत. काही उदाहरणे घ्यावयाची झाल्यास बऱ्याच वेळा एसटी प्रवासादरम्यान सुट्ट्या पैशावरून वाद होतात. त्यात वाहक प्रवाशांबरोबर उद्धटपणे बोलतात .विनंती थांब्यावर बस न थांबवणे, गर्दीचे कारण देऊन बसमध्ये येण्यास प्रवाशांना अटकाव करणे, अधिकृत बस थांबा असताना थांबा नसल्याबाबत दरडावून सांगणे, हे प्रसंग नित्याचेच बनले आहेत.

पुणे-कोल्हापूर प्रवासादरम्यान सातारा, कराड या मुख्य बसस्थानकात बस न नेता महामार्गावरूनच पुढे नेत असल्याने वाद होतात. साताराकडून स्वारगेटकडे आल्यावर अनेक प्रवाशांना मेट्रो स्थानकासमोर उतरावयाचे असते; जेणेकरून मेट्रो स्थानक आणि शहर बस स्थानकातून इच्छित स्थळी जाणे सोपे होते. मात्र, सुरक्षेचे कारण देऊन चालक स्वारगेट स्थानकात बस नेतो. प्रवाशांना पुन्हा मेट्रो आणि बस स्थानकात चालत प्रवासी बॅगा घेऊन येताना त्रास सहन करावा लागतो. या दरम्यानचे वाद नियमित होतात. भाडेवाढ केली तशी महामंडळाने 'प्रवाशांच्या सेवेसाठी' ब्रीदवाक्याप्रमाणे सेवेत वाढ केल्यास एसटीला सुगीचे दिवस येतील.

**नितीन कुंभार**/पिंपरी, पुणे.

### ओळखपत्र एकच असावे

जन्म झाल्यापासून ओळखपत्र लागू होते, जन्म प्रमाणपत्र, शाळा, कॉलेजचे वेगळे, नोकरीत वेगळे, आर्थिक व सरकारी विविध योजनाकरिता वेगवेगळे ओळखपत्र असतात. एक माणूस व एकच ओळखपत्र सर्व कामाकरिता असावे. सर्व कागदपत्र देऊनही अनेक ओळखपत्रांमध्ये अनेक चुका कशा होतात? चुका होऊ नये याकरिता लक्ष द्यावे. कारण चुका दुरुस्तीसाठी पुन्हा फॉर्म भरणे, कागदपत्र देणे व फी भरणे हा आर्थिक खर्च करावा लागतो. तेव्हा सर्व कामाकरिता एकच ओळखपत्र असावे हीच अपेक्षा.

**मुकुंद काकीरवार**/नागपूर, ८८०६९९२७७८

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# गोळीबार करून पैसे लुटण्याचा प्रयत्न; सराईत टोळीतील चौघांना अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

सोलापूर तालुका पोलीस ठाण्याच्या पथकाने हैद्राबाद महामार्गावर मुळेगाव शिवारात अपेक्स स्टील अँड हार्डवेअर कंपनीच्या कर्मचाऱ्यावर गोळीबार करून अडीच लाख रुपये लुटण्याचा प्रयत्न करणाऱ्या टोळीतील चौघा जणांना अटक केली आहे. एजाज नबीलाल तांबोळी हे अपेक्स स्टील अँड हार्डवेअर कंपनीमध्ये कामाला आहेत. कंपनीचे दिवसभराचे अडीच लाख रुपयांचे कलेक्शन घेऊन ते गुरुवारी रात्री मालकाच्या घराकडे निघाले असता, मुळेगावजवळ पांढऱ्या रंगाच्या एरटिगा कारने त्यांचा रस्ता अडवला. अज्ञात हल्लेखोरांनी फिर्यादी एजाज तांबोळी यांच्यावर गोळीबार केला, ज्यामध्ये ते जखमी झाले होते. मात्र, त्याने दाखवलेल्या प्रसंगावधनामुळे लुटारूंचा डाव फसला होता आणि ते पसार झाले होते. याबाबत एजाज तांबोळी यांनी सोलापूर तालुका पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली होती.



घटनेचे गांभीर्य ओळखून तालुका पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. पोलिसांनी घटनेतील चार सराईत गुन्हेगारांना ताब्यात घेतले आहे. सदरची कामगिरी सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे, सहाय्यक पोलिस निरीक्षक सोमनाथ कदम, पोलीस उपनिरीक्षक महेश घोडके आणि त्यांच्या विशेष पथकाने पार पाडली आहे.



# शिक्षण महर्षी पुरस्कार घोषित झाल्याबद्दल शशीभूषण यलगुलवार यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

सोलापूर शहर माध्यमिक व उच्च-माध्यमिक शाळा कृती समिती कर्मचारी सहकारी पतसंस्था, सोलापूर यांच्या वतीने शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांना प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'शिक्षण महर्षी पुरस्कार' यावर्षी नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड जिल्हा शाखा, सोलापूरचे जनरल सेक्रेटरी शशीभूषण यलगुलवार यांना जाहीर झाला आहे. या यशाबद्दल सुशीलकुमार शिंदे दिव्यांग दृष्टीबाधित निवासी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र येथे त्यांचा सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष अंकुश कदम व माननीय सदस्य देवेंद्र भंडारे तसेच प्रशिक्षण केंद्राचे अधिक्षक रामचंद्र कुलकर्णी यांच्या हस्ते शशिभूषण यलगुलवार यांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक रामचंद्र कुलकर्णी यांनी केले. या प्रसंगी रियाज मुल्ला व आकांक्षा भंडारे यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन शिवकुमार पाटील यांनी केले, तर पांडुरंग खरसडे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीनिवास समदूर्ले व शुभम वांझरे यांचे सहकार्य लाभले.

## भाजप ओबीसी मोर्चा सोलापूर पूर्वच्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण

**सोलापूर, दि. १७ जुलै-**

भाजपा ओबीसी मोर्चा सोलापूर पूर्वच्या वतीने जिल्हा कार्यकारिणीतील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना जतचे आमदार तथा सोलापूर पूर्वचे प्रदेश प्रभारी गोपीचंद पडळकर यांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले. अध्यक्षस्थानी भाजप जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण होते. यावेळी ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष विनायक सुतार, किसान मोर्चाचे जगन्नाथ गायकवाड, युवा मोर्चाचे महेश बिराजदार, अल्पसंख्याक मोर्चाचे मुजीप मुजावर, अनुसूचित जाती-जमाती मोर्चाचे बालाजी वाघमारे आदी उपस्थित होते.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

निविदा क्रमांक
**SUR/GSU/L/T/2026/01**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, सामान्य, मध्य रेल्वे, सोलापूर, हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी रेल्वेच्या ई-प्रोक्युअरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. कामाचे नाव: सोलापूर विभागाच्या एबीएसएस अंतर्गत सोलापूर स्टेशनच्या दुसऱ्या टप्प्यातील पार्सल ऑफिस/गुड्स शेडच्या संदर्भातील विद्युत सामान्य सेवा भागाचे काम; अंदाजित खर्च: रुपये 52,48,180.72; बयाणा रक्कम : रुपये 1,05,000/-; पूर्ण करण्याचा कालावधी: 08 महिने; ऑफरची वैधता: 60 दिवस; वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 05.08.2026 रोजी 15:00 वाजता. बयाणा रक्कमेचा खर्च www.ireps.gov.in वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरला जावा.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (सामान्य)**
**DE/Sur-37** **मध्य रेल्वे, सोलापूर**

सुरक्षित प्रवास करा,
फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.

# सोलापूरला ५ खेळांच्या आयोजनाचा मान

## क्रीडा संचालनालयाकडून राज्य शालेय क्रीडा स्पर्धांचे स्थळ जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांच्या आयोजन स्थळांची घोषणा क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे सहसंचालक सुधीर मोरे यांनी जाहीर केली आहेत. यामध्ये सोलापूर जिल्ह्याला विविध वयोगटांतील ५ प्रमुख खेळांच्या राज्यस्तरीय स्पर्धांचे यजमानपद मिळाले आहे. यात जलतरण, कुस्ती आणि तलवारबाजी यांसारख्या अत्यंत चुरशीच्या खेळांचा समावेश असून, राज्यातील खेळाडू सोलापुरात आपले कौशल्य पणाला लावणार आहेत. क्रीडा संचालक आणि जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या ऑनलाईन बैठकीनंतर राज्यातील ५३ खेळांच्या विविध वयोगटांतील स्पर्धांची स्थळे निश्चित करण्यात आली. विभागीय उपसंचालक व क्षेत्रिय कार्यालयांनी केलेल्या मागणीनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.

**अन्य खेळाच्या स्पर्धा : धनुर्विद्या :** १४ वर्षांखालील मुले व मुली (परभणी) १७ वर्षांखालील स्पर्धा (अमरावती). **ॲथलेटिक्स:** १४ वर्षांखालील (रत्नागिरी), १७ वर्षांखालील (पालघर), १९ वर्षांखालील (जळगाव). **बॅडमिंटन :** (बुलढाणा), बॉल बॅडमिंटन (अकोला), **बेसबॉल :** (१४ वर्षांखालील, गडचिरोली), १७ वर्षांखालील (जळगाव), १९ वर्षांखालील (सातारा). **बास्केटबॉल :** १४ व १७ वर्षांखालील (यवतमाळ) १९ वर्षांखालील (कोल्हापूर). **बॉक्सिंग :** १४ व १९ वर्षांखालील (अकोला), १७ वर्षांखालील (परभणी). **कॅरम :**(सिंधुदुर्ग), **बुद्धिबळ :** (नांदेड). **क्रिकेट:** १४ वर्षांखालील मुले आणि १७ वर्षांखालील मुले व मुलींच्या (जळगाव), १९ वर्षांखालील (रत्नागिरी). **सायकलिंग:** रोड रेस (भंडारा) ट्रॅक सायकलिंगची थेट निवड चाचणी (पुणे). **डॉजबॉल:** १७ व १९ वर्षांखालील (बुलढाणा). **तलवारबाजी :** १४ वर्षांखालील (जालना). **फुटबॉल:** १४, १७ व १९ वर्षांखालील मुलीं (अकोला), मुले (कोल्हापूर). जिम्नॅस्टिक्स (नागपूर). **हॅन्डबॉल:** १४ वर्षांखालील (कोल्हापूर), १७ वर्षांखालील (वाशिम), १९ वर्षांखालील (सांगली). **हॉकी:** १४ व १७ वर्षांखाली (बुलढाणा) १९ वर्षांखालील (कोल्हापूर), **ज्युडो:** १४ वर्षांखालील (वाशिम), १७ व १९ वर्षांखालील (अकोला). **कबड्डी:** मुले: १४ वर्षांखालील (ठाणे), १७ वर्षांखालील (वाशिम), १९ वर्षांखालील (पुणे). मुली: १४ वर्षांखालील (मुंबई शहर), १७ वर्षांखालील (रायगड), १९ वर्षांखालील (कोल्हापूर). **कराटे :** (वर्धा). **खो-खो:** मुले: १४ वर्षांखालील (धाराशिव), १७ वर्षांखालील (जालना), १९ वर्षांखालील (छत्रपती संभाजीनगर). मुली: १४ वर्षांखालील (अहिल्यानगर), १७ वर्षांखालील (रत्नागिरी), १९ वर्षांखालील (सातारा). किकबॉक्सिंग (वर्धा). **लॉनटेनिस:** १४ वर्षांखालील (वाशिम), १७ वर्षांखालील (पुणे). **मल्लखांब :** (ठाणे). **नेटबॉल:** १४ वर्षांखालील(चंद्रपूर), १७ वर्षांखालील (यवतमाळ), १९ वर्षांखालील (नाशिक). शूटिंग (नागपूर).ॉ





**रोलबॉल:** १७ व १९ वर्षांखालील (यवतमाळ). **रोलर स्केटिंग:** सर्व गट व रोलर हॉकी १९ वर्षांखालील मुले (पालघर). **शूटिंगबॉल:** १७ वर्षांखालील (बुलढाणा), १९ वर्षांखालील (यवतमाळ). **सॉफ्टबॉल:** १४ वर्षांखालील (गडचिरोली), १७ वर्षांखालील (धुळे), १९ वर्षांखालील (जळगाव). **स्कॉश:** १४, १७ व १९ वर्षांखालील मुले (वाशिम). मुलीं (पुणे). **टेबल टेनिस :** १४ वर्षांखालील (वर्धा), १७ वर्षांखालील (परभणी), १९ वर्षांखालील (नांदेड). **तायक्वांदो :** (अकोला). **थ्रोबॉल :** (रत्नागिरी). **व्हॉलीबॉल:** १४ वर्षांखालील (रत्नागिरी), १७ वर्षांखालील (कोल्हापूर), १९ वर्षांखालील (जळगाव). **वेटलिफ्टिंग :** (अमरावती). **कुस्ती:** १४ व १९ वर्षांखालील मुले (अहिल्यानगर), मुली (रायगड). वुशू (नंदुरबार). **योगासन:** (सांगली). रग्बी: १४ वर्षांखालील (सांगली), १७ व १९ वर्षांखालील (रत्नागिरी). **सेपक टकरा:** १४, १७ व १९ वर्षांखालील मुले (वर्धा), मुली (परभणी). **मॉडर्न पेंटॅथलॉन:** १७ व १९ वर्षांखालील (सातारा). सॉफ्ट टेनिस: १४ वर्षांखालील (नाशिक), १७ वर्षांखालील (सातारा), १९ वर्षांखालील (पुणे). **टेनिक्कॉईट :** (नंदुरबार). **आट्यापाट्या:** १४, १७ आणि १९ वर्षांखालील मुले (जळगाव) मुली (वाशिम). **नेहरू हॉकी व सुब्रतो फुटबॉल:** १५ व १७ वर्षांखालील मुले व मुली (पुणे). **आष्टे डू आखाडा :** (भंडारा). स्पीडबॉल (सातारा). **मिनीगोल्फ :** (नागपूर). तेंग सू डो (बुलढाणा). **थायबॉक्सिंग:** १७ व १९ वर्षांखालील (नागपूर).

### सोलापुरात होणाऱ्या स्पर्धा

जलतरण, डायव्हिंग (सर्व गट) वॉटरपोलो (१९ वर्षांखालील मुले). कुस्ती (१७ वर्षांखालील मुले व मुली). तलवारबाजी (१७ व १९ वर्षांखालील मुले व मुली), लॉनटेनिस (१९ वर्षांखालील), धनुर्विद्या (१९ वर्षांखालील).

# दर्शन रांगेत चहा, पिण्याचे पाणी व खिचडी वाटप



## भाविकांसाठी मंदिर समितीची विशेष व्यवस्था

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १७ जुलै-**

आषाढी यात्रेला सुरुवात झाल्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमीवर दर्शन रांगेतील भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये तसेच एकही भाविक उपाशी राहू नये, यासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने दर्शन रांगेत मोफत चहा, शुद्ध थंड पिण्याचे पाणी व खिचडीचे वाटप करण्यात येत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

दर्शन रांगेतील भाविकांसाठी तांदळाच्या खिचडीच्या वाटपाचा शुभारंभ आज मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी व्यवस्थापक प्रविणकुमार घम, लेखाधिकारी मुकेश अनेचा, विभागप्रमुख विनोद पाटील तसेच विशाल माने उपस्थित होते. दर्शन रांगेतील विविध ठिकाणी स्टॉल उभारून भाविकांना दिवसरात्र शुद्ध थंड पिण्याचे पाणी उपलब्ध करून देत आहे. तसेच चहाचे वाटपही सुरू असून नियमित तांदळाची खिचडी देत आहेत. आषाढी एकादशीदिवशी भाविकांसाठी विशेषतः साबुदाण्याच्या खिचडीचे वाटप करणार आहे.

दर्शन रांगेतील चहा, पाणी व खिचडी वाटपाची सेवा श्री संत गजानन महाराज मठ, अकोला येथील स्वयंसेवक अत्यंत समर्पित भावनेने देत आहेत.

## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः जामगांव (पा), ता. बार्शी व आसपासचे परिसरातील जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

डि सोलापूर सब डि ता. बार्शी पैकी मौजे जामगांव (पा) येथील जमीन गट नं. ४१४ याचे क्षेत्र ०२ हे ७७ आर आकार १३ रु १५

डि सोलापूर सब डि ता. बार्शी पैकी मौजे जामगांव (पा) येथील जमीन गट नं. ४१९ याचे क्षेत्र ०० हे ३९ आर आकार ०० रु ८०

डि सोलापूर सब डि ता. बार्शी पैकी मौजे जामगांव (पा) येथील जमीन गट नं. ४३८ याचे क्षेत्र ०० हे १६ आर आकार १३ रु १५

डि सोलापूर सब डि ता. बार्शी पैकी मौजे जामगांव (पा) येथील जमीन गट नं. ४४० याचे क्षेत्र ०० हे २३ आर आकार ०० रु ६५

येणेप्रमाणे वर वर्णन केलेली मिळकत हि आमचे अशिल जगन्नाथ ऊर्फ विकास श्रीकृष्णमुर्ती कुलकर्णी यांची वडिलोपार्जीत समाईकातील शेतजमीन आहे. सदर जमीनीचे अद्यापपावेतो सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. त्या संदर्भात सदर जमीनीविषयी वाद चालू आहेत. सदर मिळकती या वसंत नारायण कुलकर्णी, विष्णु सदाशिवमुर्ती शामसुंदर, शरद जगन्नाथ डोके, लक्ष्मण रामचंद्र कुलकर्णी, अनिल रामचंद्र कुलकर्णी हे विक्री व बटईने देण्याच्या प्रयत्नात आहेत व तशी खात्रीशीर माहिती आमच्या अशिलास झालेली आहे. सदर सहहिस्सेदाराशी कोणीही, कसलाही खरेदीखताचा, साठेखताचा, गहाणखत, दानपत्र, बटईपत्राचा किंवा अन्य कसलाही व्यवहार करू नयेत, जर का व्यवहार केलेस, सदरचे व्यवहार हे बेकायदेशीर ठरतील व ते व्यवहार आमचे अशिलाचे हिश्यावर बंधनकारक राहणार नाहीत. तसेच जर इतर त्रयस्थ व्यक्तिनी व्यवहार केलेस त्यांची फसगत झाल्यास त्यास आमचे अशिल हे जबाबदार राहणार नाहीत. याची नोंद घ्यावी त्यामुळे सदरचे मिळकतीबाबत कोणाचीही फसगत होवू नये म्हणून व आमचे अशिलाचे हक्क, हिश्याची जाणीव करुन देण्यासाठी ही सावधानतेची जाहिर नोटीस दिली असे. दि. १७/०७/२०२६

**सही/-**
**ॲड. श्रीहरी उत्तरेश्वर भोसले**
**जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी**
**मो. ९८५०१२०१२४**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## रि-प्रेझेंटेटिव्ह दाव्याचे जाहीर प्रसिध्दकरण

पुढील नेमलेली तारीख २४/०८/२०२६
रे.मु.नंबर ११/२०२६ नि.नं. १०

### बार्शी येथील मे. सिव्हील जज सिनियर डिव्हीजन साहेब यांचे कोर्टात

**श्री कल्याण दगडु आवारे** ... **वादी**
विरुद्ध
**मा. जिल्हाधिकारी साहेब, सोलापूर वगैरे** ... **प्रतिवादी**

यात वादी रि-प्रेझेंटेटीव्ह दाव्याचे जाहीर प्रसिध्दकरण खालील नमुद बाबीप्रमाणे करीत आहेत की, वादीचे मालकी जाहीर होऊन मिळणेसह जवळगाव कालवा वितरिका क्रं. ५ चे संपादित क्षेत्र तसेच वितरिकेच्या दक्षिण भागातील इजमेंट ऑफ नेसेसिटीचा रस्ता जाहीर होऊन तसेच अज्ञार्थी ताकीदीसह निरंतर ताकीदीसह रि-प्रेझेंटेटीव्हचा दाव्याचा विषय आहे. त्यासोबत स्वतंत्र तुर्तातुर्त ताकीद अर्ज आहे.

सदर वादीचे वकील ॲड रणजित बब्रुवान काजळे, ॲड सौ. क्रांती र. काजळे-पवार, ॲड सौ. गायत्री अ. डोंगरे-गुंड, यांचे मार्फत दावा दाखल केलेला आहे.

सबब, वर नमुद दाव्याचे कामी कोणाची काही हरकत अथवा म्हणणे असल्यास हे प्रसिध्दकरण झालेपासुन ३० दिवसांचे आत किंवा नेमलेली तारीख २४/०८/२०२६ रोजी वर नमुद दाव्याबाबत ज्याचे कोणाचे हीतसंबंध आहेत अशी हितसंबंधीत व्यक्ती अथवा इतर व्यक्ती यांना वर नमुद दाव्याबाबत म्हणणे हरकत घ्यावयाचे असल्यास ते वर नमुद स्वतः अथवा वकिलामार्फत तारखेस हजर राहु शकतात. सबब तसे कोणाचेही म्हणणे, हरकत न आलेस वादी हे रि-प्रेझेंटेटीव्ह दाव्यासाठी पात्र आहेत असे समजून कोणाचीही सदर दाव्यास हरकत नाही असे समजून दाव्याचे काम चालू करतील.

हे प्रसिध्दीकरण दि १६/०७/२०२६ रोजी मे. न्यायालयाचे सही व कोर्ट शिक्क्याानिशी प्रसिध्दीकरण केले.

**सही/-**
**लपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सह अधीक्षक,**
**दिवाणी न्यायालय व. स्तर बार्शी**

## सिलींग परवानगीसाठीचा नमुना
### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते, मौजे गौडगाव, ता. बार्शी जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नं. २४६/२ क्षेत्र ०१ हे १० आर आकार ०१ रू. ३० पैसे हि मिळकत रूक्मिणी मुरलीधर ढेरे रा. गौडगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर यांची मालकी वहिवाटीची आहे. सदरची मिळकत त्यांना वारसा हक्काने प्राप्त झालेली आहे. सदर मिळकत हि त्यांचे वडिल धोंडीबा मारूती काजळे यांना सिलींग ॲक्ट प्रमाणे शासनाकडुन महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ चे अंतर्गत मिळालेली आहे. त्यांनी सदर मिळकत आमचे अशिल आशा हरी शिंदे रा. हळदुगे ता. बार्शी जि. सोलापूर यांना खरेदी देण्यासाठी पुर्व परवागनी मिळणेसाठी मा. अप्पर जिल्हाधिकारी सोलापूर कुळ कायदा शाखा या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे.

तरी उक्त नमुद शेतजमीनीबाबत व त्यामध्ये झालेल्या व्यवहाराबाबत किंवा इतर कुठल्याही प्रकारचे व्यवहाराबाबत किंवा उक्त जमीनीबाबत कोणताचाही करार, लिज, भाडेपट्टा, पोटगी हक्क, वारसा हक्क, बोजा, गहाण, दान, लिन, कर्ज, कोर्ट केसेस, मृत्युपत्र खरेदी-विक्री, साठेखत, पतसंस्थेचा बोजा, सावकारी देणे घेणेबाबत काही हरकत, तक्रार, हितसंबंध अधिकार असल्यास ती जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत मा. अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर (कुळ कायदा शाखा सिध्देश्वर पेठ, सोलापूर - ४१३००१) या पत्यावर आपली हरकत नोंदवावी. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झालेस कोणचीही हरकत नाही असे समजुन उक्त शेतजमीनीचा खरेदी व्यवहार करणेसाठी पुर्वपरवागनीबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी. ता.१७/०७/२०२६

**सही/-**
**ॲड. श्री. श्रीहरी उत्तरेश्वर भोसले**
**पत्ता - राऊळगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**मो.नं. ९८५०१२०१२४**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढील नेमलेली तारीख : १९/०८/२०२६
दि.कि.अ.नं. ४७/२०२६ नि. ५

### बार्शी येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब यांचे कोर्टात

१) **आर्या संदिप म्हेत्रे,**
उ.व. १६, धंदा - शिक्षण,
रा. दत्त नगर, मोडनिंब, ता. माढा, जि. सोलापूर
अ.पा.क. अर्जदार नं. ३ आई या नात्याने

२) **आर्यन संदिप म्हेत्रे,**
उ.व. १०, धंदा - शिक्षण,
रा. दत्त नगर, मोडनिंब, ता. माढा, जि. सोलापूर
अ.पा.क. अर्जदार नं. ३ आई या नात्याने

३) **श्रीमती अस्मिता संदिप म्हेत्रे**
उ.व. ३६, धंदा - घरकाम,
रा. दत्त नगर, मोडनिंब, ता. माढा
जि. सोलापूर स्वतःकरीता व अर्जदार
नं. १ व २ चे अ.पा.क. म्हणून

४) **सौ. प्रमिला प्रेमनाथ म्हेत्रे,**
उ.व. ६४, धंदा - घरकाम,
रा. दत्त नगर, मोडनिंब, ता. माढा, जि. सोलापूर

— **जाब देणार**

विरुध्द

**महाराष्ट्र शासन** **- सामनेवाला**

ज्याअर्थी डि. सोलापूर सब डि. ता. माढा पैकी मौजे - टेंभुर्णी येथील बिनशेती प्लॉट जागा तिचे वर्णन गट नंबर - १०१ पैकी प्लॉट नं. ६ क्षेत्रफळ २५६.५० चौ.मी. आकार रु. २३०-८५ पैसे यापैकी अर्जदार यांचे मालकीची पुर्वेकडील बिनशेती खुली प्लॉट जागा त्याचा तपशील येणेप्रमाणे गट नं. १०१ पैकी, प्लॉट नं. ६ पैकी क्षेत्रफळ १२८.२५ चौ.मी. आकार रुपये ११५.४२ पैसे यांसी चतु:सिमा :- पुर्वेस : प्लॉट नं. ८, दक्षिणेस : प्लॉट नं. ५, पश्चिमेस : गट नं. ६ पैकी, उत्तरेस : अंतर्गत रस्ता

वर नमूद केलेली मिळकत अज्ञान अर्जदार यांचे मालकी कब्जे वहिवाटीची व ७/१२ हक्कपत्रकी नोंद असलेली मिळकत असून सदर मिळकत अज्ञान अर्जदार नं. १, २ ची अ.पा.क. म्हणून अर्जदार नं. ३ व ४ यांनी अज्ञान अर्जदार नं. १ व २ यांचे भविष्यातील शिक्षण व गरजा याचा विचार करुन सदर मिळकत विक्री करणेचे ठरवले व योग्य किंमत आलेने सदर व्यवहार अज्ञानाचे हिताचा आहे तथापी, सदर मिळकतीचे मालक हे अज्ञान असलेने सदर व्यवहारास मा.जिल्हा न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे, सदरची कृती योग्य व गरजेचे असून अज्ञानाचे हिताची आहे, असे कथन करुन अज्ञान अर्जदाराचे वतीने त्यांचे पालनकर्ते म्हणजेच अर्जदार नं. ३ व ४ यांनी या मे. न्यायालयात अज्ञानाची मिळकत विक्री करणेस परवानगी मिळणेचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी संबंधाने कोणाच्या काही हरकती असल्यास वा अन्य कोणाच्या काही हक्क अधिकार असल्यास संबंधितांनी ही जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत अगर पुढील नेमलेली तारीख १९/०८/२०२६ रोजी या मे. कोर्टात स्वतः अगर माहितगार वकीलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकती, सादर कराव्यात. विहित मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा.कोर्टाचे प्रकरणी पुढील यथायोग्य आदेश होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दी केले असे. तारीख : १६/०७/२०२६

**शिक्का**

**सही/-**
**(कविता द्विवेदी)**
**अतिरिक्त विभागीय आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

## IDFC FIRST Bank Limited

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)**
**CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

### सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ (२) अन्वये नोटीस

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेड** मध्ये विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेले सुरक्षित कर्ज घेतले होते. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताद्वारे (मॉर्टगेज) सुरक्षित करण्यात आली आहेत. ते संबंधित कर्ज करारांच्या अटी व शर्तींचे पालन करण्यात अपयशी ठरल्यामुळे आणि त्यांचे कर्ज खाते अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज खाते एनपीए (थकबाकी खाते) म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेड** मध्ये विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडे त्यांच्याकडून थकीत असलेल्या रकमा खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे वर्णन केलेल्या संबंधित जारी केलेल्या नोटिसीनुसार नमूद केल्या आहेत आणि सदर रकमांवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 160347601 | मालमत्तेवर कर्ज | १. अनिकेत सदाशिव रणनवरे<br>२. रणनवरे सदाशिव अनंत<br>३. श्रेया अनिकेत रणनवरे | 20-Jun-2026 | INR 7,43,283.93/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत नंबर ७०७ धारण करणार्या निवासी घराचा तो संपूर्ण तुकडा आणि भाग, ज्याचे क्षेत्रफळ ७२० चौ. फूट (३० X २४) आणि खुली जागा ज्याचे क्षेत्रफळ ३००० चौ. फूट (५० X ६०) आहे, एकूण क्षेत्रफळ ३७२० चौ. फूट, गाव - मानकी, तालुका - माळशिरस, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र - ४१३१०७ येथे स्थित आहे आणि सीमा खालीलप्रमाणे आहेत पूर्व : स्वतःची मालमत्ता, पश्चिम : खुली जागा, उत्तर : ग्रामपंचायत रस्ता, दक्षिण : रघू पांडुरंग रणनवरे

तुम्हाला याद्वारे वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड**, जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडे त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या व्याजदरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींसह, या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत रकमा भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे, ज्यामध्ये अपयशी ठरल्यास, स्वाक्षरीकर्त्यास गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध सरफेसी ॲक्ट च्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कारवाई सुरू करणे भाग पडेल, जेणेकरून **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडे थकीत असलेली रक्कम वसूल करता येईल. तसेच, तुम्हाला उक्त कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्टा (लीझ) किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास प्रतिबंधित करण्यात आले आहे.

**दिनांक : 18/07/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

**स्वाक्षरी/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, ज्याचे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण झाले असून सध्या ते आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

## महाराष्ट्र शासन
### कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर
### पत्ता :- सात रस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर ४१३००३

**ई-निवीदा सुचना क्र. 12 सन 2026-27 (ऑनलाईन)**

**'बी-१ निविदा'**

**संदर्भ :- महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय**
**क्र.संकीर्ण २०२२/प्र.क्र.१०४/इमा-२/मंत्रालय मुंबई-०३२ दि. १४/०२/२०२५**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर-४१३००३ निविदा पत्रात नमुद केलेले पात्रतेचे निकष पूर्ण करीत व सा.बां. विभागाकडून नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदारा यांचेकडून खालीलकामा करिता 'बी-१' नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहोत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत, तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर-४१३००३ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेचा प्रकार | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. | ठेकेदाराचा अधिकृत वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे वागदरी येथे मंडळ अधिकारी कार्यालयाचे बांधकाम करणे. ता.अक्कलकोट, जि.सोलापूर | बी-१ निविदा | १८,६३,५१२/- | वर्ग-५ (अ) व त्यावरील |
| २ | मौजे मैंदर्गी येथे मंडळ अधिकारी कार्यालयाचे बांधकाम करणे. ता.अक्कलकोट, जि.सोलापूर | बी-१ निविदा | १९,०४,६८५/- | ५ (अ) व त्यावरील |
| ३ | मौजे किर्णी येथे मंडळ अधिकारी कार्यालयाचे बांधकाम करणे. ता.अक्कलकोट, जि.सोलापूर | बी-१ निविदा | १८,६३,७१३/- | ५ (अ) व त्यावरील |
| ४ | मौजे गुंजेगाव येथे तलाठी कार्यालयाचे बांधकाम करणे. ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | १४,२४,४१३/- | ६ व त्यावरील |

| | |
|---|---|
| निविदा उपलब्ध कालावधी:- | दि. २०/०७/२०२६ (वेळ सकाळी १०.०० वा. पासून) ते २७/०७/२०२६ (सायं.१८.१५ पर्यंत) |
| निविदा पूर्व बैठक: | निरंक |
| तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करणेचा अखेरचा दिनांक.:- | दि. २७/०७/२०२६ (सायं.१८.१५ पर्यंत) |
| मूळ दस्तऐवज सादर करण्याचा अंतिम दिनांक (निविदा शर्त ८.१):- | ई-निविदा पोर्टलवर बीड लॉक झाल्यानंतर ७२ तासात हार्ड कॉपी १ प्रतीत कंत्राटदारांनी खालील कार्यालयामध्ये सादर करणे अनिवार्य आहे. **१. मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर** |
| निविदा उघडण्याचा कालावधी ठिकाण व वेळ.:- | दि. २८/०७/२०२६ मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता. |

१. निविदा सूचनाबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
१ www.mahapwd.gov.in २) www.mahatenders.gov.in (सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)३) कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,सोलापूर ४१३००३ कार्यालयात सूचना फलक

**सही/-**
**(डी.डी. परदेशी)**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**



# मॅराडोनाशी बरोबरी साधण्यासाठी मेस्सीला आणखी एका विश्वचषकाची गरज : भुतिया

**नवी दिल्ली, १७ जुलै**

अर्जेंटिनाचा कर्णधार लिओनेल मेस्सी याला दिग्गज मॅराडोनाच्या दर्जेदार कामगिरीशी बरोबरी साधण्यासाठी आणखी एका विश्वचषकाची गरज आहे, जर अर्जेंटिनाने रविवारी होणारी विश्वचषकाची अंतिम फेरी जिंकली, तर मेस्सी १९८६ मध्ये विश्वचषक जिंकून देणाऱ्या महान खेळाडू मॅराडोनाच्या बरोबरीला पोहोचेल, असे मत भारतीय फुटबॉल संघाचा माजी कर्णधार बायचुंग भुतिया याने व्यक्त केले.

अर्जेंटिनाचा सामना रविवारी न्यू यॉर्कमध्ये होणाऱ्या विश्वचषकाच्या अंतिम फेरीत स्पेनशी होणार आहे. मेस्सीच्या नेतृत्वाखाली अर्जेंटिनाने कतारमधील २०२२ चा फिफा विश्वचषकही जिंकला होता. मॅराडोनाच्या नेतृत्वाखाली अर्जेंटिनाने १९८६ मध्ये विजेतेपद पटकावले होते आणि १९९० च्या अंतिम फेरीत जर्मनीकडून पराभूत झालेल्या संघाचाही तो कर्णधार होता.

१९८६ चा विश्वचषक एकहाती जिंकून देण्याच्या मॅराडोनाच्या कामगिरीमुळे तो मेस्सीपेक्षा वरच्या स्थानावर राहतो. रविवारी मेस्सीने दुसरे विश्वचषक विजेतेपद मिळविल्यास तो मॅराडोनाच्या बरोबरीला येईल, असेही भुतियाने



नमूद केले आहे.

तुलना करणे कठीण आहे, पण माझ्यासाठी मॅराडोना श्रेष्ठ आहे, कारण त्याने १९८६ चा विश्वचषक एकहाती जिंकून दिला होता; इतिहासातील कोणत्याही खेळाडूने असे केले आहे असे मला वाटत नाही. मी त्याला १९८६ च्या विश्वचषकात आणि इतर सामन्यांमध्येही खेळताना पाहिले आहे, असे भुतियाने सांगितले. विश्वचषकातील कामगिरीच्या आधारे मॅराडोना आणि मेस्सी यांच्यातील श्रेष्ठतेबाबत त्याला विचारले असता त्याने हे मत व्यक्त केले.

**स्पेनचे पारडे जड**

स्पेन हा एक परिपूर्ण संघ आहे आणि रविवारी अर्जेंटिना विरुद्ध होणाऱ्या सामन्यात विजेतेपदासाठी तेच प्रबळ दावेदार आहेत. तरीही, अनेकदा जबरदस्त पुनरागमन करून विजय मिळवणाऱ्या मेस्सीच्या संघाला पूर्णपणे दुर्लक्षित करता येणार नाही, असेही बायचुंग भुतिया म्हणाला.

स्पेनची संघरचना परिपूर्ण आहे, त्यांची मध्यफळी अधिक सरस आहे व ते केवळ एका खेळाडूवर किंवा एका विशिष्ट क्षणावर अवलंबून राहत नाहीत, असे तो म्हणाला.

जेव्हा सर्वांना वाटले की अर्जेंटिनाचे आव्हान संपले आहे, तेव्हा त्यांनी जोरदार पुनरागमन केले आहे, ही बाब सर्वांनी लक्षात घ्यायला पाहिजे. सामना हातातून निसटला आहे असे वाटत असतानाही, त्यांनी विजय मिळविण्यासाठी काही ना काही मार्ग शोधून काढले आहेत. त्यामुळे अर्जेंटिनाचा खेळ अनपेक्षित असू शकतो, हे नक्की; तरीही मला वाटते की विश्वचषक जिंकण्याची स्पेनची संधी अधिक चांगली आहे.

पहिल्या उपांत्य सामन्यात स्पेनने फ्रान्सचा पराभव करणे ही फारशी आश्चर्याची गोष्ट वाटली नाही, परंतु दुसऱ्या उपांत्य सामन्यात १-० अशी आघाडी घेतल्यानंतरही इंग्लंडचा अर्जेंटिनाकडून झालेला पराभव मात्र त्याला मोठा 'धक्का' वाटला. मध्यफळी मजबूत असणे आणि चेंडूवर ताबा राखून मागच्या फळीतून खेळ उभारणे - स्पेनने संपूर्ण स्पर्धेत अशाच प्रकारे खेळ केला आहे. फ्रान्सने रणनीतीमध्ये, विशेषतः मध्यफळीत थोडे बदल करून अधिक चुरस निर्माण करायला हवी होती, कारण त्यांच्याकडे आक्रमणाच्या दृष्टीने चार उत्कृष्ट खेळाडू होते. मात्र, एमबाप्पे आणि ओलिसे यांना चेंडूचा पुरवठाच झाला नाही. यामुळे मोठा फरक पडला आणि स्पेनचे सामन्यावर पूर्ण वर्चस्व राहिले." ◂ (वृत्तसंस्था)

## मेस्सी मॅराडोनाच्या दर्जाच्या जवळ



मला वाटते की मेस्सी त्या दर्जाच्या अगदी जवळ आहे. जर तो हा विश्वचषक जिंकू शकला, तर मला वाटते की तो नक्कीच मॅराडोनाच्या दर्जापर्यंत पोहोचेल. मेस्सीने आधीच एक विश्वचषक जिंकला आहे, पण मॅराडोनाला मागे टाकण्यासाठी त्याला आणखी एक विश्वचषक जिंकण्याची गरज आहे, असे भुतियाने म्हटले.

मेस्सी एक महान खेळाडू आहे, पण त्याच्याभोवती एक उत्कृष्ट संघ आहे व हा संघ खरोखरच त्याच्यासाठी काम करतो. याउलट, मॅराडोनाला प्रत्येकासाठी काम करावे लागत असे आणि गोल करण्याच्या संधीही त्याला स्वतः निर्माण कराव्या लागत असत, असेही त्याने सांगितले.

२०२० मध्ये वयाच्या ६० व्या वर्षी निधन झालेल्या मॅराडोनाने चार विश्वचषकांमध्ये (१९८२, १९८६, १९९०, १९९४) सहभाग घेतला होता व २१ सामन्यांत आठ गोल केले होते. दुसरीकडे, मेस्सी आपली सहावी विश्वचषक स्पर्धा (२००६, २०१०, २०१४, २०१८, २०२२ आणि २०२६) खेळत आहे आणि त्याने आतापर्यंत ३३ सामन्यांत २१ गोल केले आहेत. त्याच्या नेतृत्वाखाली अर्जेंटिनाने २०१४ च्या विश्वचषकात उपविजेतेपदही पटकावले होते; त्यावेळी अंतिम सामन्यात त्यांना जर्मनीकडून ०-१ असा पराभव स्वीकारावा लागला होता. ■

# लॅमिन यामलचा विश्वचषक अंतिम फेरीपर्यंतचा प्रवास

**बार्सिलोना, १७ जुलै**

बार्सिलोनाच्या युवा अकादमीतून लहानाचे मोठे झालेले दोन खेळाडू रविवारी होणाऱ्या फिफा विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात एकमेकांसमोर उभे ठाकणार आहे. त्यामुळे बार्सिलोनाबाहेरील कामगार वर्गाची वस्ती आणि विविध वांशिक पार्श्वभूमी असलेल्या भागातील स्थानिक लोक न्यू जर्सीमध्ये होणाऱ्या स्पेन आणि अर्जेंटना यांच्यातील अंतिम सामन्याकडे अभिमानाने बघत आहे.

अर्जेंटिनाचा ३९ वर्षीय मेस्सी याने बार्सिलोनाच्या युवा अकादमीतून पुढे येत आपल्या कारकिर्दीतील सर्वोत्तम काळ तिथेच गाजवला. तर मेस्सीचा आदर करणारा स्पेनचा आक्रमक खेळाडू १९ वर्षीय लॅमिन यामलने याच अकादमीत आपली कौशल्ये विकसित केली.

आता हे दोन्ही दिग्गज खेळाडू एकमेकांविरुद्ध खेळणार आहेत, ही एक अविश्वसनीय गोष्ट आहे, असे सेनेगाली रहिवासी १८ वर्षीय केबा म्हणाला. त्याने बार्सिलोनाचा फॉरवर्ड लॅमिन यामल याच्या मेस्सीबद्दलच्या प्रसिद्ध आदराचा संदर्भ दिला.

न्यू जर्सीमध्ये रविवारी होणाऱ्या अंतिम सामन्यापूर्वी, मेस्सी आणि



लॅमिन यामल

लहान वयातील लॅमिन यामल यांचा एकत्र असलेला एक जुना फोटो सोशल मीडियावर खूप गाजत आहे. या छायाचित्रातून यामलचा मेस्सी व बार्सिलोनाशी असलेला संबंध स्पष्ट होतो.

मटारो या किनारपट्टीवरील शहरातील रोकाफोंडा भागात, लॅमिन यामलचा चेहरा असलेल्या एका भित्तिचित्रामागील मैदानावर स्थलांतरित कुटुंबांमधील मुले खेळत असताना, त्याची आजी फातिमा नसरावी आणि १५ वर्षांचा चुलत भाऊ रायन जवळच्या बाकावरून अभिमानाने बघत होते.

मला स्पेनने जिंकावे असे वाटते. लॅमिनने गोल केल्यास आपण मोठ्याने जल्लोष करू, असे फातिमा नसरावी म्हणाली.

लॅमिन माझ्या भावासारखा आहे. आम्ही एकत्र मोठे झालो आहे. माझ्यासाठी लॅमिन म्हणजे अनेक चांगल्या गोष्टींचे प्रतीक आहे, असे त्याच्या चुलत भावाने सांगितले.

**रोकाफोंडातील आपल्या मुळांचा सन्मान**

मोरोक्कन वडील आणि इक्वेटोरियल गिनी येथील आई यांच्या पोटी स्पेनमध्ये जन्मलेला लॅमिन यामल आपल्या मुळांना कधीच विसरला नाही. आपल्या कारकिर्दीत गोल केल्यानंतर त्याने नेहमीच '३०४' ही हाताची खूण (जेस्टचर) करून रोकाफोंडाचा सन्मान केला आहे; हा क्रमांक त्या परिसराचा पोस्टल कोड आहे.

विश्वचषकादरम्यान, त्याने 'रोकाफोंडा' असे लिहिलेली हेडबँड घातली, आपल्या बुटांवर पालकांच्या मूळ देशांचे ध्वज लावले आणि फुटबॉल हे वांशिक व सामाजिक एकात्मतेचे उदाहरण असल्याचे सांगितले. ◂ (वृत्तसंस्था)

# मिश्र मार्शल आर्ट्स विजेतेपदासाठी पाकिस्तानच्या आबिदशी 'संग्राम'

**नवी दिल्ली, १७ जुलै**

रविवारी क्वालालम्पूर येथे प्रतिष्ठेच्या 'स्ट्राईक आशिया' या मिश्र मार्शल आर्ट्सच्या किताबसाठी भारताचा संग्राम सिंग आणि पाकिस्तानचा मोहम्मद आबिद अली यांच्यात लढत होणार आहे. भारतीय 'मिक्स्ड मार्शल आर्ट्स' (एमएमए) लढवय्या संग्राम सिंग आपल्या कारकिर्दीतील एका अत्यंत महत्त्वाच्या लढतीसाठी सज्ज झाला आहे.

या लढतीबद्दल क्रीडा विश्वात मोठी उत्सुकता निर्माण झाली असून, यात विजयी होणाऱ्या खेळाडूला 'स्ट्राईक आशिया' चॅम्पियन'चा किताब बहाल केला जाणार आहे. व्यावसायिक कुस्तीतून 'मिक्स्ड मार्शल आर्ट्स'कडे वळण्याच्या संग्रामच्या उल्लेखनीय प्रवासातील हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे.

**संग्राम सिंगचा एमएमएमधील अपराजित प्रवास**

राष्ट्रकुल हेवीवेट कुस्ती स्पर्धेत दोनदा विजेता राहिलेल्या संग्रामची व्यावसायिक एमएमए कारकीर्द अत्यंत यशस्वी आणि अपराजित राहिली आहे. जॉर्जियामध्ये झालेल्या आपल्या पहिल्याच एमएमए लढतीत पाकिस्तानच्या अली रझा नासिरचा अवघ्या ९० सेकंदात पराभव करून त्याने जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण केली. त्यानंतर नेदरलँड्समध्ये ट्युनिशियाच्या हकीम त्राबेल्सीवर आणि अर्जेंटिनामध्ये फ्रान्सच्या फ्लोरियन कौडियरवर त्याने शानदार विजय मिळविले. अर्जेंटिनातील विजयामुळे तो अर्जेंटिनाच्या भूमीवर व्यावसायिक एमएमए लढत जिंकणारा पहिला भारतीय ठरला आणि त्याची अपराजित कामगिरी ३-० अशी झाली.



संग्राम सिंग

**पारंपरिक प्रतिस्पर्धी भावनेमुळे लढतीची रंगत वाढली**

चॅम्पियनशिप लढतीपूर्वी बोलताना संग्राम सिंग म्हणाला, "जेव्हा मी लढतीच्या रिंगणात उतरतो, तेव्हा मी केवळ माझ्यासाठी लढत नाही; तर १४० कोटी भारतीयांसाठी लढतो. कोणताही खेळ असो, भारत विरुद्ध पाकिस्तान सामना नेहमीच खास असतो व या लढतीशी जोडलेल्या भावनांची मला पूर्ण जाणीव आहे. मी पूर्ण शिस्तीने आणि प्रतिस्पर्ध्याचा आदर राखून सराव केला आहे, परंतु एकदा का 'रिंगणा'चे दरवाजे बंद झाले की, भारतीय तिरंगा उंच फडकविणे हेच माझे एकमेव ध्येय असेल. शारीरिक तंदुरुस्ती, समर्पण आणि मानसिक बळ ही कोणत्याही खेळाडूची सर्वात मोठी शस्त्रे असतात, असे मी मानतो, असे संग्राम म्हणाला. ◂ (वृत्तसंस्था)

# देशॉम्प्सचा निरोप, एमबाप्पेची विक्रमाकडे वाटचाल

**मियामी, १७ जुलै**

शनिवारी होणाऱ्या तिसऱ्या स्थानासाठीच्या सामन्यात फ्रान्स आणि इंग्लंडला विश्वचषकाच्या उपांत्य फेरीतील दारूण पराभवातून सावरून पुन्हा उभे राहावे लागेल. या सामन्यात दिदिएर देशॉम्प्स शेवटच्यांदा फ्रान्स संघाचे नेतृत्व करतील, तर किलियन एमबाप्पे वैयक्तिक विक्रम प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नात असेल. दोन्ही संघांच्या रचनेत या सामन्यात मोठे बदल होण्याची शक्यता आहे.

सलग तिसऱ्यांदा विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहोचण्याचे फ्रान्सचे स्वप्न मंगळवारी स्पेनकडून झालेल्या २-० अशा पराभवामुळे भंग पावले, तर दुसऱ्या दिवशी अर्जेंटिनाकडून २-१ असा पराभव झाल्यामुळे इंग्लंडलाही निराशाजनक क्षणाचा सामना करावा लागला.

**देशॉम्प्स यांचा निरोप घेणारा सामना**

मियामी येथील हा सामना देशॉम्प्स यांच्या १४ वर्षांच्या कार्यकाळाची सांगता करेल. या काळात त्यांनी फ्रान्सला २०१८ चे विश्वचषक विजेतेपद, चार वर्षांनंतरची अंतिम फेरी आणि सलग तीन वेळा विश्वचषकाची उपांत्य फेरी गाठून दिली.

प्रशिक्षक म्हणून दुसरे विश्वविजेतेपद मिळवून निवृत्त होण्याची ५७ वर्षीय देशॉम्प्स यांची इच्छा होती; तरीही, ज्या व्यक्तीने गेल्या दशकात फ्रान्सला आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधील सर्वात सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या संघांपैकी एक म्हणून प्रस्थापित केले, त्यांना निरोप देण्याची शेवटची संधी शनिवारी त्यांच्या खेळाडूंना मिळणार आहे.

**नकोसा वाटणारा 'कांस्य पदकाचा' सामना**

४८ संघांच्या या मोठ्या स्पर्धेत प्रदीर्घ प्रवास केल्यानंतर दोन्ही संघ शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या थकले आहेत. त्यामुळे, विजेतेपद जिंकण्याचे स्वप्न घेऊन उत्तर अमेरिकेत आलेल्या खेळाडूंसाठी तिसऱ्या स्थानासाठीचा (कांस्य पदकाचा) हा पारंपरिक सामना कदाचित एक नकोसे कर्तव्य वाटू शकतो.

यापैकी कोणत्याही खेळाडूला - फ्रान्सच्या कोणत्याही खेळाडूला - हा सामना खेळायचा नाही. त्यांना अंतिम सामना खेळायचा आहे. अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी आम्ही आमचे सर्वस्व पणाला लावले होते, असे इंग्लंडचे प्रशिक्षक थॉमस टुचेल यांनी म्हटले. ◂ (वृत्तसंस्था)


## एमबाप्पेची 'गोल्डन बूट' जिंकण्याची महत्त्वाकांक्षा

फ्रान्सचा संघ आपल्या सुरुवातीच्या फळीत मोठे बदल करण्याची शक्यता आहे; यात स्पर्धेत आतापर्यंत कमी खेळ मिळालेल्या खेळाडूंना संधी दिली जाऊ शकते. त्याचप्रमाणे, अत्यंत थकवा आणणाऱ्या मोहिमेनंतर 'टुशेल' देखील आपल्या संघाबाबत असाच दृष्टिकोन स्वीकारू शकतात.

तरीही, फ्रान्सचा कर्णधार एमबाप्पे याने सुरुवातीच्या फळीत खेळावे, यासाठी एक अत्यंत महत्त्वाचे कारण असू शकते.

२७ वर्षीय एमबाप्पेने या विश्वचषकात आठ आणि एकूण २० गोल केले आहेत. यामुळे तो 'गोल्डन बूट'च्या शर्यतीत आहे आणि स्पर्धेतील सर्वाधिक गोल करण्याच्या विक्रमाच्याही अगदी जवळ पोहोचला आहे.

तिसऱ्या स्थानासाठीच्या या सामन्यावर संघावर फारसा दबाव नसल्यामुळे, एमबाप्पेसाठी ही एक शेवटची संधी ठरू शकते. फ्रान्सच्या मोहिमेचा निराशाजनक शेवट एका अशा अविस्मरणीय क्षणात बदलण्याची ही संधी असेल. ■



एमबाप्पे व प्रशिक्षक दिदिएर

## आगामी सामने

**तिसऱ्या स्थानासाठीचा सामना**
**फ्रान्स वि. इंग्लंड**
**वेळ :** शनिवार-रविवार पहाटे २.३० वाजतापासून
**स्थळ :** हार्ड रॉक स्टेडियम, मियामी

**अंतिम सामना**
**स्पेन वि. अर्जेंटिना**
**वेळ :** रविवारी रात्री १२.३० वाजतापासून
**स्थळ :** न्यू यॉर्क स्टेडियम, न्यू जर्सी
**थेट प्रसारण :** युनाईट८ (झी५)

# तिसऱ्या वन-डेतून 'सुंदर'बाहेर

**नवी दिल्ली, १७ जुलै**

भारताचा ऑफ-स्पिन अष्टपैलू खेळाडू वॉशिंग्टन सुंदर पायाच्या दुखापतीमुळे इंग्लंडविरुद्ध लॉर्ड्सवर रविवारी होणाऱ्या तिसऱ्या आणि निर्णायक वन-डे सामन्यातून बाहेर झाला आहे.



गुरुवारी कार्डिफ येथे भारताने सहा गड्यांनी पराभव पत्करलेल्या दुसऱ्या वन-डे सामन्यात ३३ व्या षटकात धाव घेताना २६ वर्षीय वॉशिंग्टनला ही दुखापत झाली. फिजिओ कमलेश जैन यांनी तपासणी करून त्याच्या उजव्या मांडीवर पट्टी बांधल्यानंतर त्याने पुन्हा फलंदाजी सुरू केली; मात्र, वेगवान गोलंदाज साकिब महमूदचा आखुड टप्प्याचा चेंडू खेळताना चेंडू त्याच्या बॅटची कडा घेऊन यष्टिरक्षक जोस बटलरच्या हातात गेला व तो दोन धावांवर बाद झाला.

त्यानंतर, इंग्लंडच्या फलंदाजीच्या वेळी वॉशिंग्टन क्षेत्ररक्षणासाठी मैदानात उतरला नाही आणि त्याच्या जागी अर्शदीप सिंगने बदली क्षेत्ररक्षक म्हणून काम पाहिले. तीन सामन्यांची ही मालिका सध्या १-१ अशी बरोबरीत आहे आणि निर्णायक सामना ऐतिहासिक लॉर्ड्स मैदानावर खेळविला जाणार आहे.

वॉशिंग्टनच्या दुखापतीतून सावरण्यासाठी त्याला काही आठवडे विश्रांती आणि पुनर्वसनाची गरज आहे, त्यामुळे तो रविवारी होणाऱ्या सामन्यात खेळू शकणार नाही. त्याच्या अनुपस्थितीत, डावखुरा फिरकीपटू कुलदीप यादवला अंतिम अकरा खेळाडूंच्या संघात स्थान मिळू शकते.

वॉशिंग्टनला दुखापत झाली असून त्याची दुखापत गंभीर दिसते, असे भारताचे फलंदाजी प्रशिक्षक सितांशु कोटक यांनी सांगितले.

एजबॅस्टन येथील मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताच्या विजयात वॉशिंग्टनने नाबाद ५२ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली होती. त्याच्या अनुपस्थितीमुळे संघात मोठी पोकळी निर्माण झाली आहे, कारण त्याच्यासारखा दुसरा अष्टपैलू खेळाडू उपलब्ध नाही; विशेषतः हार्दिक पांड्या, हर्षित राणा आणि नितीश कुमार रेड्डी हे वेगवान गोलंदाजी करणारे अष्टपैलू खेळाडू आधीच विविध दुखापतींमुळे संघाबाहेर आहेत. ◂ (वृत्तसंस्था)

# हव्याप्रमंची आशियाई जलतरण स्पर्धेत तिरंगी झेप

## तीन जलतरणपटू भारतीय संघात

**अमरावती, १७ जुलै**

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या जलतरण विभागाने आणखी एक ऐतिहासिक यश आपल्या नावावर नोंदवत अमरावतीच्या क्रीडा क्षेत्राचा मान उंचावला आहे. थायलंडमधील बँकॉक येथे १५ ते २५ जुलै या कालावधीत होणाऱ्या १२ व्या एशियन एज ग्रुप वॉटर पोलो चॅम्पियनशिपसाठी मंडळाच्या स्वर्णिम मिलिंद चेपे, मंथन लोमहर्ष मंथन आणि शौर्य अमित गुप्ता या तीन गुणवान जलतरणपटूंची भारतीय संघात निवड झाली आहे. या निवडीमुळे संपूर्ण विदर्भासह अमरावतीच्या क्रीडा विश्वात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ हे देशातील जलतरण आणि वॉटर पोलो क्षेत्रातील अग्रगण्य प्रशिक्षण केंद्र म्हणून ओळखले जाते. मंडळाच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या जलतरण तलावावर गेल्या अनेक वर्षांपासून नियमित सराव करणाऱ्या या तिन्ही खेळाडूंनी कठोर मेहनत, सातत्य आणि उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर भारतीय संघात स्थान मिळविले आहे.



मंडळाचे यशस्वी तीन जलतरणपटू

मंडळाकडून या खेळाडूंना अत्याधुनिक सुविधा, दर्जेदार प्रशिक्षण आणि आवश्यक क्रीडा मार्गदर्शन विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये त्यांनी अनेक पदके पटकावत आपल्या गुणवत्तेची छाप उमटविली असून, आता ते आशियाई स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत. त्यामुळे अमरावतीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या उल्लेखनीय यशाचे श्रेय खेळाडूंनी मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, सचिव प्रा. डॉ. माधुरी चेंडके, अमरावती जलतरण संघटनेचे अध्यक्ष वसंत हरणे, प्रा. डॉ. टॉमी जोश, प्रा. डॉ. लक्ष्मीकांत खंडागळे, जलतरण विभागप्रमुख व प्रशिक्षक प्रा. डॉ. योगेश निर्मळ, तसेच प्रशिक्षक मयूर कुमार आणि वैभवी थेटे यांना दिले आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# लंका प्रीमियर लीग संघाच्या भारतीय सह-मालकाला अटक

**कोलंबो, १७ जुलै**

लंका प्रीमियर लीग (एलपीएल) मधील 'जाफना किंग्स' या फ्रॅन्चायझीचे सह-मालक आणि भारताचे माजी '१९ वर्षांखालील' क्रिकेटपटूला, एका खेळाडूला लाच देण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून श्रीलंकेच्या क्रीडा क्षेत्रातील भ्रष्टाचार-विरोधी तपास पथकाने शुक्रवारी अटक केली. स्पर्धेची सहावी आवृत्ती सुरू होण्याच्या काही तास आधी ही अटक करण्यात आली.

२०१८ च्या '१९ वर्षांखालील' क्रिकेट विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात सामना-विजेते शतक झळकावल्यामुळे ओळखल्या जाणाऱ्या मनजोत कालरा याला, क्रीडा क्षेत्राशी संबंधित गुन्ह्यांचा तपास करणाऱ्या विशेष पोलिस पथकाने अटक केली आणि नंतर दंडाधिकाऱ्यांसमोर हजर केले.

२७ वर्षीय कालरा याने या वर्षाच्या सुरुवातीला 'जाफना किंग्स' फ्रॅन्चायझीमध्ये गुंतवणूक केली होती. श्रीलंकन पोलिसांच्या माहितीनुसार, कालरा याच्यावर या स्पर्धेच्या संदर्भात एका खेळाडूला पैशांचे आमिष दाखवून प्रलोभित करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. ■

# सिंधू जपान ओपनच्या उपांत्य फेरीत



पी. व्ही. सिंधू

**टोकियो, १७ जुलै**

जपानच्या नोझोमी ओकुहाराने शुक्रवारी होणाऱ्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यापूर्वी माघार घेतल्यामुळे, २०१९ ची बीडब्ल्यूएफ विश्वविजेती पी. व्ही. सिंधू जपान ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत पोहोचली आहे.

२०२३ मधील डेन्मार्क ओपननंतर 'सुपर ७५०' दर्जाच्या स्पर्धेच्या अंतिम चारमध्ये सिंधूचे हे पहिलेच आगमन असेल. याआधी मलेशिया ओपन सुपर १००० आणि ऑस्ट्रेलियन ओपन सुपर ५०० स्पर्धांमध्येही तिने उपांत्य फेरी गाठली होती; अशा प्रकारे या हंगामात तिने आतापर्यंत तीन वेळा उपांत्य फेरीत धडक मारली आहे. अंतिम फेरीतील स्थानासाठी आता सिंधूचा सामना टोकियो ऑलिम्पिक विजेती चीनच्या चेन युफेईशी होईल. ◂ (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडून विक्रम कदम यांचा सत्कार

**पंढरपूर, दि. १७ जुले -**
पंढरपूर येथील विक्रम कदम हे मुंबई विद्यापीठांतर्गत एलएलबी पदवी परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचा मुंबई येथे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सत्कार केला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार शंकर कदम, पिंपरी चिंचवडचे नगरसेवक सद्गुरू कदम, पायल साठे आदी उपस्थित होते. विक्रम कदम यांचे शिक्षण बी.ए., मास कम्युनिकेशन ॲण्ड जर्नालिझम पत्रकारिता पदवीचे झाले आहे. पंढरपूर येथे पत्रकार म्हणून काम करीत आहेत. विविध वृत्तपत्र, युट्यूब चॅनलच्या पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांच्या विविध समस्यांना आवाज उठवून त्यांना प्रकाशझोतात आणून त्यांना न्याय मिळवून दिलेला आहे. नुकताच त्यांनी तीन वर्षे विविध विषयांचा अभ्यास करून एलएलबी परिक्षा उत्तीर्ण होवून वकील पदवी मिळवली आहे.



### रामचंद्र हक्के यांच्याकडून विद्यार्थ्यांना चित्रकला साहित्य वाटप

**सोलापूर, दि. १७ जुलै -**
रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, कुसूर येथे दि. १५ जुलै रोजी चित्रमहर्षी तथा रावजी सखाराम हायस्कूल, सोलापूरचे निवृत्त शिक्षक रामचंद्र हक्के व त्यांची नात वर्षा अतनूरे यांनी आपल्या आई-वडिलांच्या पवित्र स्मृतिप्रीत्यर्थ विद्यार्थ्यांना चित्रकला साहित्याचे वाटप केले. तसेच खाऊही दिला. ले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्कूल कमिटीचे स्थानिक चेअरमन सुनील नांगरे होते. प्रमुख उपस्थितीत मुख्याध्यापिका चंद्रकला भोरे, निवृत्त मुख्याध्यापक संजय जोशी, कुसूर शाखेतील निवृत्त शिक्षक कल्लाप्पा बिराजदार, एमएसईबीचे अधिकारी दत्तात्रेय आरोळे, ज्येष्ठ शिक्षक पवार, महामुनी, पाटील तसेच शेख उपस्थित होते. सूत्रसंचालन सचिन पाटील यांनी केले, तर आभार महामुनी यांनी मानले.

### ३० कोटी वृक्षलागवड मोहिमेला साथ द्या : दिलीप पतंगे

**सोलापूर दि.१७ जुलै**
पर्यावरण संवर्धनाला लोकचळवळीचे स्वरूप देण्यासाठी सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनने मोठा पुढाकार घेतला असून, जिल्ह्यातील प्रत्येक सहकारी पतसंस्थेने किमान १०० विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड करून त्यांचे संवर्धन करावे, असे आवाहन फेडरेशनचे अध्यक्ष दिलीप पतंगे यांनी केले आहे. या उपक्रमातून जिल्ह्यात तब्बल १ लाख १५ हजार वृक्ष लागवडीचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. एक पेड माँ के नाम या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पर्यावरणपूरक संकल्पनेला तसेच राज्य शासनाच्या ३० कोटी वृक्ष लागवड अभियानाला सहकार क्षेत्राने सक्रिय साथ द्यावी, या उद्देशाने फेडरेशनने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. सर्व पतसंस्थांनी स्थानिक पातळीवर उपलब्ध जागांचा वापर करून विविध देशी प्रजातींची झाडे लावावीत आणि त्यांचे संगोपन करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

### पोलिसात तक्रार केल्याने महिलेला मारहाण व धक्काबुक्की

**सोलापूर, दि. १७ जुलै -**
आमच्या विरुद्ध पोलिसात तक्रार का केली असे म्हणून एका महिलेला हाताने मारहाण करून धक्काबुक्की केल्याची घटना होटगी रोडवरील बेडर कनप्पा नगरात आज शुक्रवारी दुपारी साडेबारा वाजता घडली. अरुण प्रकाशित बेंजरपे (वय ४५, रा. बेडर कनप्पा नगर) असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे . त्या आज शुक्रवारी दुपारी राहत्या घराजवळ असताना त्यांना गणेश कांबळे, जिजाबाई कांबळे व इतर सहा जणांनी मिळून मारहाण केली. यात सर्व अंगाला मुकामार लागल्याने त्या स्वतः उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल झाल्या.

### ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार जागीच ठार; चालकावर गुन्हा

**सोलापूर, दि. १७ जुलै-**
भर वेगातील मालट्रकच्या धडकेत एक दुचाकीस्वार जागीच ठार झाला. ही घटना जुना बोरामणी नाका चौकात गुरुवारी सायंकाळी घडली. याप्रकरणी ट्रक चालकाविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एस.अरुण सुंदरसन (वय ३८,रा. तामिळनाडू) असे गुन्हा दाखल केलेल्या ट्रक चालकाचे नाव आहे. याबाबत मयताचा भाऊ सचिन दौलत पाचंगे (वय-२१, रा. पापनाश नगर,तुळजापूर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीचा भाऊ श्रावण दौलत पाचंगे (वय-२३,रा.पापनाश नगर,तुळजापूर) हा गुरुवारी सायंकाळी त्याची मोटार सायकल (क्र. एम एच १२ सी ई ८७९७ ) वरून मेहता शाळा शेळगी येथून कुकर, मिक्सरचे साहित्य आणण्यासाठी शहरात जात होता. जुना बोरामणी नाका चौक येथे वरील आरोपीने ट्रक (क्र. टी एन ५२ ए डी ३४३२ ) हयगयीने चालवून मोटार सायकलीस बाजुने धडक दिली. यावेळी फिर्यादीचा भाऊ खाली पडून ट्रकखाली आल्याने फरफटत गेला. तसेच गंभीर दुखापत होवून जागीच मृत्यूमुखी पडला. त्याच्या मृत्युस संबंधित ट्रकचालक जबाबदार असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलिस हवालदार मस्के हे गुन्ह्याचा तपास करत आहेत.

### ५२ वर्षीय व्यक्तीची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर, दि. १७ जुलै-**
अज्ञात कारणावरून एका ५२ वर्षीय व्यक्तीने घरातील छताच्या लोखंडी हुकाला साडीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. नीलम नगर येथे गुरुवारी ही घटना घडली. दत्तात्रय कोंडा (वय ५२, रा. नवदुर्गा मंदिराजवळ नीलम नगर) असे त्या व्यक्तीचे नाव आहे. गुरुवारी संध्याकाळी याबाबत घरच्यांना कळल्यानंतर एमआयडीसी पोलिसांना सांगितले. पोलीस हवालदार डी. के. डोके यांनी घटनास्थळी पोहोचून मृतदेह सिव्हीलमध्ये शव विच्छेदनासाठी दाखल केला.

# तीन प्रकल्पांवरील पंपांना ५ तास वीज पुरवठा

## जिल्हाधिकाऱ्यांचे महावितरणला आदेश; शेतकऱ्यांना मोठा दिलासा

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १७ जुलै -**
लांबलेला पाउस आणि अल निनोच्या पार्श्वभूमीवर जलसाठ्याचे नियोजन करण्यासाठी प्रशासनाने धरणांवरील वीज पुरवठा खंडित केला होता. मात्र, शेतकऱ्यांची अडचण आणि पिकांची गरज लक्षात घेऊन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आज जवळगाव, हिंगणी (पा) आणि एकरुख या मध्यम प्रकल्पांवरील कृषी पंपांचा विद्युत पुरवठा अत्यावश्यक सेवेसाठी दररोज ५ तास सुरू ठेवण्याचे थेट महावितरणला दिले आहेत.
प्रशासनाने घेतलेल्या या सकारात्मक भूमिकेमुळे या परिसरातील शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे. कृषी पंपांची वीज खंडित झाल्यामुळे पिके जळण्याची भीती निर्माण झाली होती. यावर लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (सिंचन) उपअभियंता व सहाय्यक प्रशासक यांनी दि. १६ जुलै रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्राद्वारे विनंती केली होती. शेतकऱ्यांची निकड आणि पिकांचे नुकसान लक्षात घेऊन जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी तात्काळ निर्णय बदलला. त्यानुसार, तिन्ही मध्यम प्रकल्पांवरील कृषी पंपांना अत्यावश्यक सेवेअंतर्गत दररोज ५ तास वीज पुरवठ्याचे आदेश आज (दि. १७ जुलै) महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यांना दिले.
या निर्णयामुळे या तिन्ही मध्यम प्रकल्पांच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना पिकांसाठी पाणी उपसणे शक्य होणार आहे. ऐन टंचाईच्या काळात पिकांना संजीवनी मिळणार आहे.

### जलसंपदा विभागाशी समन्वय राखण्याच्या सूचना

सोलापूरच्या जलसंपदा विभागाशी योग्य तो समन्वय साधून पुढील योग्य ती कार्यवाही करावी, असेही आदेशात स्पष्ट केले आहे. आदेशाची प्रत कार्यकारी अभियंता, सोलापूर पाटबंधारे विभाग यांनाही पाठवली आहे.



# बार्शी येथे अवैध धंद्यावर धडक कारवाई

## ९ जण ताब्यात; १० हजारांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.१७ जुलै-**
बार्शी शहर पोलीस ठाणे हद्दीत पंढरपूर आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, या दृष्टिकोनातून अवैध धंद्यांवर कारवाई करण्यात आली.
सदर विशेष मोहिमेत बार्शी शहरातील अवैध दारू विक्री, जुगार, मटका यांच्यावर कारवाई करण्यात आली. बार्शी शहरातील एकूण ९ ठिकाणी छापे टाकून ९ जणांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ९,८०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.
रंजना हेमंत भोसले, रा. आगळगाव रोड बार्शी, संजय नागनाथ गव्हाणे रा. ताडसौंदणे रोड बार्शी, विकास तायाप्पा काळे, रा. वैद्य वस्ती बार्शी, सुनिता राजू पवार, रा. ताडसौंदणे रोड, सैफन तालुकदार शेख, रा. मेहंदीनगर बार्शी, विकास अनिल राऊत, रा. कसबा पेठ बार्शी, शुभम बापु केवडकर, रा. सोलापूर रोड, लतीफ चाँद सय्यद, रा. आशा टॉकीजजवळ बार्शी, सतीश गोविंद सावळे, रा. सावळ चाळ बार्शी अशी आरोपींची नावे आहेत.
सदर कामगिरी जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, उपाधिक्षक विजय कबाडे व बार्शी शहर उपविभागीय अधिकारी सुहास जगताप यांचे मार्गदर्शनाखाली बार्शी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश कुंभार, सपोनि सुनिल धनवे, पोसई अभयकुमार माकणे, पोहेकॉ भोसले, पोफळे, पोहेका लाड, पोहेको गोळवे, पोना अडसूळ, पोना जाधव पोकॉ चौधरी व सर्व डीबी पथकाने केली.

# नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांवर कर्जमाफीत अन्याय

## शेतकऱ्यांमधून तीव्र नाराजी; ५० हजार देवून केली बोलवण

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि. १७ जुलै -**
महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफीत नियमित कर्जफेड करणाऱ्यांना फक्त ५० हजार रुपयांचे अनुदान जाहीर केले. मात्र ते अत्यंत तोकडे असल्याची भावना सदर शेतकऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्याकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.
सरकारने थकीत शेतकऱ्यांसाठी दोन लाखापर्यंत कर्जमाफी जाहीर केली आहे. नुकत्याच झालेल्या अधिवेशनात यातील बरेच निकष काढून टाकले. पण नियमितपणे कर्ज फेड करणाऱ्या शेतकऱ्यांना फक्त पन्नास हजार रुपयांचेच अनुदान जाहीर केले. जिवाचा आटापिटा करीत व्याजाने पैसे काढून खाजगी सावकार असो किंवा प्रपंचात प्रचंड मोठी काटकसर करून कर्ज नियमीत भरणाऱ्या शेतकऱ्यांना यात अन्याय झाल्यासारखे वाटत आहे. वेळेत कर्ज भरून सोसायट्या, बँका, पतसंस्था जिवंत ठेवण्याचे काम करणाऱ्यांची शासनाने प्रत्येक वेळी फक्त पन्नास हजारावर बोळवण करून एक प्रकारे थट्टाच केली आहे, अशी भावना ते व्यक्त करत आहेत.
कर्ज घेतल्यावर जे परत सोसायटी किंवा बँकेकडे कधीच फिरकतच नाही, अशा शेतकऱ्यांना सरकार पुर्ण कर्जमाफी देत आहे. मात्र नियमीत कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांवर अन्याय केला जात आहे. जे शेतकरी नियमीत कर्ज भरतात त्यांना शासन सधन शेतकरी समजत आहे काय असा प्रश्न त्यांच्याकडून विचारला जात आहे. अनेक वर्षापासून कर्ज थकीत शेतकऱ्यांसाठी शासन वारंवार नियम बदलते. मग नियमीत कर्ज फेड करणाऱ्या शेतकऱ्यांवर शासन तिसऱ्यांदा का अन्याय करीत आहे असा सवाल शेतकरी विचारत असुन आम्हाला सुद्धा दोन लाखापर्यंत लाभ द्यावा अशी मागणी शेतकरी करीत आहेत.नियमीत कर्ज फेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दोन लाखापर्यंत अनुदान देऊन सन्मान करावा अशी मागणी होत आहे.

### दोन लाखापर्यंत अनुदान द्या

शासनाने कर्जमाफीत थकीत शेतकऱ्यांसाठी २ लाखापर्यंत कर्ज माफी जाहीर केली आहे. मात्र नियमित कर्ज फेड करतात त्यांना पन्नास हजार रुपयाचे अनुदान जाहीर केले आहे. शासनाने तिसऱ्यांदा नियमीत कर्ज फेड करणाऱ्या शेतकऱ्यांना पन्नास हजार रुपये जाहीर करुन मोठा अन्याय केला आहे. त्यांनाही २ लाखापर्यंत अनुदान द्यावे.
**- अजित बोरकर,** अध्यक्ष सवाभिमानी शेतकरी संघटना, माळशिरस तालुका.



# अतिक्रमणमुक्त जागेच्या सुशोभीकरणासाठी १ कोटींचा निधी

### पालकमंत्र्यांचा निर्णय; शिवाजी महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसराचा होणार कायापालट

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि .१७ जुलै-**
नगरपंचायतीने नुकतीच अतिक्रमणमुक्त केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या मार्गावरील मोकळ्या जागेच्या सुशोभीकरण होणार आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी तात्काळ १ कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याचे महाळुंग-श्रीपूर नगरपंचायतीचे भाजप गटनेते राहुल रेडे-पाटील यांनी सांगितले.
या निधीमुळे अतिक्रमण हटविल्यानंतर निर्माण झालेल्या मोकळ्या जागेचा नियोजनबद्ध विकास होणार आहे. परिसराचे सौंदर्य वाढण्याबरोबरच नागरिकांना आकर्षक व स्वच्छ सार्वजनिक जागा उपलब्ध होणार आहे. रस्त्यालगत हरित पट्टा, आकर्षक पेव्हिंग, विद्युत रोषणाई, बसण्याची व्यवस्था आणि अन्य नागरी सुविधांचा समावेश असलेले सुशोभीकरण करण्यात येणार आहे.
राहुल रेडे-पाटील यांनी माळशिरसचे माजी आमदार राम सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे यांच्या सहकार्याने पालकमंत्र्यांकडे याबाबत मागणी केली होती. निधी मंजूर झाल्याने शहराच्या विकासाला नवी दिशा मिळणार असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे. निवेदन देताना नगरसेवक निनाद पटवर्धन, रावसाहेब सावंत,विक्रम लाटे आदी उपस्थित होते

### सुशोभीकरणासाठी आराखडा तयार करण्याच्या सूचना

अतिक्रमणमुक्त जागेच्या सुशोभीकरणासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांना निवेदन दिले होते. त्यांनी तात्काळ १ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या कामामुळे शहराच्या सौंदर्यात निश्चितच भर पडेल. **- राहुल रेडे-पाटील,** भाजप गटनेते, महाळुंग-श्रीपूर नगरपंचायत.

# पत्नी बरोबरील भांडणात पतीने पिले फिनाइल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**
पत्नी बरोबरील भांडणात एका पतीने फरशी पुसण्याचे फिनाईल पिल्याची घटना शांती चौकात गुरुवारी संध्याकाळी घडली. करण अनिल देवकुळे (वय ३१, रा. रविवार पेठ, सोलापूर ) असे त्या पतीचे नाव आहे. गुरुवारी संध्याकाळी घरामध्ये नवरा बायकोचे भांडण झाले. या रागात त्याने फरशी पुसण्याचे फिनाईल पिले. त्यामुळे त्याला उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात बहीण सोनम हिने रात्री नऊ वाजता दाखल केले.

# पालखी मार्गावरील इमर्जन्सी ऑपरेटिंग सेंटर सज्ज ठेवा

## जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन; इन्सिडेंट कमांडर गणेश निऱ्हाळींकडून इओसींची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै -**
आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर पालखी मार्गावरील आपत्कालीन व्यवस्थापन अधिक बळकट करण्यासाठी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी सर्व इमर्जन्सी ऑपरेटिंग सेंटर तातडीने सज्ज करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या मोहिमेचे इन्सिडेंट कमांडर म्हणून अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी काम पाहत आहेत.
अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी मंगळवारी माळशिरस तालुक्यातील सर्व इओसींची भेट देऊन पाहणी केली. यापूर्वी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे झालेल्या बैठकीत सर्व इओसी इन-चार्ज यांना आपापल्या केंद्राला भेट देऊन आवश्यक सुविधा तात्काळ उपलब्ध करून घेण्याच्या सूचना दिल्या होत्या.
यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन मुख्याधिकारी अभिजीत पाटील, माळशिरस तहसिलदार सुरेश शेजुळ उपस्थित होते. माळशिरस तालुक्यातील सर्व इओसीसाठी बीएसएनएल फोन तहसीलदार माळशिरस यांच्याकडे कार्यान्वित करून दिले आहेत. ते संबंधितांनी तात्काळ ताब्यात घ्यावेत.
आषाढी वारी कालावधीत कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी सर्व इओसी २४ तास अलर्ट मोडवर ठेवली आहेत. सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून वारकऱ्यांना गैरसोय होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी केले आहे.



### मंडप व दळणवळण व्यवस्थेबाबत सूचना

मंडप आणि इतर आवश्यक व्यवस्था उभारण्यासाठी सर्व इओसी इन-चार्ज यांनी संबंधित गटविकास अधिकारी तसेच नगरपरिषद मुख्याधिकारी यांच्या सतत संपर्कात राहून कामे पूर्ण करून घ्यावीत, अशा सूचनाही दिल्या.

### डेप्युटी इन्सिडेंट कमांडर यांना अहवाल देण्याचे आदेश

पाहणीअंती सर्व इओसी इन-चार्ज यांनी केलेल्या कार्यवाहीचा अद्ययावत अहवाल डेप्युटी इन्सिडेंट कमांडर तथा उपविभागीय अधिकारी यांना सादर करावा, असे निर्देश अप्पर जिल्हाधिकारी निऱ्हाळी यांनी दिले. इओसीसाठी अतिरिक्त कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्यास इओसी यांच्याकडून आदेश घेऊन मनुष्यबळ उपलब्ध करून घ्यावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.



# करमाळ्यात नवनियुक्त विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.१७ जुलै -**
विशेष कार्यकारी अधिकारी पदी निवड झालेल्या व्यक्तींनी आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून प्रशासन व सामान्य लोकांच्यामध्ये दुवा म्हणून काम करावे असे प्रतिपादन भाजप नेते दिग्विजय बागल यांनी आज केले.
करमाळा तालुक्यातील विशेष कार्यकारी अधिकारीपदी निवड झालेल्यांना सदस्यांना निवड पत्र प्रदान कार्यक्रमात ते बोलत होते. करमाळा तालुक्यातील २४ जणांची जिल्हाधिकारी सोलापूर यांनी विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून निवड केली आहे. भाजपा महिला प्रदेश उपाध्यक्ष रश्मी बागल व पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या शिफारशीवरून निवडलेल्या या सदस्यांना करमाळा कार्यालयात दिग्विजय बागल व विलास घुमरे यांच्या हस्ते निवडपत्र प्रदान केले. यावेळी विद्या विकास मंडळाचे सचिव विलास घुमरे यांनी विशेष कार्यकारी अधिकारी पदाच्या माध्यमातून विद्यार्थी व गरजूंना वेळ व काळाचे बंधन न पाळता मदत करण्याचे आवाहन केले.
कार्यक्रमाला आदिनाथ कारखान्याचे माजी अध्यक्ष धनंजय डोंगरे, श्री.मकाई कारखान्याचे संचालक सतीश निळ, रेवणाथ निकत, आशिष गायकवाड, राम हाके, नितीन तकीक, शिवाजी कदम यांच्यासह तालुक्यातील कार्यकर्ते उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रशेखर जोगळेकर यांनी केले तर आभार रोकडे यांनी मानले
अतुल बदर, शिल्पा पाटील (साडे), राजकुमार कोरे (पाथर्डी), अक्षय शेंडगे (गोयेगाव), अनिल पवार (हिवरवाडी), विजयसिंह मोहोळ (केम) नितीन निमगिरे ( जेऊरवाडी), रेश्मा इंगोले (कोंढेज), बलभीम कांबळे (पोफळज), शिवाजी पिसाळ (झरे), लक्ष्मण खोमणे (गुलमोहरवाडी), दत्तात्रय सरडे (करंजे), सोनाली क्षीरसागर (केडगाव), भाग्यश्री बर्डे (रावगाव), संतोषकुमार जाधव (कोटी), मनोहर लांडगे (कोंढार चिंचोली), गजेंद्र पोळ (शेटफळ), अक्षय घाडगे (तरडगाव), नितीन तकीक (वांगी), हनुमंत वीर (पिंपळवाडी), तानाजी पवळ (शेलगाव), सविता कांबळे (करमाळा), बिभिषण नागणे (केम), शुभम वेदपाठक ( साडे) यांच्या निवडी झाल्या आहेत.

# शाळा, अंगणवाडी, पशुवैद्यकीय दवाखाने, आरोग्य केंद्रांसह विविध कामांचा आढावा



## जि.प.बांधकाम विभाग क्र.१ ची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१७ जुलै-**

जिल्हा परिषद सोलापूरच्या बांधकाम विभाग क्रमांक १ च्या अखत्यारित असलेल्या इमारती, नवीन शाळा खोल्या, शाळा दुरुस्ती, नवीन अंगणवाड्या, अंगणवाडी दुरुस्ती, पशुवैद्यकीय दवाखाने, क वर्ग तीर्थक्षेत्र विकास, प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या कामांचा तालुकानिहाय आढावा बैठकीत घेण्यात आला. दरम्यान, दि.४ जूनच्या तुलनते दि.१७ जुलै २०२६ रोजी झालेल्या बैठकीत अनेक योजनांतील पूर्ण झालेल्या कामांची संख्या वाढल्याचे दिसून आले.

नवीन शाळा खोल्या, शाळा दुरुस्ती आणि अंगणवाडी बांधकामांच्या कामांमध्ये लक्षणीय प्रगती झाली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सुरक्षित व दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी कामांना प्राधान्य देण्यात आले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे व पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या इमारतींच्या कामांनाही गती मिळत असल्याने ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला बळकटी मिळणार असल्याचे सांगण्यात येते.

### दि.२४ जून ते दि.१७ जुलै २०२६ कामांचा प्रगती आढावा

*** मुख्य इमारत बांधकाम (५०५४-२०८१)**

एकूण कामे : १२५ २४ जूनपर्यंत पूर्ण : २७ १७ जुलैपर्यंत पूर्ण : ३२ प्रगतीत : ५४ ५२ निविदा प्राप्त : २८ २९ निविदा अप्राप्त : १६ ११ रद्द/इतर योजनेत मंजूर : ० १

*** विशेष बांधकाम (५०५४-४३३५)**

एकूण कामे : १० २४ जूनपर्यंत पूर्ण : ७ १७ जुलैपर्यंत पूर्ण : ६ प्रगतीत : १ निविदा प्राप्त : २ ३ निविदा अप्राप्त : ० १

*** नवीन शाळा वर्ग खोल्या**

एकूण कामे : ९६ २४ जूनपर्यंत पूर्ण : ४ १७ जुलैपर्यंत पूर्ण : ६ प्रगतीत : ३५ ३३ निविदा प्राप्त : २९ ३४ निविदा अप्राप्त : २६ २१ रद्द/इतर योजनेत मंजूर : २

*** शाळा दुरुस्ती**

एकूण कामे : १४५ २४ जूनपर्यंत पूर्ण : ९ १७ जुलैपर्यंत पूर्ण : १० प्रगतीत : ५२ ६१ निविदा प्राप्त : २३ २८ निविदा अप्राप्त : ६० ४५ रद्द/इतर योजनेत मंजूर : १

*** नवीन अंगणवाडी**

एकूण कामे : ३९ २४ जूनपर्यंत पूर्ण : १६ १७ जुलैपर्यंत पूर्ण : १८ प्रगतीत : ११ १९ निविदा प्राप्त : १२ १०

***अंगणवाडी दुरुस्ती**

एकूण कामे : ५३ २४ जूनपर्यंत पूर्ण : १ १७ जुलैपर्यंत पूर्ण : ९ प्रगतीत : १२ १६ निविदा अप्राप्त : ३७ २७

***पशुवैद्यकीय दवाखाने**

एकूण कामे : १२ २४ जूनपर्यंत पूर्ण : ३ १७ जुलैपर्यंत पूर्ण : ३ प्रगतीत : २ ३ निविदा प्राप्त : ५ निविदा अप्राप्त : २ १

***क वर्ग तीर्थक्षेत्र विकास**

एकूण कामे : ४५ २४ जूनपर्यंत पूर्ण : ६ १७ जुलैपर्यंत पूर्ण : ८ प्रगतीत : १३ १५ निविदा प्राप्त : ११ निविदा अप्राप्त : १२ ८ रद्द/इतर योजनेत मंजूर : ३

***प्राथमिक आरोग्य केंद्रे**

एकूण कामे : २८ २४ जूनपर्यंत पूर्ण : ४ १७ जुलैपर्यंत पूर्ण : ५ प्रगतीत : १९ २० निविदा प्राप्त : ३ निविदा अप्राप्त : २

### सकारात्मक बदलाची अपेक्षा

ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा सक्षम करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने हाती घेतलेल्या या विकासकामांमुळे शिक्षण, आरोग्य आणि सार्वजनिक सुविधांमध्ये सकारात्मक बदलाची अपेक्षा आहे, असे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समितीचे सभापती इंद्रजीत पवार यांनी सांगितले.

### निविदा, स्वतंत्र अंमलबजावणी, सूचना

जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभाग क्र.१ अंतर्गत येणारे काही कामे अद्याप निविदा प्रक्रियेत आहेत. काही कामे इतर योजनांमधून मंजूर झाल्यामुळे त्यांची स्वतंत्र अंमलबजावणी सुरु आहे. रखडलेल्या कामांबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत, असे कार्यकारी अभियंता आसिफ खैरदी यांनी सांगितले.

# डॉ.अशोक लांबतुरे हे माणुसकी, समता, समाजसेवेचा दीपस्तंभ : आ.अशोक माने





## अमृतमहोत्सवाची दिमाखदार सांगता

## समाजभूषण गौरव अंकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जुलै-**

पद, सत्ता किंवा प्रसिध्दीची अपेक्षा न ठेवता डॉ.अशोक लांबतुरे यांनी आयुष्यभर समाजातील गरीब, वंचित आणि उपेक्षितांसाठी काम केले. माणुसकी हाच त्यांचा खरा धर्म असून त्यांनी समाजसेवेचा आदर्श निर्माण केला आहे, असे गौरवोद्गार आ.अशोकराव माने यांनी काढले.

समाजसेवक व दलितमित्र डॉ.अशोक लांबतुरे यांच्या ७५ व्या अमृतमहोत्सवी सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. डॉ. अशोक लांबतुरे अमृतमहोत्सव समितीचे अध्यक्ष तथा अश्विनी सहकारी रुग्णालयाचे चेअरमन बिपीनभाई पटेल हे अध्यक्षस्थानी होते.

दलितमित्र डॉ.अशोक लांबतुरे यांच्या अमृतमहोत्सवाची दिमाखदारपणे सांगता करण्यात आली. यावेळी गुणवंत, समाजसेवक व ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करण्यात आला. डॉ.अशोक लांबतुरे यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेणाऱ्या 'समाजभूषण गौरव अंकाचे' प्रकाशन करण्यात आले.

विचारमंचावर माजी आमदार धनाजी साठे, सिध्देश्वर बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभीरे, सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष दिलीप पतंगे, नगरसेविका संगीता जाधव, श्रीदेवी फुलारे, नगरसेवक चंद्रकांत कांबळे, शिवसेना उबाठाचे नेते तानाजी सातपुते, अश्विनी रुग्णालयाचे व्हाईस चेअरमन विजय पाटील, संचालक विलास पाटील, स्वामी, उद्योग वर्धिनीच्या चंद्रिका चव्हाण, डॉ.अशोक लांबतुरे यांच्या पत्नी तथा अमृतमहोत्सव सन्मान सोहळा समितीच्या निमंत्रक सुरेखा लांबतुरे, उपाध्यक्ष शंकर जाधव, सचिव डॉ.श्रीकांत येळेगांवकर, खजिनदार मधुकर गवळी, विद्या लांबतुरे, डॉ.स्वप्नील लांबतुरे, डॉ.पद्मिनी लांबतुरे, श्रेयस लांबतुरे उपस्थित होते.

संघटन बांधणी, शिक्षण, आरोग्य, गटई कामगारांचे प्रश्न, सामाजिक न्याय आदीसंदर्भात डॉ.अशोक लांबतुरे यांनी सातत्याने काम केले. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचे कार्य त्यांनी अखंडितपणे सुरु ठेवले आहे. लांबतुरे दाम्पत्याने समाजसेवेचा वसा जपत अनेक गरजूंच्या जीवनात परिवर्तन घडविले. डॉ.लांबतुरे शतायुषी होऊन समाजसेवा सुरु ठेवावी, असेही आ.अशोकराव माने यांनी सांगितले.

यावेळी डॉ.अशोक लांबतुरे, सुरेखा लांबतुरे आणि कुटुंबियांचे पुष्पवृष्टी आणि आतिषबाजी करुन दिमाखदार स्वागत करण्यात आले. प्रारंभी संत रोहिदास महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संत रोहिदास महाराज यांची पंजाबची सामूहिक प्रार्थना घेण्यात आली. सत्कार समितीचे सचिव श्रीकांत येळेगावकर यांनी प्रास्ताविक केले. पल्लवी माने यांनी सूत्रसंचालन केले.

याप्रसंगी डॉ.सिद्राम सलवदे, भाऊसाहेब सोनवणे, अंबण्णा काळे, विजयेंद्र शिखरे, सुरेश पाटोळे, उज्ज्वलकुमार माने, किरण ननवरे, विक्रम खेलबुडे, दशरथ वडतीले, अविनाश चाबुकस्वार, राहुल वंजारे, संजय हेमगड्डी, ॲड. सोमनाथ कांबळे, नरेंद्र गंभीरे, अविनाश मार्तंडे, दत्ता मोकाशी, श्रीकांत बोरगावकर, सचिन चौधरी, सचिन कांबळे, अरुण शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, हितचिंतक आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बिकट परिस्थितीत स्वतःचे अस्तित्व निर्माण केले

माजी आमदार धनाजी साठे याप्रसंगी बोलताना म्हणाले, मी माढ्याचा असून असा जावई मिळणे भाग्य लागते. बिकट, वाईट परिस्थितीतून डॉ. अशोक लांबतुरे यांनी स्वतःचे अस्तित्व निर्माण केले. सोलापूर शासकीय रुग्णालयात असताना त्यांनी अनेकांना मदत केली.

### सत्कार सोहळ्यातही समाजसेवेची झालर

डॉ.अशोक लांबतुरे यांच्या अमृत महोत्सवी सन्मान सोहळ्यात विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करुन एकप्रकारे समाजसेवेची झालर लावली गेली. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत देशात आठवा क्रमांक मिळिवणारे मयूरेश वाघमारे यांच्यासह विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती, संस्था, गुणवंत विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला.

### सार्वजनिक जीवनातून निवृत्त होणार नाही

७५ वर्षात सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य क्षेत्रात कार्यरत राहिलो. सर्व घटकातील लोकांची खंबीर साथ आणि पाठबळ मिळाले. सार्वजनिक जीवनातून निवृत्त होणार नाही. यापुढेही सदैव समाजसेवेसाठी कार्यरत राहील, अशी ग्वाही सत्कारमूर्ती डॉ.अशोक लांबतुरे यांनी दिली.

# 'जंतर-मंतर'बरोबर सोलापुरातही आंदोलन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जुलै-**

नीट परिक्षेच्या पेपर फुटीसंदर्भात दिल्लीस्थित जंतर-मंतर येथे प्रसिध्द शास्त्रज्ञ तथा मॅगसेसे पुरस्कार विजेते सोनम वांगचुक यांनी सुरु केलेल्या अन्नत्याग आंदोलनाच्या समर्थनार्थ शिवसेना उबाठा आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीप्रणित भारताचा लोकशाहीवादी युवा महासंघ यांच्या वतीने सोलापुरात स्वतंत्रपणे आंदोलन करण्यात आले.

शिवसेना उबाठाच्या वतीने जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथील पुनम गेट येथे जिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, महानगरप्रमुख महेश धाराशिवकर यांच्या नेतृत्वाखाली तीव्र निदर्शने आंदोलन करण्यात आले. सोनम वांगचुक आगे बढो, हम तुम्हारे साथ है... शिवसेना जिंदाबाद... केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रसाद यांचा धिक्कार असो... आदी घोषणा देण्यात आल्या.

या आंदोलनात संजय पौळ, विष्णू कारमपुरी, दत्तात्रय गणेशकर, सुरेश जगताप, संताजी भोळे, अमित भोसले, आसिफ मुल्ला, विशाल सोरेगावकर, बबलू पंडित, विजय जव्हेरी, दत्ता कलाटे, श्रीनिवास बोगा, विठ्ठल कुऱ्हाडकर, गुरुनाथ कोळी, जरगीस मुल्ला, अंबादास चव्हाण, प्रसाद जगताप, आबा सावंत, दीपक दळवी, अजय मळगे, ऋषी दोरकर, रवी नाईक, समर्थ गायकवाड, वजीर शेख, अरुण लोंढे, राजू घाटे, आप्पासाहेब गुंड यांनी सहभाग नोंदविला होता.भारताचा लोकशाहीवादी युवा महासंघाच्या सोलापूर जिल्हा समितीच्या वतीने जिल्हाध्यक्ष विक्रम कलबुर्गी, राज्य सचिव दत्ता चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पुनम गेट येथे एकदिवसीस अन्नत्याग उपोषण करण्यात आले.ॲड.अनिल वासम याप्रसंगी बोलताना म्हणाले, सोनम वांगचुक यांच्या न्याय्य आंदोलनाची केंद्र सरकारने तात्काळ दखल घ्यावी. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारुन आपल्या पदाचा राजीनामा द्यावा.

यावेळी विजय हरसुरे, नरेश गुल्लापल्ली, अमित मंचले, योगेश आकिम, दिनेश बडगु, आप्पाशा चांगले, राहुल बुगले, सनी आमाटी, कुमार येलगेटी, राधागोपाल बंडी, शशिकांत गुंडला, अजय भंडारी, अबू हुरेरा आदींची उपस्थिती होती.

# रामरक्षा, हरिपाठाच्या संस्कारातून घडतेय नवी पिढी

## हर्षवर्धन राजे, स्वामिनी राजे भोसले यांचा आदर्श



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१७ जुलै-**

श्रीस्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या कुटुंबातील धार्मिक व संस्कारमय परंपरेचे दर्शन घडविणारा प्रेरणादायी क्षण नुकताच पाहायला मिळाला.

कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांचे चिरंजीव हर्षवर्धन राजे अमोलराजे भोसले व चिरंजीवी स्वामिनी राजे अमोलराजे भोसले यांनी भावपूर्ण वातावरणात रामरक्षा स्तोत्र व हरिपाठाचे पठण करुन आध्यात्मिक संस्कारांची जपणूक केली.

लहान वयातच भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि संतपरंपरेचे संस्कार अंगीकारत रामरक्षा व हरिपाठाचे नियमित पठण करणाऱ्या या बालकांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. आजच्या आधुनिक युगात मुलांमध्ये धार्मिक, नैतिक व सांस्कृतिक मूल्ये रुजवण्याचा हा आदर्श प्रयत्न असल्याचे भावना उपस्थितांनी व्यक्त केली. घरातील ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली हर्षवर्धन राजे व स्वामिनी राजे यांच्यावर होत असलेले संस्कार ही भावी पिढीसाठी प्रेरणादायी बाब असून, अशा उपक्रमांमुळे भारतीय संस्कृतीची परंपरा अधिक दृढ होत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.







# मा.श्री.महेशदादा बिराजदार : समाजसेवेतून राजकारणापर्यंतचा प्रवास

सोलापूरच्या राजकीय पटलावर एक नाव गेल्या काही वर्षात अत्यंत आदराने घेतलं जातं, ते म्हणजे मा.श्री. महेश दादा बिराजदार. महेशदादांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात समाजकार्यातून केली. टंचाईग्रस्त भागात बोअर मारून पाणी सोय करणे, मंदिर बांधकाम मदत, जयंती, गरजू, पिडीत आणि आपदग्रस्त यांना देणगी व मदत करत दानशूर म्हणून त्यांनी सर्वत्र नावलौकिक मिळवला. जात-धर्माच्या पलीकडे जाऊन गरजूच्या पाठीशी उभे राहण्याची त्यांची वृत्ती आजही तशीच आहे.



लोकप्रिय आमदार मा.श्री.सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या विश्वासातील व्यक्ती म्हणून महेशदादांवर पक्षातील अनेक जबाबदाऱ्या सोपवल्या जातात. आणि दादा त्या पूर्ण निष्ठेने आणि वेळ देऊन पार पाडतात. सोलापूर भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष या नात्याने त्यांनी युवा शक्तीला संघटित करून पक्ष बळकट करण्याचे काम केले.

मा.श्री.महेशदादांची सर्वात मोठी ओळख म्हणजे त्यांची प्रामाणिकपणा. पक्षात प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्याला ते नेहमीच पाठबळ देतात. गुणवत्तेलाही ते सतत प्राधान्य देतात. एकवेळ आपले नुकसान झाले तरी चालेल. पण, निष्ठावंतावर अन्याय होता कामा नये; ही त्यांची भूमिका सर्वांनाच प्रेरणा देते.

जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर असणारे मा.श्री.महेशदादा बिराजदार यांनी मा.श्री.आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली विविध समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून समाजसेवेत अग्रेसर असतात. आपल्या साध्या स्वभावाने आणि कामाने त्यांनी जनसामान्यांच्या मनात खास स्थान निर्माण केले आहे.

मा.श्री.महेशदादा बिराजदार यांचा आज वाढदिवस. यानिमित्त आपण सर्वजण महेशदादांना निरोगी दीर्घायुष्य आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देऊयात.

तरुण तडफदार युवा नेतृत्व मा.श्री.महेशदादा बिराजदार यांना हार्दिक शुभेच्छा!

**शुभेच्छुक :**
**बलवान ल. गोतसुर्वे,**
**गटनेता व सदस्य,**
**पंचायत समिती दक्षिण सोलापूर**




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK
सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा



## महत्वाचे...

### ब्लाऊज पीस खरेदी करण्यासाठी आलेल्या महिलेवर कात्रीने हल्ला

**सोलापूर, दि.१७ जुलै-**
ब्लाऊज पीस खरेदी करण्यासाठी एका कापड दुकानात आलेल्या एका महिलेस कात्रीने वार करुन जखमी करण्यात आल्याची घटना नीलम नगर परिसरातील कुमारस्वामी नगर येथे घडली. याप्रकरणी संबंधित दुकानमालकाचा मुलगा संदीप संतोष गोने (रा.कुमारस्वामी नगर, नीलम श्रमजिवी नगर, सोलापूर) याच्याविरोधात एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत तेजस्विनी रणजित कोंतम (रा.कुमारस्वामी नगर, सोलापूर) यांनी फिर्याद दिली. यातील फिर्यादी व त्यांची मुलगी दि.१५ जुलै रोजी सकाळी १०.१५ वाजता ब्लाऊज पीस खरेदी करण्यासाठी सदर दुकानी गेले होते. ब्लाऊज पीस घेतल्यावर त्याचे पैसे देत असताना दुकानमालकाच्या मुलाने फिर्यादीस कात्रीने उजव्या हाताला व पाठीवर मारुन जखमी केले, असे फिर्यादीत म्हटले आहे.

---

### शेतीच्या वादातून जीवे मारण्याची धमकी, भावकीतील तिघांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.१७ जुलै-**
शेतीच्या वादातून घरी बोलावून मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी भावकीतील तिघा जणांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. बाबुराव मामुरे, शिलाबाई मामुरे, विश्वनाथ मामुरे (सर्वजण रा.कुमठे, सोलापूर) अशी त्यांची नावे आहेत. याबाबत श्रीधर सिद्रामप्पा मामुरे (रा.कुमठे गाव, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि.६ जुलै २०२६ रोजी दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास वरील आरोपींनी घरी बोलावून घेत शेतीच्या वादातून शिवीगाळ व मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली.

---

### शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतविण्यासंदर्भात विवाहितेचा छळ, पाच जणांविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि.१७ जुलै-**
शेअर मार्केटमध्ये गुंतविण्यासाठी ३ लाख रूपये दे असे म्हणत एका विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी सासरच्या पाच जणांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पती सौरभसिंग हबीरराव, सासू कान्होपात्रा हबीरराव, नणंद स्वाती, नीलम व रेखा कोळी अशी त्यांची नावे आहेत. याबाबत सुषमा सौरभसिंग हबीरराव (रा.गुरुदेवदत्त नगर भाग ५, जुळे सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, सौरभसिंग हबीरराव यांच्याशी दि.२५ नोव्हेंबर २०२४ रोजी माझा विवाह झाला आहे. त्यावेळेपासून ते आजतागायत सासरी मानसिक, शारिरिक दिला. पतीला शेअर मार्केटमध्ये गुंतविण्यासाठी ३ लाख रुपये दे असे म्हणत छळ करण्यात आला.

---

### महिला अत्याचाराचे गुन्हे दाखल असलेला स्वप्निल लिंबोळे यास तडीपार

**सोलापूर, दि.१७ जुलै-**
महिला अत्याचाराचे विविध गुन्हे दाखल असलेल्या स्वप्निल आनंद लिंबोळे (वय-१९, रा.वडार गल्ली, बुधवार पेठ, सोलापूर) यास सोलापूर शहर-जिल्ह्यातून एक वर्षासाठी तडीपार करण्यात आले. सन २०२३ आणि २०२५ या कालावधीत त्याच्या विरोधात महिला अत्याचारविषयक अनेक गुन्हे दाखल आहेत. त्याच्या सततच्या गुन्हेगारी वृत्तीमुळे फौजदार चावडी पोलिस ठाण्याने महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये तडीपारीचा प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार पोलिस उपायुक्त प्रितम यावलकर यांनी दि.१६ जुलै रोजी तडीपार करण्याबाबतचा आदेश काढला आहे.

# 'गण गण गणात बोते'च्या गजरात श्री संत गजानन महाराज पालखी दाखल

- सोलापूर जिल्हा प्रशासनाकडून उत्साहात स्वागत
- 'विठ्ठल माझा, मी विठ्ठलाचा'चा जयघोष; शिस्तीचे दर्शन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**
श्रीक्षेत्र पंढरपूर येथील 'आषाढी वारी'च्या अनुषंगाने श्रीक्षेत्र शेगाव येथून निघालेल्या श्री संत गजानन महाराज पालखी सोहळा शुक्रवार, दि.१७ जुलै २०२६ रोजी 'गण गण गणात बोते'च्या गजरात सोलापूर जिल्ह्यात दाखल झाले. सोलापूर जिल्हा प्रशासनाकडून उत्साहात स्वागत करण्यात आले.

'आषाढी वारी'साठी राज्यभरातून मानाच्या दहा पालख्यांसह शेकडो दिंड्या पंढरपुरात येत असतात. श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक पंढरपूरकडे मार्गस्थ होत असताना, श्री संत गजानन महाराज यांच्या पालखीने आज धाराशिव जिल्हा हद्दीतून तामलवाडीच्या पुढे उळे कासेगाव सोलापूर जिल्ह्यात प्रवेश केला.




श्री संत गजानन महाराजांची पालखी विदर्भातून निघून सोलापूर जिल्ह्यात दाखल झाल्यानंतर वारकऱ्यांच्या उत्साहाला उधाण आले होते. टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि भजन-कीर्तन करत पालखी मार्गस्थ होत होते. 'विठ्ठल माझा, मी विठ्ठलाचा'चा जयघोष करत निघालेल्या या पालखी सोहळ्याद्वारे शिस्तीचे दर्शन घडविण्यात आले.

जिल्हा प्रशासनाने पालखी मार्गावर भाविकांसाठी पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा, स्वच्छतागृहे आणि सुरक्षिततेची चोख व्यवस्था केली आहे. पालखी सोहळा निर्विघ्न पार पडावा यासाठी पोलीस बंदोबस्त, आरोग्य पथके आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा २४ तास सज्ज ठेवण्यात आली आहे, अशी माहिती प्रशासनाने दिली.

यावेळी जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, उपविभागीय अधिकारीद्वय सदाशिव पडदुणे, सुमित शिंदे, अप्पर पोलिस अधीक्षक विजय कबाडे, तहसीलदार किरण जमदाडे, पोलिस निरीक्षक कुंदन गावडे, गटविकास अधिकारी मनोज राऊत, सहाय्यक गटविकास अधिकारी सनी चव्हाण, दक्षिण सोलापूर तालुका आरोग्याधिकारी डॉ.नीलम घोगरे, दक्षिण सोलापूर पंचायत समितीचे सभापती संदीप ढवळे, उपसभापती वर्षा पटणे आदी उपस्थित होते.

# शेगावीच्या राणाचे उळेगावात जंगी स्वागत

## पालखीवर फुलांचा वर्षाव, रांगोळीच्या घातल्या पायघड्या



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**
टाळ मृदंगाचा गजर. जय जय विठोबा रखुमाई सुंदर ते ध्यान उभे विटेवर असा भजनाचा जयघोष सुरू होता. महाराजांच्या पाखलीचे दर्शन घेण्यासाठी अबालवृध्द तुळजापूर-सोलापूर रस्त्यांच्या दुर्तफा लोटले होते. माऊली माऊली म्हणत प्रत्येकजण पालखीचे दर्शन घेत होता. शुक्रवारी सायंकाळी चारच्या सुमाराला पालखी सोहळा मराठवाड्याच्या सरहद्दीवर असलेल्या तामलवाडी येथून सोलापूर जिल्हयातील गंगेवाडी फाटयाजवळ आला. सायकांळी सहाच्या सुमाराला उळेगावात शेगावीचा राणा गजानन महाराज यांचा सोहळा विसावला. फुलांचा वर्षाव, टाळ, मृदंग जय हरी नावाचा जयघोषद्वारे हा पालखी सोहळा मनाला आनंद व मांगल्य देऊन गेला.

पालखी मार्गापासून रांगोळीच्या पायघड्या घातल्या होत्या. वारकऱ्यांसाठी उभारण्यात आलेल्या वॉटरप्रूफ तंबूत वारकरी विसावले. स्वयंपाकासाठी अनेकजण झटत होते. भाविकांसाठी तयार होत असलेल्या प्रसादाचा सुंगध, फुलांचा गंध आणि भक्तीचा मेळा जणू विठ्ठल नामात एकरूप झाला होते. हा सोहळा उळेगाव येथे आल्यानंतर ग्रामपंचायत पदाधिकारी आणि गावकऱ्यांनी पालखीचे जंगी स्वागत केले. त्यांनी महाप्रसादाची व्यवस्था केली होती. ग्रामपंचायतच्या वतीने भाविकांना सर्व सोयी सुविधा देण्यात आल्या. पहाटे साडेपाचला पालखी उळेगावातून प्रस्थान ठेवेल.


सकाळी साडेसात ते नऊ या दरम्यान तळे हिप्परगा येथील मश्रुम गणपती मंदिरासमोर पालखी आल्यानंतर गजानन महाराजांची आरती होणार आहे. दुपारी साडेअकराला पालखी सम्राट चौकातील सद्गुरु प्रभाकर महाराज मंदिरात आल्यानंतर संतभेटीचा सोहळा होणार आहे. सायंकाळी सहाला पालखी सोहळा कुचन प्रशाला येथे मुक्कामी राहणार आहे. या सोहळ्यात ७०० वारकरी, त्यापैकी ४०० टाळकरी, दोन अश्व, नऊ वाहने आहेत. पालखी सोहळ्याचा प्रवास नऊ जिल्हयातून, २२ दिवसाचा व ७५० किलोमीटरचा असल्याचे सांगण्यात आले.

### महाप्रसादाची सकाळपासून जय्यत तयारी

चपाती, आमटी, भाजी, शिरा, भात, कडक भाकरी असा महाप्रसाद होता. शंभरहून अधिकजण सकाळपासून भाजी चिरणे, धान्य निवडणे अशी तयारी करीत होते. पाचशेहून अधिक स्वयंसवेक व संपूर्ण गावच तयारीसाठी सज्ज होता. स्वच्छतागृह, सीसीटीव्ही कॅमेरे, गरम पाण्याची सोय, पायाचे मसाज करण्यासाठी मशीनची सोय होती. यंदाच्या वर्षी भाविकांच्या सोयीसाठी सुविधा वाढविण्यात आल्याचे जिल्हा परिषद सदस्य नेताजी खंडागळे यांनी सांगितले.

### डॉ. हेडगेवार रक्तपेढीतर्फे रविवारी रक्तदाता कृतज्ञता सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जुलै-**



येथील डॉ.हेडगेवार रक्तपेढी संस्थेच्या ३६ वा वर्धापन दिननिमित्त रविवार, दि.१९ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता शिवस्मारक सभागृह येथे रक्तदाता कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती रक्तपेढीचे अध्यक्ष विष्णुदास मालु यांनी दिली.

या कार्यक्रमास वामसी लॅबचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक केशव रेड्डी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. रा.स्व. संघाच्या कुटुंब प्रबोधन गतिविधीचे प्रांत सहसंयोजक संजय कुलकर्णी यांचे व्याख्यान होणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

रक्तदान हे श्रेष्ठदान असून अधिकाधिक जणांनी रक्तदान म ोहिमेत सहभागी व्हावेत. रविवारी आयोजित केलेल्या कार्यक्रमास विविध संस्था-संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते, देणगीदार, स्वेच्छा रक्तदाते यांच्यासह सोलापूरकरांनी उपस्थित रहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

## पालखी निघाली पावसात...



श्रीक्षेत्र शेगाव येथून निघालेल्या श्री संत गजानन महाराज पालखी सोहळ्याचे शुक्रवार, दि.१७ जुलै रोजी सोलापूर जिल्ह्यात आगमन झाले. सोलापुरात शुक्रवारी पुष्य नक्षत्राच्या पावसाने जोरदार हजेरी लावली. भर पावसातही पालखी सोहळा मार्गस्थ होताना घेतलेले छायाचित्र.

### 'नीट'मध्ये 'वालचंद'चे २३ विद्यार्थी यशस्वी

**श्रीलेखा गुंटुक प्रथम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जुलै-**
नीट अर्थात राष्ट्रीय वैद्यकीय सामायिक प्रवेश चाचणी परीक्षेत वालचंद महाविद्यालयाचे एकूण २३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. श्रीलेखा नागेश गुंटुक या विद्यार्थिनीने ४१४ गुण मिळवत महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. प्राचार्य डॉ.संतोष कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ.जीवराज कस्तुरे, समन्वयिका सारिका महिंद्रकर आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये येलगुंडे ज्ञानेश्वरी, इंगळे राजश्री, बाणेकरी मुईझ, कांबळे रोहन, सावंत श्रध्दा, रणदिवे कृष्णा, मुजावर सबरीन, साळुंखे प्राजक्ता, यंगलदास अक्षरा, पुंजाल समीक्षा, जगताप आकांक्षा, पामुल प्रज्ञा, माने स्वाती, वाघमोडे तन्वी, बत्तुल श्रध्दा, क्यामा सुकृती, अदोने स्वर्दा, विटकर ललिता, मैले मानसी, चंदनशिवे प्रीतम, कनकुंटला मनीषा, गायकवाड श्रावणी यांचा समावेश आहे.

# भाजप नगरसेवकांमधील धुसफूस चव्हाट्यावर

- आयसीआयसीआय बँकेतील ठेवींसह; निवडणूक खर्चाच्या बिलांवर आक्षेप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जुलै-**
महापालिकेच्या निधीच्या ठेवींच्या निर्णयावरुन भाजपमधील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा उफाळून आले आहेत. बंधन बँकेत ठेवी ठेवण्याच्या निर्णयावरुन झालेला वाद अद्याप शांत झालेला नसतानाच आयसीआयसीआय बँकेत ठेवलेल्या ठेवींनाही भाजपमधील काही नगरसेवक व नगरसेविकांनी आक्षेप घेतला. आयसीआयसीआयऐवजी स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये ठेवी ठेवाव्यात, अशी मागणी आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली.

बंधन बँक ही नवखी व तुलनेने छोटी बँक असल्याने तेथे ठेवी ठेवू नयेत, अशी भूमिका घेतल्यानंतर आयसीआयसीआय बँकेत ठेवी ठेवण्याचा निर्णय झाला होता. त्यानुसार तरतूदही करण्यात आली. मात्र शुक्रवारी या निर्णयालाच भाजपमधील काही नगरसेवकांनी विरोध दर्शवत स्टेट बँक ऑफ इंडिया ही अधिकृत व मोठी बँक असल्याने तेथेच ठेवी ठेवाव्यात. महापालिका निवडणुकीदरम्यान सुमारे सहा कोटी रुपयांची बिले सादर करण्यात आली. प्रत्यक्ष खर्च आणि बिलातील रक्कम यामध्ये तफावत आहे, असेही या निवेदनात म्हटले आहे.

आयसीआयसीआय बँकेच्या सीएसआर निधीतून महापालिकेला दोन घंटागाड्या देण्यात आल्या. यापूर्वी आयसीआयसीआय बँकेकडे सीएसआर निधी नव्हता. मग याच कालावधीत घंटागाड्या महापालिकेला का देण्यात आल्या? असा रोकडा सवालही संबंधित नगरसेवकांनी उपस्थित केला. दरम्यान, महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे म्हणाले, संबंधित नगरसेवकांनी निदर्शनास आणून दिलेली बाब योग्य आहे. खर्च केलेली रक्कम आणि बिलामध्ये दिलेले आकडे यांची तपासणी करावी लागेल.

# 'पुष्य' नक्षत्राची दमदार बॅटिंग; बळीराजाच्या आशा पल्लवित

- पाणीसाठ्यासाठी मोठ्या पावसाची गरज
- जुलैमध्ये सरासरी २५ मिमी पावसाची नोंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**
रोहिण्या, मृग आणि आर्द्रा नक्षत्रात एकही दमदार पाऊस पडला नसल्याने जिल्ह्यात अवघ्या २९ टक्केच पेरण्या झाल्या होत्या. मात्र पुष्य नक्षत्र निघताच अवघ्या दोन दिवसात वातावरण पूर्णत: बदलले असून, दोन दिवस पावसाने दम दार बॅटिंग केल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. दरम्यान, जुलैच्या १७ दिवसात अवघा सरासरी २५ मिमीच पाऊस पडल्याने अजूनही साठवण तलाव, नदी-नाले, विहिरी कोरड्याठाक असल्याने मोठ्या पावसाची गरज आहे.

मृग नक्षत्र निघाल्यापासून जिल्ह्यात अत्यंत कमी प्रमाणात पाऊस पडल्याने पेरण्याही लांबल्या आहेत. आता पुष्य नक्षत्राचा पाऊस पडू लागल्याने या जिल्ह्यातील उर्वरित पेरण्या होण्याची शक्यता आहे. पुष्य नक्षत्राचा पाऊस उत्तर, दक्षिण सोलापूर तालुक्याच्या काही भागात आणि बार्शी-करमाळा पट्ट्यात चांगला पडल्याने या भागातील शेतकरी पेरणीची घाई करण्याची शक्यता आहे. दरम्यान, वातावरणात गारवा निर्माण झाल्याने पेरणी झालेल्या पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे.

# लोकहिताच्या मुद्द्यांना प्राधान्य; जि.प.अर्थ व बांधकाम समितीच्या बैठकीत निर्णय

- शासन निर्णय, निधीचा आढावा
- विकासकामांच्या अंमलबजावणीवर चर्चा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जुलै-**
जिल्हा परिषद सोलापूरच्या अर्थ व बांधकाम समितीची महत्त्वपूर्ण संयुक्त बैठक शुक्रवार, दि.१७ जुलै २०२६ रोजी पार पडली. या बैठकीत जिल्हा परिषदेच्या विविध विकासकामांचा आढावा, शासनाच्या नव्या निर्णयांची अंमलबजावणी आणि निधीच्या प्रभावी वापरासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. जि.प.चे उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समितीचे सभापती इंद्रजीत पवार हे अध्यक्षस्थानी होते.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य पृथ्वीराज सावंत, लखन शिंदे, चरण चवरे, केरप्पा पांढरे तसेच जिल्हा परिषद सदस्या पुनम इंगवले आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. दरम्यान, नेताजी खंडागळे आणि अतुल पवार यांनी ऑनलाइन माध्यम ातून सहभाग नोंदविला

बैठकीच्या प्रारंभी दि. २४ जून २०२६ रोजी झालेल्या मागील सभेच्या कार्यवृत्ताचे वाचन करून ते कायम करण्यात आले. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने अलीकडेच जारी केलेल्या विविध शासन निर्णयांचा जिल्हा परिषदेच्या कामकाजावर होणारा परिणाम, तसेच त्यांची प्रभावी अंम लबजावणी कशी करावी याबाबत चर्चा झाली.

जून महिन्यातील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या हस्तांतरण, अभिकरण आणि सेस योजनांअंतर्गत झालेल्या जमा-खर्चाचा तपशील समि तीसमोर सादर करण्यात आला. निधीचा पारदर्शक, नियोजनबध्द आणि उद्देशपूर्ण वापर सुनिश्चित करण्यावर सदस्यांनी भर देत संबंधित खर्चास मंजुरी दिली. ग्रामीण भागातील प्रलंबित विकासकामे, निधीचे नियोजन, विविध योजनांची अंमलबजावणी, प्रशासनातील समन्वय अधिक प्रभावी करण्याबाबत सूचना मांडण्यात आल्या.

### विकासकामांना गती देण्यावर भर

लोकहिताला केंद्रस्थानी ठेवून विकासकामांना गती देणे, उपलब्ध निधीचा जबाबदारीने व पारदर्शक पद्धतीने वापर करणे आणि जिल्हा परिषदेच्या विविध योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत वेळेत पोहोचविणे, या उद्देशाने बैठकीत सकारात्मक व विधायक चर्चा झाल्याचे यावेळी उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समितीचे सभापती इंद्रजीत पवार यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# वारकरी सेवेसाठी धर्मादाय संस्थांनी पुढे यावे

## सोलापूर विभागाचे धर्मादाय उपायुक्त ईश्वर सूर्यवंशी यांचे आवाहन; महाप्रसाद, पाणी, वैद्यकीय शिबिरे, निवारा उभारावे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

आषाढी वारीतील वारकऱ्यांच्या सेवेसाठी धर्मादाय सामाजिक संस्था, सार्वजनिक न्यास, देवस्थाने आणि धर्मादाय रुग्णालयांनी सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून पुढे यावे, असे आवाहन सोलापूर विभागाचे धर्मादाय उप आयुक्त ईश्वर सूर्यवंशी यांनी केले आहे.

सूर्यवंशी यांनी सेवाभावी संस्था, ट्रस्ट आणि स्वयंसेवी संघटनांनी पालखी मार्गासह पंढरपूर परिसरात वारकऱ्यांसाठी महाप्रसाद, पिण्याचे पाणी, निवारा, विश्रांतीची व्यवस्था आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे सांगितले आहे.

ज्या सार्वजनिक न्यासांकडे इमारती किंवा मोकळ्या जागा उपलब्ध आहेत, त्यांनी त्या वारकऱ्यांच्या निवारा व विश्रांतीसाठी खुल्या कराव्यात. विशेषतः पंढरपूरमधील सार्वजनिक न्यासांनी या सेवाकार्यात उत्स्फूर्त सहभाग घ्यावा. तसेच दिंडी मुक्कामांच्या काळात प्रशासनाला सहकार्य करावे, असेही स्पष्ट केले.



धर्मादाय रुग्णालयांनी पालखी मार्ग, दिंडी मुक्कामस्थळे आणि पंढरपूर परिसरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकासह मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिरे आयोजित करावीत. वारकऱ्यांना आरोग्याच्या समस्या उद्भवल्यावर वेळेवर उपचार मिळाल्यास त्यांना मोठा दिलासा मिळू शकतो, असे सूर्यवंशी यांनी सांगितले. वारकऱ्यांच्या सेवेतून समाजाप्रती असलेली जबाबदारी पार पाडण्याची ही सुवर्णसंधी असून, सर्व धर्मादाय संस्था, देवस्थाने आणि रुग्णालयांनी मोठ्या प्रमाणावर सेवा उपक्रम राबवावेत, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

**धर्मादाय संस्थांकडून उपक्रमांची अपेक्षा**

* आषाढी वारी सामाजिक उत्तरदायित्व पार पाडणे
* महाप्रसाद, पाणी, निवाऱ्याची व्यवस्था करणे
* ट्रस्टच्या इमारती वारकऱ्यांसाठी खुल्या ठेवा
* मोफत वैद्यकीय शिबिरांचे आयोजन
* सामाजिक बांधिलकी जपणे
* वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य सेवांची उभारणी
* पंढरपूरात निवारा व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था
* धर्मादाय रुग्णालयांकडून मोफत औषधोपचार शिबिरांचे आयोजन

## ज्ञानामृत आनंदलहरी १५०५

**जेव्हां आपणया आली निद । करी आपणपें जेवी मुग्ध ।**
**कां काजळी आणी मंद । प्रभा दीपीं ।।**

माऊलींच्या या ओवीत संसाररुपी वृक्षाचे वर्णन भगवंत करीत आहेत. या वृक्षाला वरच्या बाजूला मूळ असते, त्याचबरोबर खालच्या बाजुलाही मुळ असते. वरच्या बाजुला मुळ असले तरीही हा वृक्ष सुकत नाही. हा वृक्ष अमर्याद वाढत जातो. जे सर्वोत्तम ब्रम्ह आहे, ते या संसार वृक्षाच्या वर आहे. खरे म्हणजे ब्रम्हाला वर, खाली, मध्य असा प्रकारच नाही. मुळातच अमर्याद व सर्व व्यापक असल्याने ब्रम्हाला अलिकडचा, पलीकडचा किंवा पुढचा, मागचा असे म्हणता येत नाही. अशी ही ब्रम्हवस्तू या वृक्षाचे उर्ध्व म्हणजे उत्कृष्ट अधिष्ठाण आहे. या संसारवृक्षामध्ये मायेचा सहभाग अमर्याद आहे. ब्रम्हज्ञानाने बाधित होते म्हणून माया ही सतब नाही, आणि जगत कार्य निर्माण करते व त्या रुपाने भासते म्हणून ही असतब नाही. ही ब्रम्हविचाराचे नांव सहन करीत नाही, विचारापुढे टिकत नाही, म्हणून हीला अनादी असे म्हणतात. ही माया संसारवृक्षाचे बीज आहे. प्रपंचरुपी वृक्षाची ही जमीन आहे. विपरीत ज्ञानास प्रकाशमान करण्याचे कार्य या मायेकडूनच होत असते.



पंचमहाभूतांची ही भरलेली पेटीच आहे. माया ही अज्ञान स्वरुपाचे ठिकाण असून प्रत्यक्षात ती नसल्यासारखीच आहे. पारमार्थिक सत्येने पाहिल्यास माया ही नाहीच, तरी पण ही परब्रम्हस्वरुपाच्या तेजानेच प्रगट होत असते. या मायेबद्दल बोलांना भगवंत म्हणाले, जेव्हां आपणया आली निद । करी आपणपें जेवीं मुग्ध । कां काजळी आणी मंद । प्रभा दीपीं ।। अर्थात, ज्यावेळी आपणाला झोप येते त्यावेळी ती आपल्याल्याच जशी ज्ञानशुन्य करते किंवा दिव्यावर आलेली काजळी जशी दिव्याचेच तेजप्रकाश मंद करते, त्या प्रमाणे ही माया माणसाच्या बुध्दीवर आपला पडदा टाकीत असते. स्वप्नामध्ये आपल्या प्रिय पती जवळ झोपलेली पत्नी, आपल्या पतीला चटकन जागे करुन आलिंगन दिल्या खेरीज, त्या पतीला आभासिक किंवा काल्पनीक आलिंगनानेच कामासक्त बनविते. प्रत्यक्षात हे सर्व स्वप्न असते. अगदी या प्रमाणे परब्रम्हस्वरुपाच्या ठिकाणी माया प्रवेश करते, आणि त्या स्वरुपाचेच आच्छादन करते. अशी ही माया या संसारवृक्षाचे प्रथम मूळ असल्याचे भगवंत अर्जुनाला म्हणाले. या संसारवृक्षाला मायेमुळे अंत:करणवृत्तीचे कोवळे पान फुटते. त्यातून पुढे अहंकार, सत्त्व, रज, तम अशी पाने येतात. सत्व, रज, तम आपआपली कार्ये करु लागतात. आकाश, वायू, तेज, पाणी आणि जमीन ही पंचमहाभुतके फांदयाच्या रुपाने या वृक्षावर पसरु लागतात. या पुढे दहा इंदिये आपआपले स्थान ग्रहन करतात. आपण जो प्रत्यक्ष संसार किंवा संसारातील विकार पाहतो, त्या सर्वाचे वर्णन भगवंतांनी संसारवृक्षाच्या माध्यमातून अर्जुनाला सविस्तरपणे करुन सांगीतले. या सर्व गोष्टीला माया कशी कारणीभुत आहे, ते पण त्यांनी स्पष्ट केले. माया एवढी कठीण बाब असली तरीही आत्मज्ञानी व्यक्ति या मायेला अजिबात बळी पडत नाही. ज्ञानी भक्त आपल्या मध्ये मायेचा शिरकावच होऊ देत नाही. ज्ञानी भक्तावर आपण प्रभाव गाजवू शकत नाही, हे मायेच्या लक्षात आल्यावर ती त्याच्याजवळ जाण्याचा प्रयत्नही करीत नाही. अज्ञान लोक मायेत अडकतात. त्यामुळे त्यांच्याकडून भेद, मोह, स्वार्थ, द्वेष सर्व काही निर्माण होत असतात.या अज्ञानात आपला समावेश होऊ नये, अशी अपेक्षा.जय जय राम कृष्ण हरी.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**



## विशेष मुलांनी सीमेवरील सैनिकांसाठी पाठवल्या राख्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

सैनिकांना भेटण्यासाठी आतुर असलेली विशेष मुले... हातात त्यांनीच बनवलेल्या राख्या अन ओवाळणीचे ताट...सैनिक शाळेत येताच झालेला 'भारतमाता की जय' चा जयघोष अशा उत्साहाने व देशभक्तीने भारलेल्या वातावरणात सीमेवरील सैनिकांना सोलापुरातील विशेष मुलांनी राख्या पाठवल्या. रोटरी रेडक्रॉस स्वगती शाळेच्या प्रांगणात हा कार्यक्रम झाला. याप्रसंगी व्यासपीठावर ९ महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे सीएचएम हरजीत सिंग, युवराज देसवले, राहुल धुमाळ, संगमेश्वर महाविद्यालयाच्या असोसिएट एनसीसी ऑफिसर कॅप्टन शिल्पा लब्बा, असोसिएट एनसीसी ऑफिसर लेफ्टनंट तुकाराम साळुंखे, शाळेच्या अध्यक्षा गीता बालिगा उपस्थित होते. याप्रसंगी स्वगती शाळेच्या विशेष मुलांनी सैनिकांना राख्या बांधून, औक्षण करून राख्या सीमेवरील सैनिकांसाठी त्यांच्याकडे सुपूर्द केल्या. या कार्यक्रमासाठी संगमेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रसाद कुंटे यांचे विशेष सहकार्य लाभले. संचालिका प्रा. तृप्ती बापट यांनी सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका जयश्री गुमास्ते, सचिवा ॲड. दीपाली मादगुंडी, खजिनदार प्रा. विशाखा मराठे, सहसचिव पुरुषोत्तम कारकल, संचालिका संचालिका प्रा. तृप्ती बापट, प्रा. सुनिती बावचकर उपस्थित होते.

## बारावीनंतरच पदवीसोबत यूपीएससी-एमपीएससीची तयारी

### एमआयटी-एडीटीचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी), बँकिंग, कर्मचारी निवड आयोग (एसएससी) तसेच अन्य स्पर्धा परीक्षांसाठी दरवर्षी लाखो विद्यार्थी प्रयत्न करतात. मात्र, पदवी पूर्ण झाल्यानंतर स्वतंत्रपणे स्पर्धा परीक्षांची तयारी करताना वेळ आणि आर्थिक खर्च मोठ्या प्रमाणात वाढतो. ही गरज लक्षात घेऊन एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी (एमआयटी-एडीटी) विद्यापीठाच्या एमआयटी स्कूल ऑफ इंडियन सिव्हिल सर्व्हिसेसने (एसआयसीएस) बारावीनंतरच पदवी शिक्षणासोबत यूपीएससी, एमपीएससी, बँकिंग आणि इतर स्पर्धा परीक्षांची एकात्मिक तयारी करून देणारा बी.ए. (ॲडमिनिस्ट्रेशन) हा अभिनव अभ्यासक्रम सुरू केला आहे, अशी माहिती स्कूलचे संचालक डॉ. सुजित धर्मपात्रे यांनी दिली. ते येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

डॉ. धर्मपात्रे म्हणाले की, स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असलेले विषय पदवी शिक्षणासोबतच शिकता यावेत, यासाठी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली या अभ्यासक्रमाचा आराखडा यूपीएससी, एमपीएससी आणि बँकिंग स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासक्रमाशी सुसंगत ठेवण्यात आला आहे. या अभ्यासक्रमात भारतीय राज्यघटना, सार्वजनिक प्रशासन, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, राज्यव्यवस्था, आंतरराष्ट्रीय संबंध व भू-राजकारण, सुशासन, सार्वजनिक धोरण, सार्वजनिक वित्त, भारतीय व जागतिक अर्थव्यवस्था, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सुरक्षा, परराष्ट्र धोरण, व्यक्तिमत्त्व विकास, उत्तरलेखन आणि मुलाखत कौशल्य यांचा समावेश करण्यात आला आहे.



**सोलापूरच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन**

अधिक माहितीसाठी www.mitsics.edu.in या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा ९६०७५८००५२ या क्रमांकांवर संपर्क साधावा. तसेच, येत्या १८ व १९ जुलै रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत संचालक डॉ. धर्मपात्रे हॉटेल प्रथम, व्हीआयपी रोड, सोलापूर येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी उपलब्ध असणार आहेत.

यूपीएससी, एमपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षांतून कौशल्याधिष्ठित, मूल्याधिष्ठित आणि सामाजिक जाण असलेले अधिकारी प्रशासनात यावेत, तसेच राष्ट्रउभारणीत त्यांचे मोलाचे योगदान असावे, हा आमचा उद्देश आहे. एमआयटी स्कूल ऑफ इंडियन सिव्हिल सर्व्हिसेसच्या माध्यमातून अशाच सक्षम, संवेदनशील आणि कर्तृत्ववान भावी अधिकाऱ्यांची जडणघडण होणार आहे.

**- प्रा. डॉ. मंगेश कराड,** कार्याध्यक्ष तथा प्र.कुलपती, एमआयटी-एडीटी विद्यापीठ, लोणी-काळभोर, पुणे

## बोलावून घेऊन तरुणाला मारहाण; तिघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. १७ जुलै-**

बोलायचे आहे असे म्हणून बोलावून घेऊन तुम्हाला लय मस्ती आली आहे असे म्हणून एका तरुणाला लाथा बुक्क्याने व लोखंडी वस्तूने मारून जखमी केल्याप्रकरणी तिघा जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजेश गाडगी, अविनाश सरवदे आणि रोहन सरवदे (सर्व रा सोलापूर ) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असूनही याबाबत प्रथमेश श्रीकांत गंधमल (रा-१०२/४५ भवानी पेठ सोलापूर ) यांनी फिर्याद दिली आहे. यातील आरोपींनी मागील झालेल्या भांडणाबद्दल बोलायचे आहे असे म्हणून फिर्यादीला दि १५ जुलै रोजी रात्री दहा वा चे सुमारास मोतीवाला फंक्शन हॉल येथे बोलवून घेतले आणि तुला आणि उदय याला खुप मस्ती आली आहे असे म्हणून आरोपींनी मिळून हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण केली. यावेळी आरोपी राजेश गडगी यांनी लोखंडी वस्तुने फिर्यादीचे डावे डोळयाच्या बेदम मारहाण खाली जोरात मारून दुखापत करून जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार गायकवाड हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहे.

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शनिवार,**
**दि. १८ जुलै २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - आषाढ पंचमी**
**ऋतु - ग्रीष्म ।**
**नक्षत्र- पू.फाल्गुनी (१७.५९)**
**योग - वरियान (२०.४४)**
**करण - बव (१६.०६)**
**राहू काल : शनिवार**
**स. १०.३० ते १२.००**

**दिनविशेष :**
**साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मृतिदिन.**
**१८५७: मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली.**
**१९८०: भारताने एस.एल.व्ही.-३ या अवकाशयानाद्वारे 'रोहिणी-१' या उपग्रहाचे अंतराळात यशस्वी प्रक्षेपण केले.**
**१९६८: इंटेल या जगप्रसिद्ध तंत्रज्ञान कंपनीची स्थापना झाली.**



## कठीण परिश्रमा शिवाय उज्जवल यश प्राप्त होत नाही : हसीन अख्तर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जुलै-**

सध्याच्या संगणकीय युगप्त शिक्षणा साठी विद्यार्थ्यांना आपल्या ध्येय व उद्दीष्ठ समोर ठेवुन खूप परिश्रम करावा लागतो ऊणि परिश्रम केल्यास त्यांना यश नक्कीच मिळतो, असे मत महाराष्ट्र राज्य उर्दू अकादमीचे अध्यक्ष हसीन अख्तर यांनी व्यक्त केले ते अखिल भारतीय उर्दू साहित्य परिषद सोलापूर तर्फे आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सभारंभाच्या अध्यक्ष स्थानावरुन बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणुन डॉ इस्माईल शेख हे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून बोलताना डॉ. इस्माईल शेख म्हणाले की, उच्च शिक्षण हाच विद्यार्थ्याचा विकासाचा पाया असला तरी आपला वय व वेळ आयुष्याची दिशा ठरवत असतो म्हणून आपण चांगल्या पुस्तके वाचत वेळेचा सदुपयोग केला पाहिजे.

यावेळी परिषदेचे सदस्य हारून बंदुकवाला सेवानिवृत झाल्याने हसीन अख्तर यांच्या हस्ते विशेष सम्मान करण्यात आला. उर्दू साहित्य परिषदेच्या वतीने शहरातील माध्यमिक शाळा तसेच ज्यु. कॉलेजमधील प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवून उज्वल यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमुख अतिथींच्या हस्ते स्मृति चिन्ह, प्रशस्तीपत्र व बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. प्रास्ताविक प्रा.रियाज वळसंगकर यांनी करुन संस्थेने केलेल्या कार्याची माहिती सादर केली. माजी महापौर तथा संस्थेचे अध्यक्ष ॲड. यु.एन.बेरिया यांचे हस्ते प्रमुख अतिथींचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास शफी कैप्टन, रफीक नल्लामंदू, रफिक खान, जविद उस्ताद, अय्यूब अहमद नल्लामंदू उपस्थित होते. सूत्रसंचालन व पाहुण्यांचा परिचय अशफाक सातखेड यांनी केले तर आभार अय्यूब नल्लामंदू यांनी मानले.

## रघोजी हॉस्पिटल रिक्षा स्टॉपचे उद्घाटन

**सोलापूर, दि. १७ जुलै-**

वाहतूक संघटना संयुक्त महासंघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने रघोजी हॉस्पिटल रिक्षा स्टॉपचे उद्घाटन संपन्न झाले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद, नगरसेवक किल्लेदार, डॉ. रघोजी उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद यांनी शहरातील प्रत्येक रिक्षा स्टॉपची अधिकृत नोंदणी करून रिक्षाचालकांना कायदेशीर व सुरक्षित थांबे उपलब्ध करून देण्याचा निर्धार व्यक्त केला. नगरसेवक किल्लेदार यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी इरफान कल्याणी, मनोहर खांडेकर,उपाध्यक्ष शंकर राऊत, हाजी शेख, तुफान शेख, अशोक बनसोडे, फयाज काजी उपस्थित होते.



## फाईल गहाळ प्रकरणातील खटल्यातून तत्कालीन नगरअभियंता सुभाष सावस्कर दोषमुक्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जुलै-**

सन २०१३ मध्ये महापालिकेच्या पाच फाईली जाणीवपूर्वक गहाळ करून नष्ट केल्या व महापालिकेचे नुकसान केले, या आरोपावरून तत्कालीन आयुक्त श्री. गुडेवार यांच्या फिर्यादीवरून दाखल झालेल्या खटल्यातून तत्कालीन नगरअभियंता सुभाष बळीराम सावस्कर यांना सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयाने दोषमुक्त केले.

याची हकीकत की, आयुक्त श्री. गुडेवार हे महानगरपालिका आयुक्त म्हणून ०४/०७/२०१३ रोजी रुजू झाले. त्यांनी दि. ३०/१०/२०१३ रोजी सदर बझार पोलीस स्टेशन येथे एक फिर्याद दिली की, सन २००९ ते २०१३ या कालावधीमध्ये श्री. सुभाष सावस्कर हे नगर अभियंता पदावर काम करीत असताना त्यांनी व भुमी मालमत्ता विभागातील इतर तीन सहकाऱ्यांनी संगनमत करून भुमी व मालमत्ता विभागातील पाच महत्वाच्या फाईल्स जाणीवपूर्वक गहाळ केल्या, महापालिकेची फसवणूक करून नुकसान केले, अशा आरोपाची फिर्याद सदर बझार पोलीस स्टेशन येथे दाखल केली होती. त्या अनुषंगाने गुन्हा दाखल झाला होता. प्रकरणाचा तपास करून पोलिसांनी दि. २८/१२/२०१६ रोजी मुख्य न्यायदंडाधिकारी सोलापूर यांचे कोर्टात सुभाष सावस्कर यांचे विरुद्ध आरोपपत्र दाखल केले होते. त्या प्रकरणात आरोपी नगरअभियंता सुभाष सावस्कर यांनी ॲड शशि कुलकर्णी यांच्यामार्फत दोषमुक्त याचिका दाखल केली की, त्यांचेविरुद्धचे प्रकरणात कोणतेही तथ्य नाही, त्यांचेमधील नगरअभियंता पद हे जनरल बॉडीच्या मान्यतेने नेमणूक करण्याचे तांत्रिक पद आहे, त्यांच्याकडे प्रशासकीय कार्यभाराचा विषय असू शकत नाही, गहाळ फायलींचा ताबा नगरअभियंता यांच्याकडे असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, प्रकरणात केलेल्या आरोपाच्या अनुषंगाने तपासात कोणतीही बाब कोणत्याही प्रकारे सिद्ध होत नाही. त्यामुळे प्रकरणात आरोपीविरुद्ध आवश्यक तो पुरावाच नाही, तसेच प्रकरणात खटला दाखल करण्यासाठीची आवश्यक असणारी कायदेशीर मान्यता देखील नाही, त्यामुळे आयुक्त यांनी केलेले आरोप हे बिनबुडाचे ठरतात. त्यामुळे त्यांना प्रकरणातून दोषमुक्त करावे अशी मागणी मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात केली होती, ती मागणी फेटाळली होती.

त्या आदेशाविरुद्ध नगरअभियंता सुभाष सावस्कर यांनी सोलापूर येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या न्यायालयात पुनर्विलोकन याचिकेद्वारे त्यास आव्हान दिले होते.

सदर याचिकेची सुनावणी सत्र न्यायालयात झाली. त्यामध्ये नगरअभियंता सुभाष सावस्कर यांचे वतीने ॲड. शशी कुलकर्णी यांनी, आरोपीविरुद्ध खटल्यास कायदेशीर मान्यता कशी नाही, खटल्यात कोणताही आवश्यक पुरावा कसा नाही, खटला कसा जाणीवपूर्वक दाखल केला याचा ऊहापोह केला. याउलट सरकारी वकिलांनी श्री. सावस्कर यांच्या दोषमुक्तीच्या मागणीला जोरदार विरोध दर्शविला.

न्यायालयाने प्रकरणातील कागदपत्रे, उच्च न्यायालयाचे वेळोवेळी झालेले आदेश, पुराव्याचा अभाव, कायदेशीर मान्यता या सर्व बाबींचा विचार करून नगरअभियंता श्री. सुभाष सावस्कर यांच्याविरुद्ध खटला पुढे चालवणे न्यायालयीन प्रक्रियेचा गैरवापर होईल असे मत नोंदवून त्यांना खटल्यातून दोषमुक्त करण्याचा आदेश पारित केला. सदर कामी आरोपी सुभाष सावस्कर तर्फे ॲड. शशि कुलकर्णी, ॲड. गुरुदत्त बोरगावकर, ॲड. प्रसाद अग्निहोत्री, ॲड. आदित्य अदोने आणि सरकारतर्फे ॲड. पी. एस. जन्नू यांनी काम पाहिले.

## शालेय क्रीडा स्पर्धेची वर्गणी की जिझिया कर?

### विनाअनुदानित क्रीडा प्रकारातील खेळाडू क्रीडा गुणांपासून वंचित





जुलै महिना सुरू झाला की राज्यातील व जिल्ह्यातील शालेय क्रीडा स्पर्धांचे बिगुल वाजते. मात्र, या स्पर्धा सुरू होण्यापूर्वीच क्रीडा शिक्षक आणि शाळांना प्रशासकीय व आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. खेळाडूंच्या सहभागाच्या याद्या बनवणे, ऑनलाइन नोंदणी, प्रवेश शुल्क व क्रीडा निधी भरणे यासाठी क्रीडा शिक्षकांची मोठी कसरत होत आहे. ऑनलाइन नोंदणी सुलभ करण्यासाठी राज्य शासनाच्या क्रीडा खात्याने यंदा स्वतःची स्वतंत्र वेबसाईट तयार केली असून, ती आजपासून (शनिवार) कार्यान्वित होत असल्याची माहिती क्रीडा विभागाने दिली आहे.

**४६ खेळांना अनुदानाची प्रतीक्षा**

शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये एकूण ९४ खेळांचा समावेश आहे, ज्यापैकी केवळ ४८ खेळ प्रकारांनाच शासनाकडून अनुदान मिळते. उर्वरित ४६ खेळांचे आयोजन संबंधित जिल्हा व राज्य संघटनांना स्वतःच्या निधीतून करावे लागते. या उर्वरित ४६ खेळांनाही राज्य शासनाने अनुदान द्यावे आणि त्यातील विद्यार्थ्यांना दहावी-बारावीचे सवलतीचे क्रीडा गुण द्यावेत, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शालेय खेळ-क्रीडा संस्थेचे अध्यक्ष श्याम भोसले यांनी केली आहे. अन्यथा राज्यभर थाळी वाजवा आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

**भरमसाठ शुल्कामुळे गरीब शाळांचे कंबरडे मोडले**

शालेय स्पर्धांतील सहभागासाठी एका संघाला ५०० रुपये, तर वैयक्तिक खेळाडूंसाठी २५ रुपये प्रवेश फी आकारली जात आहे. याशिवाय क्रीडा निधी म्हणून ५०० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांकडून ३०० रुपये आणि ५०० पेक्षा जास्त विद्यार्थी असलेल्या शाळांकडून ५०० रुपये शुल्क घेतले जात आहे. सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेसाठी तर २००० रुपये फी आहे. तीन गटातून होणाऱ्या या स्पर्धेतील अवाढव्य शुल्कामुळे विशेषतः गरीब आणि मराठी माध्यमाच्या शाळांचे कंबरडे मोडले आहे. विनाअनुदानित शाळांना खडू घेण्यासाठी पैसे नसताना क्रीडा शिक्षकांना या स्पर्धांसाठी स्वतःच्या खिशातून पैसे द्यावे लागत आहेत. या आर्थिक भारामुळे गरीब व गुणवंत खेळाडू स्पर्धेपासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे. हा क्रीडा निधी आणि अवाढव्य फी पाहता या क्रीडा स्पर्धा केवळ श्रीमंत शाळांसाठीच आहेत का? असा संतप्त सवाल महाराष्ट्र राज्य क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे अध्यक्ष शरदचंद्र धारूरकर यांनी उपस्थित केला आहे.



**स्ट्रेट ड्राईव्ह**
**अजितकुमार संगवे**
**मो.9881133103**



**क्रीडा व शिक्षण मंत्र्यांनी न्याय देण्याची गरज**

प्राथमिक व माध्यमिक स्तरातूनच राज्याला आणि देशाला उदयोन्मुख खेळाडू मिळत असतात. त्यामुळे क्रीडा क्षेत्राचे नुकसान टाळण्यासाठी आणि खेळाडूंना न्याय देण्यासाठी क्रीडा मंत्री तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी हे क्रीडा शुल्क तातडीने माफ करावे तसेच विना अनुदानित खेळातील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना क्रीडा गुण देणेबाबत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडे शिफारस करावी, अशी मागणी क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक संघटनेनी केली आहे.

**शुल्काचा हिस्सा महापालिकेला का नाही?**

सन २०१४-१५ पासून शालेय क्रीडा स्पर्धा शहर आणि जिल्हा अशा दोन स्तरांवर घेतल्या जातात. शहरातील स्पर्धांचे आयोजन महापालिका क्रीडा विभाग हा जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या नियंत्रणाखाली करतो. मात्र, जमा होणाऱ्या शुल्कातील कोणताही हिस्सा जिल्हा क्रीडा कार्यालय महापालिकेला देत नाही. ''असे असेल तर शहरातील खेळाडूंकडून हे शुल्क कशासाठी वसूल केले जाते?,'' असा सवाल सोलापूर शहर व जिल्हा क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे अध्यक्ष दशरथ गुरव आणि सोलापूर शहर व जिल्हा क्रीडा शिक्षक महासंघाचे जिल्हाध्यक्ष संतोष खेंडे यांनी उपस्थित केला आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### सांगोला लायन्स क्लबच्या पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा

**सांगोला, दि. १६ जुलै-**
लायन्स क्लब ऑफ सांगोला यांच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा व नवीन सदस्यांचा शपथविधी समारंभ पार पडला. याप्रसंगी उपप्रांतपाल डॉ.किरण खोराटे, माजी प्रांतपाल प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, प्रांतपाल राजेंद्र कांसावा, विभागीय सभापती महेश नलवे, उपविभागीय सभापती उन्मेष आटपाडीकर तसेच सांगोला विद्यामंदिर प्रशालाचे प्राचार्य चारुदत्त जगताप उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात वंदे मातरम् व राष्ट्रगीताने झाली. यावेळी सदस्य राजाराम ढोले यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रा. शिवशंकर तटाळे यांनी ध्वजवंदनाचे, सूर्यकांत कांबळे यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांनी नवीन ३० सदस्यांना तर डॉ. किरण खोराटे यांनी नूतन अध्यक्ष प्रशांत रायचुरे, सचिव प्रा. प्रसाद खडतरे, खजिनदार प्रा.निलेश नागणे यांना पद व गोपनीयतेची शपथ देण्यात आली. विविध क्षेत्रात झालेल्या निवडीबद्दल क्लबचे सदस्य चेतनसिंह केदार-सावंत, ज्ञानेश्वर तेली, शुभांगी घोंगडे, प्रा.शिवशंकर तटाळे, जगन्नाथ माने यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्रा.नवनाथ बंडगर, सूत्रसंचालन प्रा.राजेंद्र कुंभार, प्रा.संतोष लोंढे, बाळराजे सावंत, प्रा.अर्चना कटरे यांनी केले.



### जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन यांची रामभाऊ जोशी हायस्कूलला भेट

**करकंब, दि. १७ जुलै-**
सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी पंढरीच्या वारी संदर्भात पालखी नियोजनाबाबत रामभाऊ जोशी हायस्कूल करकंब येथे सदिच्छा भेट देऊन पालखीच्या आगमनानिमित्त परिसरातील सर्व बाबींची पाहणी करून समाधान व्यक्त केले. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक हेमंत कदम यांनी महर्षी दयानंद सरस्वती लिखित सत्यार्थ प्रकाश हा ग्रंथ देऊन जिल्हाधिकाऱ्यांचे स्वागत केले. यावेळी करकंब जि.प.सदस्य आदिनाथ देशमुख, उपसरपंच विवेक शिंगटे, संजय धोत्रे, ज्येष्ठ शिक्षक अतुल अभंगराव, गणेश सूर्यवंशी उपस्थित होते.



### इस्माईल जमादार यांचा सेवानिवृत्तनिमित्त सत्कार

**अक्कलकोट, दि. १७ जुलै-**
येथील पी.एम.श्री नगरपरिषद प्राथमिक मुलामुलींची मराठी शाळा न.१ मधील ज्येष्ठ शिक्षक व केंद्र समन्वयक इस्माईल जमादार हे ३३ वर्षाची प्रदीर्घ सेवा पूर्ण करून नुकतेच सेवानिवृत्त झाले. नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते त्यांचा सहपत्निक सत्कार करण्यात आला. यावेळी उपनगराध्यक्ष ऋतुराज राठोड, स्वामीसमर्थ मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे, नगरसेवक महेश हिंडोळे, यशवंत तात्या धोंगडे, शिक्षण समितीच्या सभापती अपर्णा सिद्धे, आरोग्य समितीचे सभापती अविनाश मडीखांबे, बांधकाम समितीचे सभापती सद्दाम शेरीकर, नगरसेवक नाविद डांगे, नागराज कुंभार, अल्पसंख्याक अध्यक्ष नन्नू कोरबू पनवेलचे गट शिक्षणाधिकारी शाहू सतपाल, अक्कलकोटचे गट शिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे, प्रशासनाधिकारी सोमशेखर स्वामी, विस्तार अधिकारी बापूसाहेब जमादार, गुरुबाळ सणके, माजी गट शिक्षणाधिकारी कुदसिया शेख, प्राचार्य शिवराया आडवीतोटे, मुंबई उच्च न्यायालयाचे ॲड. मिलिंद देशमुख, प्रा. उमेश साठे, गझलकार कालिदास चवडेकर, केंद्रप्रमुख देवीदास वाघमोडे उपस्थित होते.



### शेलेवाडी गावभेटीत खा. प्रणिती शिंदे यांनी जाणून घेतल्या नागरिकांच्या समस्या

**मंगळवेढा, दि. १७ जुलै-**
सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी मंगळवेढा तालुक्यातील शेलेवाडी येथे ग्रामभेट देत नागरिकांशी थेट संवाद साधला. यावेळी ग्रामस्थांनी, शेतकऱ्यांनी गावातील रस्ते, वीजपुरवठा, लोडशेडिंग, एसटी बस सेवा, प्राथमिक आरोग्य केंद्रातील अडचणी, बँकिंग सुविधा, पीक कर्ज आदी विविध प्रश्न निवेदनाद्वारे खा. प्रणिती शिंदे यांच्यासमोर मांडले. ग्रामस्थांनी व शेतकऱ्यांनी शेलेवाडीमध्ये नियमित व दर्जेदार वीजपुरवठा, लोडशेडिंग कमी करणे, गावातून एसटी बस सेवा सुरू करणे, तसेच गावात कोणतीही राष्ट्रीयकृत बँकेची शाखा नसल्याने नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन राष्ट्रीयकृत बँकेची शाखा सुरू करून सर्व बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. यावेळी खासदार प्रणिती शिंदे यांनी ग्रामस्थांशी चर्चा करत सर्व निवेदने स्वीकारली. यावेळी मंगळवेढा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रशांत साळे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव ॲड. रविकिरण कोळेकर, मनोज यलगुलवार, निसार तांबोळी, ज्ञानेश्वर सोरडीकर, सरपंच सुनीता माळी, सावता माळी, दत्ता चव्हाण, मनोज चव्हाण, पंडित चव्हाण, सोमनाथ चव्हाण, पंकज चव्हाण, रमेश आवताडे, नागेश पाटील, भारत माळी, बंडू चव्हाण, पांडुरंग चव्हाण उपस्थित होते.

# उजनी धरणातून तातडीने २ टीएमसी पाणी सोडा

## संजय पाटील; तीव्र आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १७ जुलै-**
सोलापूर जिल्ह्यात यंदा मान्सूनने अपेक्षेप्रमाणे साथ न दिल्यामुळे शेतीवर मोठे संकट कोसळले आहे. जिल्ह्याच्या अनेक भागांत पेरणीनंतर अत्यल्प पाऊस झाला. परिणामी खरीप पिकांची वाढ पूर्णपणे खुंटली आहे. विशेषतः कोंढार परिसरासह भीमा नदीकाठावरील गावांमध्ये परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर उजनीतून तात्काळ २ टीएमसी पाणी सोडावे, अशी मागणी माजी सभापती संजय पाटील यांनी केली आहे. तसेच तीव्र आंदोलनाचा इशाराही दिला आहे.

पेरणीनंतर वाढते तापमान आणि सिंचनासाठी पाणी उपलब्ध नसल्याने शेतकरी अक्षरक्षः हवालदील झाला आहे. शासनाने तातडीने हस्तक्षेप करून सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

कोंढार परिसरातील मका, ऊस, डाळिंब, भाजीपाला, चारा पिके तसेच इतर खरीप पिकांना पाण्याअभावी मोठा फटका बसत आहे. वेळेत पाणी न मिळाल्यास हजारो एकरांवरील पिके पूर्णपणे वाया जाण्याची शक्यता आहे.

### भीमानदीचे पात्र कोरडे; विहिरींच्या पाणीपातळीतही घट

संगमपर्यंत भीमा नदीचे पात्र जवळपास पूर्णपणे कोरडे पडले आहे. नदीकाठावरील विहिरींची पाणीपातळी झपाट्याने खाली गेल्याने शेतकऱ्यांसमोर सिंचनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. भीमा नदीलगतची शेती तसेच पूर्ण कालवा परिसरातील शेती धोक्यात आली आहे. अनेक ठिकाणी विहिरी व बोअरवेलमधील पाणीही कमी झाल्याने पिकांना पाणी देणे अशक्य होत आहे.



शेतकऱ्यांना लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान सहन करावे लागू शकते.

सध्या उजनी धरणात ५२ टक्के पाणीसाठा आहे. या पार्श्वभूमीवर सिंचनासाठी धरणातून २ टीएमसी पाणी तातडीने सोडावे, अशी मागणी शेतकऱ्यांसह विविध संघटनांकडून होत आहे. तसेच नीरा नदीतून संगमपर्यंत पाणी उपलब्ध झाल्याने भिमानगर ते संगम दरम्यानही पाणी सोडल्यास कोंढार परिसरासह भीमा नदीकाठावरील हजारो हेक्टर शेतीला मोठा दिलासा मिळणार असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

### जनावरांच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर

शेतीबरोबरच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होत आहे. अनेक गावांमध्ये उन्हाळ्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत आहे. पाऊस लांबल्यास ही परिस्थिती आणखी बिकट होणार आहे.

माजी सभापती संजय पाटील यांनी कार्यकारी अभियंता पी. ए. खडतरे यांना निवेदन दिले आहे. निवेदनात पिकांचे नुकसान टाळण्यासाठी उजनी धरणातून तातडीने नदी व कालव्यामार्फत पाणी सोडावे. प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन पाणी न सोडल्यास तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.



## गोदुताई परुळेकर जि.प. शाळेस आरओ मशीन भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**
सामाजिक बांधिलकी जपत श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या वतीने गोदुताई परूळेकर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (मुली), विडी घरकुल अ, कुंभारी येथे विद्यार्थिनींसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आरओ मशीन भेट देण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून समाजसेविका विमलादेवी बिहाणी, लीला नावंदर, पुष्पा राठी तसेच उद्योजक सुनिल बलदवा, जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेचे मुख्याध्यापक चंद्रशेखर चितली आणि प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश कासट आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते आरओ मशीनचे लोकार्पण करण्यात आले. सूत्रसंचालन राजश्री कोकणे यांनी केले तर आभार नागनाथ येवले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मनुश्री कासट, अक्षता कासट, शुभांगी लचके, संतोष अलकुंटे, प्रज्ञा गायकवाड, नागनाथ गवंडी, शोभा पांचाळ आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## बार्शी तालुक्यात दमदार पाऊस; पेरणीच्या आशा पुन्हा पल्लवीत

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ जुलै-**
मागील महिनाभर दडी मारलेल्या पावसाने गुरुवारी (ता. १६) सायंकाळी बार्शी शहरासह तालुक्यात दमदार हजेरी लावली. चांगल्या पावसाने शेतकऱ्यांच्या पेरणीच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

गुरुवारी जामगाव (आ), भांतबरे, झरेगाव, वैराग, शेलगाव (मा), देवगाव, गाडेगाव, कांदलगाव, नागोबाचीवाडी, घाणेगाव, लक्ष्याची वाडी, मालेगाव, तावडी, सौंदरे, बावी, गोरमाळे, हत्तीज, सारोळे, सर्जापूर, गौडगाव, कव्हे, कोरफळे, राळेरास, काळेगाव, उक्कडगाव, खडकोणी, मळेगाव, शिराळे, पिंपळगाव, लाडोळे, घारी, पांगरी, साकत, अलीपूर, पांढरी, बोरगाव, मानेगाव, शेळगाव (आर) आदी गावांत जोरदार पावसाने हजेरी लावली. सायंकाळी सव्वासातच्या सुमारास सुरु झालेला मुसळधार पाऊस साडेआठ वाजल्यानंतरही सुरुच होता. दोन दिवसांच्या प्रचंड उकाड्याने हैराण झालेल्या बार्शीकरांना या पावसाने मोठा दिलासा दिला. अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर झालेल्या पावसामुळे बळीराजासह सर्वसामान्य नागरिक सुखावले आहेत.रात्री उशिरापर्यंत पावसाची रिपरिप सुरु होती.

यंदाच्या पावसाळी हंगामास दीड महिना उलटूनही शहर व तालुक्यात समाधानकारक पाऊस झाला नव्हता. त्यामुळे तालुक्यात पेरणी झालेली नव्हती. गुरुवारी झालेल्या पावसामुळे पेरणीच्या आशा पुन्हा पल्लवघत झाल्या आहेत.



## आर्या स्कूलच्या विद्यार्थ्यांची कृषी विज्ञान केंद्राला भेट

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १७ जुलै -**
विठ्ठल प्रतिष्ठान, निमगाव (टे.) संचलित आर्या पब्लिक स्कूल, माढा येथील विद्यार्थ्यांची सीबीएसईच्या कौशल्य विकास कौशल्य बोध व कृषी अभ्यासक्रम अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र, मोहोळ येथे शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली.

या भेटीदरम्यान कृषी विज्ञान केंद्रातील डॉ.वळकुंडे डॉ.स्वाती कदम डॉ.पंकज डॉ. क्षिरसागर डॉ. वैरागकर यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, सेंद्रिय शेती, मृदा परीक्षण, पाणी व्यवस्थापन, पीक संरक्षण, कृषी यांत्रिकीकरण, फळ व भाजीपाला लागवड, कृषी उद्योजकता तसेच शाश्वत शेतीविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विविध कृषी प्रात्यक्षिके प्रत्यक्ष पाहून आधुनिक शेतीतील नवीन तंत्रज्ञानाची माहिती आत्मसात केली. या क्षेत्रभेटीचे नियोजन विभागप्रमुख जयदेव गायकवाड यांनी केले. उपक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रणिता शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्राचार्य सागर थोरात कार्यालयीन अधिक्षक संभाजी पाटील व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नेतृत्वाखाली ही क्षेत्रभेट पूर्ण करण्यात आली.



## विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक परीक्षेत भाग घेणे काळाची गरज : डॉ. येळेगांवकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**
आजच्या २१ व्या शतकात स्पर्धात्मक परिक्षेला अत्यंत महत्व असुन स्पर्धेशिवाय विद्यार्थ्यांना प्रगती करणे अशक्य असल्याने स्पर्धात्मक परिक्षा काळाची गरज झाली आहे असे उद्गार सोलापूरातील थोर विचारवंत व लेखक डॉ. श्रीकांत येळेगांवकर यांनी काढले.

ते कॉ. एन. आर. बेरिया मेमोरियल ट्रस्ट व महानगरपालिका कामगार महासंघा तर्फे कॉ. एन.आर. बेरिया यांच्या स्मृतिदिना निमित्त आयोजित कॅम्प शैक्षणिक परिसरातील सर्व शाळांतील शिष्यवृत्ती परिक्षेत उज्वल यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सोशल महाविद्यालयाचे प्राचार्य ई.जा. तांबोळी, प्रा. रियाज वळसंगकर, फैयाज शेख, माजी महापौर ॲड. यु. एन. बेरिया आदी उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष ऍड.समीरखान बेरिया यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमास अ.रजाक मकानदार, अल्लाबक्ष मनियार उपस्थित होते. सूत्रसंचालन झीनत पटेल यांनी केले. सिद्राम उंबरजे यांनी आभार मानले.

## वैराग बसस्थानकातील जुने स्वच्छतागृह बंद

### प्रवाशांची गैरसोय; नवीन शौचालयासाठी तीन महिन्यांची प्रतिक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १७ जुलै-**
वैराग येथील मध्यवर्ती बस स्थानकातील जुन्या स्वच्छतागृहाची अवस्था अत्यंत गंभीर झाली होती, प्रशासनाने त्या ठिकाणी अद्ययावत सुलभ शौचालयाचे बांधकाम सुरू केले आहे. पुढील दोन ते तीन महिन्यांत ते प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहे. मात्र, सध्या बांधकाम सुरू असल्याने जुने स्वच्छतागृह पूर्णपणे बंद केले आहे. परिणामी, बस स्थानकात येणाऱ्या हजारो प्रवाशांना, विशेषतः महिला आणि विद्यार्थिनींना नैसर्गिक विधीसाठी तीव्र अडचणींचा सामना करावा लागत आहे.

वैराग बस स्थानकाचा विस्तार आणि प्रवाशांची संख्या लक्षात घेऊन प्रशासनाने चांगला निर्णय घेतला आहे. जुनी दुरवस्था संपवून आता आधुनिक पद्धतीचे सुलभ शौचालय उभारले जात आहे. यामध्ये महिला आणि पुरुषांसाठी पूर्णपणे स्वतंत्र आणि पुरेशा क्षमतेची व्यवस्था केली जात आहे. नवीन शौचालयाचे काम वेगाने सुरू असून, पुढील २ ते ३ महिन्यांत ते प्रवाशांसाठी खुले होईल. नवीन बांधकाम होणे ही स्वागतार्ह बाब असली, तरी सध्या प्रवाशांचे हाल होत आहेत. ५७ ते ५८ गावांचे केंद्र असलेल्या या स्थानकात रोज शेकडो मुली शिक्षणासाठी आणि महिला बाजारासाठी येतात. सध्या जुने शौचालय बंद आणि नवीन अपूर्ण अशा स्थितीत महिलांना कुठे जावे, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.



### तात्पुरत्या मोबाईल शौचालयाची गरज

बांधकाम पूर्ण होईपर्यंत एसटी महामंडळ किंवा स्थानिक प्रशासनाने बस स्थानक परिसरात तात्पुरती फिरती स्वच्छतागृहे उपलब्ध करून द्यावीत. जवळपास इतर कोणती सार्वजनिक सोय असेल, तर तसे फलक बस स्थानकात लावण्याची मागणी होत आहे.

# वारकऱ्यांच्या स्वागतासाठी करकंब नगरी सज्ज

## वारकऱ्यांना दर्जेदार सेवा-सुविधा देण्यावर भर

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १७ जुलै-**
महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री.विठ्ठलांच्या दर्शनासाठी आषाढी वारीनिमित्त राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी पायी चालत पंढरपूरकडे मार्गक्रमण करत आहेत.या पार्श्वभूमीवर करकंब ग्राम पंचायतने वारकऱ्यांच्या सेवेसाठी व्यापक तयारी सुरू केली असून विविध सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे. करकंब नगरीतून दरवर्षी दोन ते तीन लाख वारकरी मुक्काम करून पुढे पंढरपूरकडे रवाना होतात.यामध्ये श्रीसंत निवृत्तीनाथ, श्रीसंत एकनाथ महाराज, श्रीसंत निळोबा, श्रीसंत शनेश्वर, श्रीसंत कैकाडी महाराज, श्रीसंत दत्तगुरु देवगड,मुक्ताई दिंडी, श्रीसंत गजानन महाराज यांसह अनेक लहानमोठ्या पालख्या व दिंड्यांचा समावेश असतो. नाशिक,नगर,इंदापूर,करमाळा तसेच पुणे परिसरातून येणारे वारकरी करकंब मार्गे पंढरपूरकडे प्रस्थान करतात.









### नियोजनबद्ध तयारी सुरू

घनकचरा व्यवस्थापनाचे सुमारे ८० टक्के काम पूर्ण झाले असून गटार स्वच्छतेचे ५० टक्के काम झाले आहे.तसेच फॉगिंग मशीन, बीएससी पावडर,टीसीएल आदींचा वापर करून आरोग्यविषयक उपाययोजना केल्या जाणार आहेत.

रामभाऊ जोशी हायस्कूल,न्यू इंग्लिश स्कूल,टिळक चौक, बाजार तळ, सिद्धनाथ मंदिर,जिल्हा परिषद शाळा परिसरात स्वच्छता करून शासनाच्या वतीने मोठे मंडप उभारण्यात येणार आहेत.

वारकऱ्यांच्या मुक्कामासाठी गावातील वाड्यवस्त्या, शाळा, मंदिरे व इतर सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात व्यवस्था करण्यात येत आहे. विशेषतः श्रीसंत निवृत्तीनाथ पालखीचा गोल रिंगण सोहळा करकंब येथे होत असल्याने प्रशासनाने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. पालखीतळ व रिंगण सोहळा तळाची पाहणी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कोहिणकर व गटविकास अधिकारी सचिन जाधव यांनी केली असून आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत. ग्रामपंचायतीला आवश्यक निधीही उपलब्ध करून देण्यात आला आहे. ग्रामपंचायतमार्फत स्वच्छता मोहीम राबवून घनकचरा व्यवस्थापन, रस्त्यांवरील दिव्यांची व्यवस्था, आरोग्य सेवा, पाणीपुरवठा व निवारा सुविधा यांची काटेकोर अंमलबजावणी केली जात आहे. वारकऱ्यांना स्वच्छ, सुरक्षित वारी अनुभव मिळावा यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे.

ग्रामस्थांचे सहकार्य आवश्यक असून अंतर्गत गटारींची स्वच्छता, रस्त्यांची दुरुस्ती,पालखीतळावर स्वच्छता, स्नानगृह, वीज, निवारा व्यवस्था, आरोग्य सेवेची उपलब्धता झालेली असून नागरिकांनी अतिक्रमण टाळून परिसर स्वच्छ ठेवावा,घंटागाडीचा वापर करून कचरा व्यवस्थापनात सहकार्य करावे.

**- तेजमाला पांढरे, सरपंच**



# विठ्ठलाच्या दर्शनासाठी वारकरी हाच व्हीआयपी

## पालकमंत्री व जिल्ह्यातील सर्व अधिकारी वारकऱ्यांसाठी टोल फ्री क्रमांकाप्रमाणे काम करतील

### वाखरी पालखी तळाची केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१७ जुलै -**

पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणारा वारकरी हाच आमचा व्हीआयपी आहे. त्यामुळे वारकऱ्यांना व्हीआयपी समजूनच सेवा-सुविधा पुरवत आहे. म्हणूनच इतर कोणत्याही व्हीआयपींना विठ्ठल मंदिरात थेट दर्शन दिले जाणार नाही. वारकऱ्यांना सहज आणि सुलभ दर्शन मिळावे, यासाठीच आमचा प्रयत्न असल्याचे प्रतिपादन ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, पंढरीत येणाऱ्या वारकऱ्यांचे मोठ्या उत्साहाने स्वागत करावे. त्यांच्या स्वागतासाठी पंढरी नगरी सजवण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न होत आहेत. विविध सुविधाही निर्माण केल्या आहेत. आषाढीच्या निमित्त येणाऱ्या कोणत्याही वारकऱ्याला कोणत्याही प्रकारचा त्रास झाल्यास त्यांनी थेट पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन किंवा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांना फोन करावा. जिल्ह्यातील अधिकारी आणि पालकमंत्री वारकऱ्यांच्या सेवेसाठी टोल फ्री क्रमांकाप्रमाणे काम करतील आणि वारकऱ्यांच्या अडचणी सोडवतील, असेही त्यांनी सांगितले.



#### सुविधांसाठी निधी कमी पडू देणार नाही

गेल्या दोन दिवसांत झालेल्या पावसामुळे वाखरी पालखी तळावर काही ठिकाणी पाणी साचले होते. तळावर पाणी साचलेल्या ठिकाणांची पाहणी करून आवश्यक ठिकाणी सिमेंट पाईप टाकावेत, मुरमीकरण करून पाण्याला उतार करावा, कोठेही खड्डे राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. वारकरी भाविकांच्या सुविधेबाबत कोणतीही कमतरता भासणार नाही, याची दक्षता घेऊन सर्व यंत्रणांनी नेमून दिलेली कामे पूर्ण करावीत. सुविधांसाठी आणखी निधीची आवश्यकता असल्यास तो जिल्हा नियोजन समितीतून उपलब्ध करून देण्यात येईल, असेही पालकमंत्र्यांनी सांगितले.

#### वाखरी पालखी तळाची पालकमंत्र्यांकडून पाहणी

आषाढी शुद्ध एकादशी सोहळ्यासाठी संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यांसह इतर संतांच्या पालख्या पंढरपूरकडे येतात. नवमी दिवशी वाखरी येथे अनेक पालख्यांचा मुक्काम असतो. त्यामुळे वाखरी पालखी तळावर मोठ्या प्रमाणात गर्दी असते. या ठिकाणी सर्व विभागांनी समन्वयाने काम करून सर्वोत्तम सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचना पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, प्रांताधिकारी सचिन इथापे, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभिजित औटी, मुख्याधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी अमोल जाधव उपस्थित होते.

## संत गजानन महाराज पालखी मार्गावर पोलिस अधीक्षकांच्या हस्ते वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १७ जुलै-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हरीतवारी संकल्पनेतुन श्री संत गजानन महाराज पालखी मार्गावर जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते कामती व मंगळवेढा पोलीस ठाणे हद्दीत वृक्षारोपणाचा प्रारंभ करण्यात आला. तसेच रस्ते अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी जनजागृती करण्यात आली.

मंगळवेढा येथे हरितक्रांतीची वारी हा अभिनव उपक्रम राबवला आहे. सोलापूर जिल्ह्यात वाढत्या रस्ते अपघाताच्या पार्शवभूमीवर जनजागृती करण्यासाठी कार्यक्रमही झाला. यावेळी अपघात झालेले वाहन ठेवून अपघाताबाबत जागरुकता केली. उपविभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपुजे, पोलीस निरीक्षक बसवेश्वर जकिकोरे, दत्तात्रय बोरिगिड्डे, प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे अधिकारी वर्ग, महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, बालाजी अमाईन्सचे समन्वय अधिकारी अनिल विप उपस्थित होते.

जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी म्हणाले, रस्त्यावरील अपघातांमध्ये बरेच मृत्यू हे हेल्मेट न घातल्यामुळे होतात. त्यामुळे नागरिकांनी स्वसुरक्षेसाठी हेल्मेटचा वापर करावा. प्रत्येकाने एक झाड लावून त्याचे संगोपन करावे व जास्तीत जास्त सेंद्रिय शेतीचा वापर करावा.

## महत्त्वाचे...

### माढा नगरपंचायतकडून अनधिकृत होर्डिंग व बॅनर हटवण्याचे आवाहन

**माढा, दि.१७ जुलै -**



आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर अनधिकृत होर्डिंग्ज, बॅनर व फ्लेक्स तात्काळ काढून घेण्याचे आवाहन माढा नगरपंचायतीकडून केले आहे. माढा शहरातून आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे जाणाऱ्या मानाच्या पालख्या व दिंड्या जात असतात. माढ्यात ऐतिहासिक विठ्ठल मंदिर आहे त्यामुळे आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर माढा शहरात वारकरी व भाविकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ होणार आहे. सार्वजनिक सुरक्षितता, वाहतुकीची सुरळीत व्यवस्था व पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर संभाव्य अपघात टाळण्यासाठी नगर पंचायत हद्दीत परवानगीशिवाय लावलेले होर्डिंग्ज, बॅनर, फ्लेक्स, जाहिरात फलक संबंधितांनी तात्काळ काढून घ्यावेत, असे आवाहन मुख्याधिकारी नेहा कंठे यांनी केले आहे. परवानगीशिवाय उभारलेले होर्डिंग्ज व बॅनर हे जोरदार वारा व पावसामुळे धोकादायक ठरू शकतात. मुदतीत संबंधितांनी अनधिकृत होर्डिंग्ज, बॅनर व फ्लेक्स काढून न घेतल्यास नगर पंचायत प्रशासनामार्फत विशेष पथकाद्वारे ते हटविण्यात येतील. तसेच संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

### आपत्कालीन व्यवस्थापनासाठी यंत्रणा सज्ज

**अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी; अग्निशमन वाहने, रेस्क्यू बोटीसह अत्याधुनिक साहित्य**

**सोलापूर, दि. १७ जुलै-**

आषाढी वारी च्या पार्श्वभूमीवर वारकरी-भाविकांच्या सुरक्षेसाठी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवली आहे. चंद्रभागा नदीपात्रासह शहरातील गर्दीच्या ठिकाणी कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी अग्निशमन वाहने, रेस्क्यू बोटी आणि बचाव साहित्याची मोठ्या प्रमाणावर जमवाजमव केल्याची माहिती अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिली.

आपत्कालीन व्यवस्थेकरिता ६ अग्निशमन वाहने आणि १ रेस्क्यू व्हॅन तैनात केले आहे. त्याचे प्रभारी म्हणून पंढरपूर नगरपालिकेचे अग्निशमन अधिकारी संभाजी कारले (संपर्क: ९०२८१११३१८) यांची नियुक्ती केली आहे. चंद्रभागा नदीत प्रवासी वाहतूक करणाऱ्या होड्यांसाठी १०४५ लाईफ जॅकेट उपलब्ध करून दिले आहेत. याचे समन्वयक म्हणून जलसंपदा विभागाचे उपविभागीय अभियंता जेडे (संपर्क: ७९७२९५३८२४) काम पाहत आहेत.

बचावकार्यासाठी जिल्ह्यातील ११, पुणे जिल्ह्यातील २ आणि एनडीआरएफच्या ४ अशा एकूण १७ रेस्क्यू बोटी सज्ज ठेवल्या आहेत. रेस्क्यू बोटींसाठी १०० लाईफ जॅकेट, ३० लाईफ रिंग, बचाव पथकांच्या समन्वयासाठी ९ वॉकी-टॉकी, ५ मेगाफोन, ४ इन्फ्लेटेबल टेंट, ६ मि.मी. स्टॅटिक रेस्क्यू रोप, ५ टॉर्च, २ लेजर पॉइंटर आणि २ लाईट बॅटन यांचा समावेश आहे. संपूर्ण साहित्याचे प्रभारी म्हणून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले (संपर्क: ९८२२५१५६०१) यांची नियुक्ती केली आहे.

आषाढी यात्रा कालावधीत सर्व यंत्रणा २४ तास अलर्ट मोडवर राहणार आहेत. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ प्रतिसादासाठी सर्व साहित्य व मनुष्यबळ सज्ज ठेवले आहे, अशी माहिती इन्सिडेंट कमांडर तथा अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिली आहे.

## वारकऱ्यांना आवश्यक सुविधा देण्यासोबतच स्वच्छतेला प्राधान्य



### जिल्हाधिकाऱ्यांकडून वाळवंट स्वच्छता व शौचालयांची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १७ जुलै -**

आषाढी शुद्ध एकादशी सोहळा २५ जुलै २०२६ रोजी संपन्न होणार आहे. आषाढी यात्रा कालावधीत पंढरपूरला लाखो वारकरी-भाविक येतात. या कालावधीत वारकरी भाविकांना पालखी मार्ग, पालखीतळ, विसावा आणि रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी पाणी, आरोग्य, सुरक्षा व स्वच्छतेच्या पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिली.

पंढरपूर शहरात येणाऱ्या वारकरी-भाविकांना प्रशासनाच्या वतीने चांगल्या दर्जेदार सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी जिल्हाधिकारी कार्तिकेयन सातत्याने प्रयत्नशील आहेत.

शौचालयांच्या साफसफाईसाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करावे, तसेच शौचालयांची वेळोवेळी स्वच्छता करण्यासाठी जादा स्वच्छता कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. शौचालयाकडे जाणाऱ्या रस्त्यांवर कचरा पडू नये यासाठी कचकडा टाकावा, नदीपात्र कायम स्वच्छ राहील याची काळजी घ्यावी, तसेच तेथे पडणारा कचरा इतरत्र पसरू नये यासाठी कचराकुंड्यांची संख्या वाढवावी, असे निर्देशही जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले.

#### होडीचालकांशी संवाद

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी वाळवंट व परिसराची पाहणी करताना नदीपात्रातील होडीचालकांशी संवाद साधला. आसनक्षमतेपेक्षा जास्त जलप्रवाशांची वाहतूक करू नये, सूर्योदयापूर्वी व सूर्यास्तानंतर जलवाहतूक बंद ठेवावी, असे त्यांनी सांगितले. जलवाहतुकीदरम्यान प्रवासी व चालक यांनी सुरक्षेच्या साधनांचा वापर करणे अनिवार्य आहे. सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे निर्देशही यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले. यावेळी त्यांच्या समवेत प्रांत अधिकारी सचिन इथापे, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्ती सागर ढोले, जलसंपदा विभागाचे अधिकारी, उपस्थित होते.

#### शौचालयांची प्रत्यक्ष पाहणी

यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी वाळवंट तसेच नदीपात्रालगतच्या शौचालयांची पाहणी केली. त्या ठिकाणी पुरेसे पाणी उपलब्ध आहे का, स्वच्छता राखली आहे का, याची तपासणी केली. काही शौचालये जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः उघडून पाहणी केली.



## कलावंत, साहित्यिकांच्या योजनांबाबतच्या रथाचे मंत्री शेलारांकडून पूजन

**सोलापूर, दि. १७ जुलै -**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्यातर्फे, आषाढी यात्रांतर्गत, संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यातील, ज्येष्ठ कलावंत व साहित्यिकांसाठी राबवत असलेल्या विविध मानधन सन्मान योजनांचा प्रचार होणार आहे.

प्रचार व प्रसार करण्यासाठी, स्वरसंगम कलापथक लोकनाट्य बहुउद्देशीय संस्था, सोलापूर यांचा रथ असणार आहे. रथातील विठ्ठल-रुक्मिणीची पूजा, बेलवडी येथील मेंढ्यांच्या रिंगण सोहळ्यात, सांस्कृतिक कार्य विभागाचे मंत्री आशिष शेलार यांनी सपत्नीक पूजा केली. यावेळी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, सांस्कृतिक विभागाचे संचालक पांडे, धुमाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

कलापथकाद्वारे पुणे ते पंढरपूर दरम्यान, वारीतील ज्येष्ठ कलावंत व साहित्यिकांना मनोरंजक पद्धतीने पुरस्कार व मानधन सन्मान योजनांची माहिती देत आहे. कार्यक्रमास चांगला प्रतिसाद मिळत आहे. कलापथकात शाहीर संजय रणदिवे, शाहीर रमेश खाडे, शाहीर सतीश रणशूर, शाहीर चंद्रसेन पंके तसेच, सुमन रणदिवे, प्रतिभा साठे, संगीता जाधव, जोतिबा शिंदे, प्रथमेश रणदिवे, किसन सितारे (हार्मोनियम) महादेव सितारे (तबला) यांचा सहभाग आहे.

## यंदा ३ दिंड्यांना श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार

### स्वच्छ, हरित आणि संस्कारमय वारीला प्रोत्साहन

### आषाढी एकादशीदिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान,

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१७ जुलै -**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या वतीने 'निर्मल वारी, हरित वारी अभियान' प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. अभियानामध्ये स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, प्लास्टिकमुक्त वारी, वृक्षसंवर्धन, पाणी बचत, कचरा व्यवस्थापन आदी सामाजिक विषयांवर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दिंड्यांचा गौरव करण्यात येणार आहे. यंदा हा पुरस्कार तीन दिंड्यांना आषाढी एकादशीदिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

इतर दिंड्यांनाही स्वच्छतेसह अन्य समाजिक उपक्रमांची प्रेरणा मिळावी, या उदात्त हेतूने समितीने २०१८ पासून मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार' सुरू केला आहे. पुरस्कारामुळे वारीमध्ये सहभागी होणाऱ्या दिंड्यांमध्ये स्वच्छता, शिस्त, पर्यावरणपूरक उपक्रम आणि सामाजिक बांधिलकी यांविषयी सकारात्मक स्पर्धा निर्माण झाली आहे. अनेक दिंड्यांनी स्वतःहून स्वच्छता मोहीम, प्लास्टिकमुक्त वारी, वृक्षारोपण, कचरा वर्गीकरण, पाण्याची बचत, आरोग्य जनजागृती, रक्तदान, व्यसनमुक्ती आणि सामाजिक संदेश देणारे विविध उपक्रम हाती घेतले आहेत. त्यामुळे वारीचा अध्यात्मिक सोहळा अधिक सुसंस्कृत, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बनत आहे. २०२६ च्या आषाढी पालखी सोहळ्यात सहभागी दिंड्यांपैकी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पहिल्या तीन दिंड्यांची निवड करणार आहे.

पुरस्कारासाठी दिंड्यांचे स्वच्छता व्यवस्थापन, प्लास्टिक मुक्त उपक्रम, पर्यावरण संवर्धन, शिस्तबद्ध संचलन, सामाजिक संदेश, वृक्षसंवर्धन, आरोग्य जनजागृती, कचरा व्यवस्थापन, वारकऱ्यांचा सहभाग, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि जनजागृती यांसारख्या विविध निकषांच्या आधारे परीक्षण करण्यात येणार आहे, या पुरस्कारासाठी परीक्षण व निवड प्रक्रिया पारदर्शक व वस्तुनिष्ठ पद्धतीने पार पाडण्यासाठी मंदिर समितीच्या वतीने ॲड. माधवी निगडे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ आणि वृक्षमित्र ह.भ.प. शिवाजी मोरे यांची त्रिसदस्यीय समिती गठित करण्यात आली आहे. ही समिती विविध दिंड्यांच्या प्रत्यक्ष पाहणीनंतर आणि निर्धारित निकषांच्या आधारे अंतिम निवड करणार असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.



#### सर्व दिंड्यांना प्रेरणा देणारा उपक्रम

'निर्मल वारी, हरित वारी' ही संकल्पना प्रत्येक दिंडीने स्वीकारल्यास भविष्यातील वारी अधिक स्वच्छ, पर्यावरणपूरक, निरामय आणि प्रेरणादायी ठरेल. 'श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार' हा केवळ सन्मान नसून समाजासाठी आदर्श निर्माण करणाऱ्या दिंड्यांच्या कार्याची दखल घेणारा गौरव आहे.

**- ह.भ.प. शिवाजी मोरे,सदस्य, मंदिरे समिती**

#### पुरस्कारांचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे

प्रथम क्रमांक - रुपये १,००,०००/-- द्वितीय क्रमांक - रुपये ७५,०००/- आणि तृतीय क्रमांक - रुपये ५०,०००/-